आम्ही

# पार्लेकर

१९९१ पासून

वार्षिक विशेषांक २०२१



## ३०
## वाटचाल तीन दशकांची

॥ श्री व्याडेश्वर प्रसन्न ॥

साठे यांचे

# विजय स्टोअर्स

सहजीवन, ४ श्रद्धानंद रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०५७. फोन : २६१४६६४१, २६१८८५२१



## तिळगुळ घ्या गोड गोड बोला!

### शुक्रवार दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी मकरसंक्रांतीसाठी

पॉलीशतीळ, साधेतीळ, चिकीगुळ, खोबरे, पंढरपुरी डाळं, काजू, शेंगदाणे, वेलची, गुळपोळीसाठी उत्तम कोल्हापूरी गुळ, तिळ खसखस, तिळाचे लाडू, काटेरी हलवा, तिळवडी, तिळपापडी, गुळपोळी, गुळपोळीसाठी तयार गुळपुरण मिळेल.

### हलव्याचे सुबक दागिने

सुनबाईंसाठी हलव्याचे छान छान दागिने (बिंदी पासून कंबरपट्ट्या पर्यंत) लहान मुलांसाठी रंगीत व साधा वाडीसेट, जावयांसाठी हार-तुरा, घड्याळ, नारळ, मोबाइल, सजवलेला हत्ती मिळेल.

### स्पेशल उंधियो

श्रीखंड, आम्रखंड, मलाईयुक्त चक्का

| | | | |
|---|---|---|---|
| तीळ लाडू, तीळवडी, तीळ पापडी,<br>गजक, मोतीचूर लाडू, बेसन लाडू,<br>रवा लाडू, डिंक लाडू, कणिक लाडू,<br>मुग लाडू, कडक बुंदी लाडू<br>आंबावडी, श्रीखंड वडी, अनारसे | कच्चा चिवडा, तळलेला चिवडा,<br>सफेद बटाटा चिवडा<br>लाल बटाटा चिवडा, लसूण शेव,<br>साधी शेव, भाजणी चकली,<br>बटर चकली | ओल्या नारळाची करंजी,<br>बेक करंजी<br>पुरणपोळी, तेलपोळी,<br>गुळपोळी, सुकामेवा | पापड, मिरगुंड, शेवया,<br>कुरडई, पोहा, डांगर,<br>मेतकुट, कडधान्य,<br>भिजवलेली कडधान्य,<br>सर्व प्रकारची चटणी,<br>लोणचे, पीठे, |

घरगुती मसाले, हळद, तिखट, इत्यादी पदार्थ मिळतील

**आपल्या परदेशातील आप्तेष्टांना घरगुती, स्वादिष्ट फराळ व हलव्याचे दागिने कुरियरने पाठविण्याची सुवर्णसंधी**

आम्ही पार्लेकर
या दर्जेदार प्रकाशनाच्या
त्रिदशकपूर्तीनिमित्त मनःपूर्वक अभिनंदन
आणि हार्दिक सदिच्छा...

VIJAYRAJ
DEVELOPERS | LLP

Tel: +91 22 24368006 / +91 22 24384463 Email: vijayrajdevelopersllp@gmail.com

लवकरच येत आहोत पार्क रोड, महंत रोड, मालविया रोड येथे...

आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

**वार्षिक विशेषांक २०२१**
**वर्ष ३० वे**

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
पूर्वा कळंत्रे

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे

**मुखपृष्ठ संकल्पना**
वैदेही काणे

**जाहिरात व्यवस्थापन**
रोहित जाधव

**निर्मिती**
अनिता चांदेकर

**कार्यालय**
१, अल्फा, महात्मा गांधी रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ५७.
दूरध्वनी : ०२२-२६१२२४७५
ई- मेल : editorial@parlekar.com
वेबसाईट: www.parlekar.com
www.facebook.com/AamhiParlekar
aamhiparlekarblog.wordpress.com

ही पत्रिका श्री. ज्ञानेश चांदेकर यांनी संकेत प्रकाशनसाठी सी.सी. प्रिंटर्स, ३०, कामदार शॉपिंग सेंटर, मोंगीबाई रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०० ०५७ येथे प्रकाशित केली.

अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.



# संपादकीय...

प्रिय पार्लेकर,

या वर्षीचा वार्षिक विशेषांक आपल्या हाती देताना मला विशेष आनंद होत आहे, त्याचे तसेच कारणही आहे. १७ ऑक्टोबर १९९१ रोजी 'आम्ही पार्लेकर'चा पहिला अंक प्रकाशित झाला त्याला ह्या वर्षी तब्बल ३० वर्षे झाली. पार्ल्याविषयीचे प्रेम आणि अमाप उत्साह ह्या (प्रचंड) भांडवलावर सुरु केलेला हा नाविन्यपूर्ण प्रयोग पार्लेकरांनी आपला मानला, डोक्यावर घेतला म्हणूनच टिकला आणि बहरला सुद्धा. गेल्या तीन दशकांत 'पार्लेकर'ने केवळ मासिक प्रकाशनात अडकून न पडता अनेक सामाजिक सांस्कृतिक उपक्रम सुरु केले. नवोदित गायकांसाठी सुरु केलेली संगीत रजनी, खेळाडूंसाठी सुरु केलेले क्रिकेट प्रशिक्षण केंद्र, लोक प्रतिनिधी आणि नागरिकांमधील समन्वय बैठका, वक्तृत्व स्पर्धा, अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्धचे आंदोलन, स्वच्छता मोहीम, नागरिकांचा जाहीरनामा, कथा काव्य स्पर्धा, अश्या अनेक उपक्रमांद्वारे पार्ल्याच्या विविध सामाजिक प्रवाहांवर आपला सकारात्मक प्रभाव पाडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. पार्लेकरांच्या उस्फुर्त सहभागाशिवाय हे शक्यच नव्हते म्हणूनच 'आम्ही पार्लेकर'चे यश हे समस्त पार्लेकरांच्या सामाजिक व सांस्कृतिक प्रगल्भतेचे यश आहे असे मला मनापासून वाटते. 'आम्ही पार्लेकर' सारखा उपक्रम हा पार्ल्याच्या सुपीक जमिनीतच रुजू शकतो, अन्यत्र नव्हे !

गेल्या काही वर्षात पार्ले खूप बदलले आहे असे आम्हाला नेहमीच वाटत आले आहे. म्हणूनच काही वर्षांपूर्वी जेव्हा 'पार्लेकर'चा लोगो बदलला तेव्हा 'बदलत्या पार्ल्याचे प्रतिबिंब' ही टॅगलाईन सुद्धा त्यात समाविष्ट केली. माध्यमांच्या आणि विशेषतः सामाजिक माध्यमांच्या प्रभावामुळे आपले जगणेच नव्हे तर आपला जगण्याविषयीचा दृष्टिकोनही पूर्णपणे बदलून गेला आहे. कोव्हीड मुळे तर सर्व जगाचा चेहरामोहराच बदलून गेला आहे. ह्या सततच्या बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे व आपली लोकाभिमुकता कायम ठेवणे हे आमच्या सारख्या 'मीडिया हाऊस' समोर मोठे आव्हान होते, आहे आणि पार्लेकरांच्या संपूर्ण सहकार्यामुळेच हे आव्हान पेलणे शक्य होत आहे हे नमूद करायला मला विशेष आनंद होत आहे.

इतकी वर्षे झाली पण अजूनही पार्ल्यातील सर्व प्रवाहांपर्यंत, सर्व गुणिजनांपर्यंत आम्ही पोहोचलो असे मला वाटत नाही. खरंच पार्ले म्हणजे प्रतिभेचा विस्तीर्ण जलाशय आणि गुणांची खाणंच आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. मात्र याचा अर्थ असा कोणी काढू नये की आपल्या पार्ल्यात सर्व आलबेल आहे, कुठलेच प्रश्न नाहीयेत. वेळोवेळी आम्ही पार्ल्यातील सामाजिक प्रश्नांना व्याजपीठ दिले आहे, चुकीच्या गोष्टींविरुद्ध 'पार्लेकर'ने नेहमीच आवाज उठवला आहे. माध्यमांचे ते कर्तव्यच आहे व ते आम्ही प्रामाणिकपणे करत राहू. 'आम्ही पार्लेकर'ची पत्रकारिता ही फक्त पत्रकारितेसाठी नसून पार्ल्यासाठी आहे, पार्लेकरांसाठी आहे व नेहमीच राहील !

येणारे नवीन वर्ष सर्व पार्लेकरांना सुखाचे व भरभराटीचे जावो ही सदिच्छा !

आपला,
**ज्ञानेश चांदेकर**

visualize **life** with healthy **eyes**

# PENDHARKAR EYE CLINIC



**Facilities Available**

- Stitch less Cataract Surgery
- Lasik
- Retina Examination
- Superspeciality Consultation
- OCT
- Fundus Photo
- Glaucoma workup
- Dry Eye workup
- Perimetry
- Corneal Topography
- Yag Laser
- Green Laser
- Optical Shop

## Dr.Madhura Pendharkar

**MBBS, MS Ophthalmologist / Eye Surgeon**
**Fellowship in Cataract & Refractive Surgery**

**Time : 5.00 pm to 9.00 pm**

**Call for Eye Checkup**

Satya Bldg, Sahakar Rd, Next to Sangita Ellipse,
Opp. Sahavas CHS, Vile parle (E)

8007197766

# अनुक्रम


**...आणि गवसले सोनेरी क्षण**
रजनी वेलणकर.............................................८

**सुदेश हिंगलासपूरकर - 'ग्रंथाली' चा उपक्रमशील चेहरा**
डॉ. मृण्मयी भजक.........................................१३

**ही फक्त सुरवात आहे**
अनुश्री क्षिरसागर..........................................१८

**पर्यटन व्यवसाय - नव्या दृष्टीकोनाची गरज**
दीपक आचार्य.............................................२३

**'आम्ही पार्लेकर'ने समाजाला जागते ठेवले**
अशोक पानवलकर.........................................२८

**'आम्ही पार्लेकर'चे तीन दशकांचे साहित्य संचित**
माधवी कुंटे................................................३२

**'आम्ही पार्लेकर' - नवोदित कलाकारांचे हक्काचे व्यासपीठ**
वैशाली सामंत.............................................३६

**पार्ले 'क्रीडानगरी' होण्यासाठी 'आम्ही पार्लेकर'चे महत्त्वाचे योगदान**
मिलिंद पूर्णपात्रे...........................................३८

**बिटकॉइन - सत्य आणि मिथकं**
सतिश जोशी...............................................४२

**अमेरिकन शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या संधी**
प्रकाश जोशी ..............................................४८

**न्यूज मेकर्स**
**अदर पूनावाला**..........................................५२
**नीरज चोप्रा**..............................................५३
**डॉ.सौम्या स्वामीनाथन्**.................................५४
**डॉ. स्वाती मोहन**.........................................५५
प्रज्ञा काणे

**काका, सोशल मिडियावर जरा जपून !**
मुक्ता चैतन्य...............................................५८

**सफर मेघालय आणि आसामची**
संजय देवस्थळी...........................................६३


**प्राचीन भारतीय विमान विद्येचे आद्यसंशोधक - पंडित शिवकर बापूजी तळपदे**
अमेया जाधव..............................................६८

**जैव-विज्ञानाचे अर्धशतक**
सद्‌गुरू कुळकर्णी .......................................७१

# विशेष

आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
वार्षिक विशेषांक २०२१

# ...आणि गवसले सोनेरी क्षण






रजनी वेलणकर



माधुरी दिक्षित (सिनेमा - बकेट लिस्ट)

१७ ऑक्टोबर २०२१, रविवारी सकाळी मधुरा, मी आणि हे (प्रदीप वेलणकर) शिवाजी मंदिरच्या मागच्या जिन्याने रंगमंचावर पोहचलो. आमच्या मुली गौरी, मीरा आणि तीन नातू स्वागत करायला हजर होते. मधुरा आमच्या बरोबरच होती. ह्यांना क्षणभर कळलचं नाही. शिवाजी मंदिरमध्ये दुरुस्ती चालू असतांनाही रंगमंचावर थोडीशी आवराआवर करून खुर्च्या मांडलेल्या होत्या. नटराजाची मूर्ती विराजमान होती. नारळ, फुलं, हार.... पूजेची सर्व तयारी होती. मग ह्यांच्या हस्ते रंगमंचाची आणि नटराजाची पूजा झाली. नारळ वाढवला. टाळ्यांच्या नादात ह्यांचं सगळ्यांनी अभिनंदन केलं. निमित्त होतं, ह्यांना व्यावसायिक रंगमंचावर, या कलाक्षेत्रात व्यावसायिक म्हणून प्रवेश केला त्याला पन्नास वर्ष पूर्ण झाली होती. १७ ऑक्टोबर १९७१ या दिवशी त्यांच्या व्यावसायिक नाटकाचा पहिला प्रयोग झाला होता. श्री. सुरेश खरे लिखित, नंदकुमार रावते दिग्दर्शित 'एका घरात होती' या नाटकाचा पहिला प्रयोग होता. श्रीकांत मोघे, विजया मेहता, दत्ता मोने, दिलीप कुलकर्णी, कुंदा निरगुडकर (कान्हेरे), पप्पू रावते आणि यांच्यासोबत प्रदीप वेलणकरांनी या नाटकाद्वारे रंगमंचावर प्रथम प्रवेश केला होता. खरं तर आदल्या दिवशीच्या रंगीत तालमीला ह्यांचे काम वाईट झाले होते. त्यांना नाटकातून काढून टाकायचाही विचार झाला होता. पण पहिल्या प्रयोगाला मात्र त्यांचे रुपच पालटले आणि काम झकास झाले. हे असं दुसऱ्यांदा घडलं होत. शालेय जीवनात कधीही, कोणत्याही कार्यक्रमात भाग न घेतलेले प्रदीप, कॉलेज जीवनात सुध्दा या सर्वांपासून दूरच होते. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षी आईच्या आग्रही सांगण्यावरून कसे तरी एकांकिकेत काम करायला तयार झाले. संहितेचे वाचनही नीट करु न शकलेले प्रदीप, प्रत्यक्ष प्रयोगात रंगमंचावर गेले आणि अभिनय करण्यात रंगून गेले. होय, इथे आपण काहीतरी करु शकतो, आपण इथे खूप रमतो आहोत, वावरतांना सहज वाटतयं, अशी जाणीव त्यांना झाली. पण तो कॉलेजचा स्पर्धेचा रंगमंच होता आणि हा व्यावसायिक, त्यामुळे दडपण निश्चितच होतं.



विनय आपटे
(नाटक - तिची कथाच वेगळी)

प्रयोगागणिक ह्यांचा अभिनय फुलू लागला, खुलू लागला, आत्मविश्वास वाढू लागला. त्यानंतर 'संध्याछाया', 'एक होती वाघीण', 'आम्ही लटिके ना बोलू 'बॅरिस्टर', 'रंग उमलत्या मनाचे', 'पुन्हा शेजारी', 'प्रेमाच्या गावा जावे, 'रात्र उद्याची', 'तिची कथाच वेगळी', 'वन रूम किचन', 'सोक्षमोक्ष', 'हमिदाबाईची कोठी', 'अमानुष', 'महासागर ' इ. जवळ जवळ २५ ते ३० नाटकातून त्यांनी महत्त्वाच्या भूमिका अतिशय ताकदीने केल्या. एक उत्तम कलाकार म्हणून त्यांचे नाव प्रेक्षक घेऊ लागले.

१९७२ साली दूरदर्शन सुरु झाले. त्याही माध्यमात ते काम करू लागले. 'नमो भगवते वासुदेवाय' या नाटिकेत त्यांनी चापेकरची भूमिका केली. 'गजरा' या कार्यक्रमात



सुहास जोशी, विजया मेहता (नाटक - बॅरिस्टर)

अनेकवेळा त्याचा सहभाग होता. 'दाजी' ही त्यांची मालिका गाजली. 'शहाणी सकाळ' ह्या शं. ना. नवरे लिखित एकांकिकेतून ते घराघरात पोहचले. एकांकिकेचे लेखन अप्रतिम आणि सादर केली गेली अतिशय परिणामकारकरित्या, प्रेक्षकांच्या मनात या एकांकिकेने घर केलं आणि यांच्या अभिनयाची वाखाणणी झाली. आजही काही रसिक ह्यांच्या 'शहाणी सकाळ'चा उल्लेख करून त्यांचे कौतुक करतात. नव्वदच्या नंतर नवीन खूप साऱ्या वाहिन्या येऊ लागल्या आणि आता हे मालिकांमधून वेगवेगळया व्यक्तिरेखा रंगवू लागले. 'द्विधाता', 'एका हाताची टाळी', 'बोलाची कढी', 'मनाचिये गुंती', 'सौदामिनी', 'अस्मिता', 'आपलंच घरं', 'मेघ दाटले', 'ह्या गोजिरवाण्या घरात', 'साथसंगत', 'असंभव', 'पुढचे पाऊल' 'ह.म. बने तु.म.बने' इ. जवळ जवळ ४० मालिकांमधून त्यांनी भूमिका केल्या आणि गाजलेल्या मालिकांमधून ह्यांच्या अभिनयाने हे ही गाजू लागले. 'श्यामराव परांजपे', 'दादासाहेब', 'अप्पा' या नावाने लोक



सयाजी शिंदे, ईला भाटे (रात्र उद्याची - नाटकाची तालिम)

त्यांना ओळखू लागले. अनेक तरुणांना आपले वडील 'शामराव परांजपे' सारखेच आहेत असं वाटत असे. 'कुछ खोया कुछ पाया' ही हिंदी मालिकाही गाजली.

चित्रपट क्षेत्रात मात्र ते खूप उशिरा आले. तरीही 'वजीर', 'मी अमृता बोलतेय', 'जोशी की कांबळे', 'सत्य सावित्री -सत्यवान', 'ढोलताशे', 'चौर्य', 'अनाहत', '७ रोशन व्हिला', 'ठाकरे', 'सायकल', 'डॉ. काशिनाथ घाणेकर', 'बकेट लिस्ट' इ. मराठी चित्रपटात त्यांनी आपल कसब दाखवलचं. 'सावली' हा त्यांचा चित्रपट मराठी आणि कोकणी भाषेत झाला आणि त्याला राष्ट्रपती पुरस्कारही मिळाला. अमराठी लोकांमध्ये ते प्रसिध्द झाले ते 'सिंघम' या हिंदी चित्रपटातील DGP च्या भूमिकेमुळे. लोक कुठेही भेटले की त्यांचा डायलॉग म्हणून दाखवतात आणि ह्यांना म्हणायला सांगतात. 'पेज थ्री', 'रिस्क', 'अतित', 'सम्राट' इ. हिंदी चित्रपटातूनही त्यांनी आपला ठसा उमटवला. 'डी.एस.के.', 'इनो', 'इंडिगो पेंट', 'घडी डिटर्जंट' अशा काही जाहिरातीही केल्या. आकाशवाणीवरील अनेक कार्यक्रमातून त्यांनी आपल्या आवाजाच्या योगदानाने ते कार्यक्रम उठावदार केले. प्रामाणिक, मेहनती, आपल्या कामावर श्रध्दा ठेवणारे प्रदीप आज अविरत ५० वर्षे या क्षेत्रात काम करीत आहेत आपली 'एअर इंडिया'ची नोकरी ३४ वर्षे ११ महिने सांभाळून नोकरीच्या ठिकाणी असोत किंवा रंगमंचावर, ते सगळीकडे आपलं पूर्ण म्हणजे १०० टक्के योगदान देत असतात. आजही ७४ व्या वर्षी सकाळी ८ ते रात्री १० पर्यंत ते शुटिंगला तक्रार न करता अगदी आनंदाने जातात. कोणत्याही क्षेत्रात ५० वर्षे यशस्वी कारकीर्द करणे ही सोपी गोष्ट नाही आणि या कलाक्षेत्रात तर नाहीच नाही. पण ह्यांनी एअर इंडियामध्ये असतांना आणि तिथून निवृत्त झाल्यावरही आजतागायत सतत काम केले आणि अजूनही काम करण्याची जबरदस्त इच्छा आहे. त्यांनी कलाक्षेत्र गाजवलेच पण स्वतःचे छंदही जोपासले. 'क्रिकेट' आणि जुनी हिंदी गाणी ऐकणे, हे त्यांचे आवडीचे विषय त्याचाही आनंद ते स्वतः घेतात आणि इतरांनाही देतात. वडील म्हणून त्यांनी तिघी मुलींना भरभरून दिलं आणि समृद्ध केलं. स्वतःच्या पायावर उभ राहण्याचं सामर्थ्य दिलं आणि कौतुकही केलं. आता नातवंडांचे कौतुक जास्त.

आज या दिवशी रंगमंचाची पूजा झाल्यावर त्यांना अगदी भरून आलं. हे सगळं त्यांना अनपेक्षित होतं. तीन नातवांनी त्यांना शाल पांघरून त्यांचा सत्कार केला. शिवाजी मंदिरच्या कर्मचारी वर्गानेही पुष्पगुच्छ देऊन त्यांचे



सिनेमा - सायकल

अभिनंदन केले. त्यांना मनोगत व्यक्त करायला सांगितल तर त्यांना गहिवरून आलं होतं. सगळ्या पन्नास वर्षांच्या आठवणीने मनात



अजय देवगन (सिनेमा - दबंग)



वंदना गुप्ते (नाटक - रंग उमलत्या मनाचे)



रिमा (सिनेमा - सावली)

कोलाहल माजले होते, गलबलून आलं होतं. आनंद मनात मावत नव्हता. तो त्यांनी अगदी मोजक्या शब्दात व्यक्त करून पुन्हा ह्या रंगमंचावर काम करण्याची संधी मिळो अशी इच्छाही व्यक्त केली.

शिवाजी मंदिरला येण्यापूर्वी आम्ही त्यांच्या



आनंद अभ्यंकर (या गोजिरवाण्या घरात)

पहिल्या नाटकाचे लेखक श्री. सुरेश खरे यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. तसेच त्यांची सहकलाकार सौ. कुंदा निरगुडकर कान्हेरे हिच्याही घरी जाऊन भेट घेतली आणि तिला आमच्या आनंदात सहभागी करून घेतले. (कोरोनाचा काळ म्हणून सुरक्षेच्या कारणास्तव विजयाबाईंची भेट घेऊ शकलो नाही) हया सर्व क्षणांनी ह्यांना खूप समाधान, आनंद मिळत होता. ह्या पन्नास वर्षांच्या वाटचालीत त्यांना त्यांची आई मंगला वेलणकर, वडील दत्तात्रय वेलणकर, बहिणी उज्वला, रश्मी, ज्योती आणि पत्नी म्हणून मी ह्या सर्वांकडून खूप प्रोत्साहन, पाठीवरती कौतुकाची थाप सदैव मिळत गेली. ही पन्नास वर्षांची कारकीर्द यशस्वी झाली कारण नाटक, चित्रपट, मालिका या सर्वच माध्यमात त्यांना प्रतिभावंत लेखक, सर्जनशील दिग्दर्शक आणि गुणी कलावंताचा सहभाग लाभला आणि मार्गदर्शन मिळालं आणि म्हणूनच त्यांची कला बहरत गेली. प्रेक्षकांनीही उदंड प्रेम दिलं. आता या टप्प्यावर त्यांची या क्षेत्रातील कामगिरी अशीच यशस्वी होत राहो ही सदिच्छा व्यक्त करते. यांच्या या सुवर्णमहोत्सवी वाटचालीचा आणि एक संवेदनशील माणूस म्हणून त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या सर्व प्रियजनांना त्यांचा खूप अभिमान आहे आणि त्यांच्या यशस्वी वाटचालीला सलाम आहे.



रोहित शेट्टी



सुहिता थत्ते (मालिका - मेघ दाटले)

**रजनी प्रदीप वेलणकर**
माजी शिक्षिका - पार्ले टिळक विद्यालय
अभिनेत्री
संपर्क : ९८१९७ ८७०७३

**Introducing the finest flavors of home cooked food by BAAYOS,**
enjoy the taste of wholesome home cooked food at your comfort.
Pamper your taste buds with our cloud kitchen's Premium Special / One Pot Meal Cuisines

# BAAYOS™

## HOMELY COMFORT FOOD

### INTERNATIONAL CUISINE

***Mexican Burrito Bowl***
***Italian Lasagna***
***Thai Curry (Red & Green)***
***Arabic Falafal / Hummus and Salad***

### VEGETARIAN CUISINE

***Veg & Paneer Biryani***
***Maharashtrian Thali***
***Masale Bhat***
***Valache Birde***
***Alu Wadi***
***Kothimbir Wadi***
***Shrikhanda Puri***
***Puran Poli***

### NON - VEGETARIAN CUISINE

***Fish Tikhale***
***Crab Masala***
***Keema Masala***
***Biryani - Chicken / Prawns / Mutton***
***Sukha Mutton - Chicken***

Designed by Freepik



**Call / Whats app for 1 Pot Meals & Weekend Special Combos for Family.**

# 8424049041

Delivery charges extra.

An Initiative By

Ocean®
Transworld Logistics Pvt. Ltd.

# थेट भेट

आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
वार्षिक विशेषांक २०२१



# सुदेश हिंगलासपूरकर - 'ग्रंथाली' चा उपक्रमशील चेहरा



डॉ. मृण्मयी भजक

ग्रंथालीचे प्रमुख विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर हे ग्रंथालीशी चार दशकांहून अधिक काळ जोडले गेलेले आहेत.चेहऱ्यावर सदैव हास्य, आणि व्यक्तिमत्वात उत्साह भरभरून ओसंडणारा.एक वाचक चळवळ चालविणे, दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन करणे, नवनवीन उपक्रम हाती घेऊन ते राबवणे, याबरोबर सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे, नव्या जुन्या माणसांना जोडत हा अवलिया चालला आहे. यावर्षीच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात ★प्रकाशक म्हणून ग्रंथालीच्या कार्याबद्दल★ त्यांचा संमेलनाच्या अध्यक्षांच्या हस्ते विशेष सत्कार आहे. त्याहूनही मोठी बाब म्हणजे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात सहभागी होण्याचं हे त्यांचं सलग पंचेचाळीसावं वर्ष ! त्यांचा प्रवास जाणून घेणं म्हणजे ग्रंथालीचा पट उलगडणे. निवेदिका, लेखिका डॉ मृण्मयी भजक यांनी घेतलेली ही छोटेखानी मुलाखत.

**प्रश्न: ग्रंथालीची सुरुवात १९७४ साली झाली आणि तुम्ही १९७६ पासून ग्रंथालीशी जोडले गेलात, ते आजतागायत. तुम्ही ग्रंथालीशी कसे जोडले गेलात?**

ती एक रोचक गोष्ट आहे .तेव्हा चळवळ वगैरे फार काही माहित नव्हतं .मुळात माझं वयही कमी होतं . मी जेव्हा ग्रंथालीशी जोडला गेलो तेव्हा जेमतेम पंधरा वर्षांचा होतो . नववी पास झालो होतो . दिनकर गांगलांच्या घरी मी पेपर टाकत असे . गिरणी कामगार संपामुळे वडिलांची नोकरी गेली होती आणि मला नोकरीची गरज होती . एकदा माझी आई मला गांगलांकडे घेऊन गेली आणि म्हणाली ,'याला तुम्ही काहीतरी शिकवा , याला नोकरीची गरजही आहे' दिनकर गांगल वृत्तपत्रात काम करत असल्यामुळे त्यांच्याकडे पेपर टाकणे वगैरे असे काम असेल असे तिला वाटले असावे . गांगल त्यावेळी कुर्ल्याच्या नेहरू नगरात राहत आणि आमचं घरही तिथंच होतं . मी रुजू झालो तेव्हा ग्रंथालीची नव्याची नवलाई होती. सुरुवात झाली ती पत्र पोस्टात टाकून ये, कुणाला पुस्तकं देऊन ये अशा कामांनी, त्यावेळी अशोक जैन, जगन फडणीस, सुधीर नांदगावकर, वसंत सोपारकर अशी अनेक मंडळी नेहरू नगरात राहात होती आणि वरचेवर गांगलांच्या घरी येत असत . सुरवात झाली खरी , पण त्याला पुढे काय आणि कसे वळण लागेल याची त्यावेळी काहीच कल्पना नव्हती . माझा सहभाग १९७६ पासून सुरू झाला. मधले एक वर्ष ग्रंथालीबरोबरच प्रभात चित्र मंडळाची कामे करत होतो. आजपर्यंतचा प्रवास हा उत्तम राहिला आहे.

**प्रश्नः सुरवातीला ग्रंथाली ही एक चळवळ होती, तिला संस्थेचं रूप कसे मिळाले? पुस्तक निर्मितीमध्ये ग्रंथाली कसे उतरले?**

पहिली तीन वर्षे ग्रंथाली चळवळ म्हणून होती. त्यानंतर त्याची रीतसर चॅरिटी कमिशनरकडे नोंदणी करण्यात आली. ग्रंथालीचे पहिले अध्यक्ष



विजय तेंडुलकर होते. खरंतर ग्रंथालीला महाराष्ट्रातील प्रकाशकांनी प्रसिद्ध केलेली पुस्तके वाचकांना रास्त दरात उपलब्ध करून द्यायची होती. परंतु त्यासाठी प्रकाशकांचा उत्साह म्हणावा तितका चांगला नव्हता. पुढे ग्रंथालीने आपण पुस्तकं प्रकाशित करावी ती वाचकांना सवलतीत द्यावी असे ठरवले. बलुतं, उपरा, सिंहासन, सत्तेचे मोहरे, साखरपेरणी अशी पुस्तके प्रकाशित करून वाचकांना सवलतीत दिली. ग्रंथालीची सुरुवात ७४ साली झाली. ७५ साली कराडच्या संमेलनात दुर्गाबाई भागवत यांचे 'डुब' हे पुस्तक प्रकाशित केले. ते ग्रंथालीने प्रकाशित केलेले पहिले पुस्तक . २५ रुपये वाचकांकडून घेऊन त्यांना त्यात चार पुस्तके मिळतील असे सांगण्यात आले. वाचक सभासदांना पुढे अशोक जैन यांनी संपादित केलेले पुस्तक, दीनानाथ मनोहर यांचे 'रोबो' हे पुस्तक, 'उध्वस्त क्षितिज' हे वसंत साठे यांनी लिहिलेले पुस्तक , 'राज कपूर आणि यांचे चित्रपट' अशी चार पुस्तके दिली. पुस्तक प्रकाशनाबरोबरच दरवर्षी २५ डिसेंबरला ग्रंथाली आपला वाचकदिन साजरा करत आली आहे.अजूनही हा वाचक दिन म्हणजे सर्व साहित्यप्रेमींसाठी लेखक, वाचकांसाठी आनंदमेळा असतो .

**प्रश्नः तुम्ही गेल्या चार दशकांहुन अधिक काळ वाचन संस्कृती रुजविण्याचे काम करताय. लहानपणापासून तुम्हाला वाचनाची गोडी होती का?**

लहानपणी मला वाचनाची अशी म्हणून खूप आवड नव्हती. वाचन हे फक्त वर्तमानपत्रापुरते मर्यादित होते. मात्र खेळाकडे जास्त कल होता.सर्व प्रकारचे मैदानी खेळ खेळायला मला फार आवडे . आणि खेळात गतीही होती .

**प्रश्न : आता किती वाचता? काय वाचायला आवडतं?**

आता आत्मकथन किंवा वेगळ्या विषयावर अनुभवकथन असे वेगळे लिखाण वाचायला आवडते. दर रविवारी सगळ्या वर्तमानपत्रांच्या पुरवण्या आवर्जून वाचाव्याशा वाटतात.

**प्रश्नः ग्रंथाली कार्यकर्ता, ते विश्वस्त ते प्रमुख विश्वस्त हा प्रवास सांगा .**

ग्रंथालीतील सुरुवातीचा प्रवास हा प्यून ते कार्यकर्ता असा होता . नंतर ग्रंथालीतील मंडळींनी मला १९९३ साली विश्वस्त म्हणून सहभागी करून घेतले आणि त्यानंतरही तेवढ्याच उत्साहात हा प्रवास सुरु आहे .मी स्वतः पुढाकार घेऊन काही कामे करत राहिलो . काही अडचणी येतात , पण त्यातून मार्गही निघत असतात .

**प्रश्नः १९८२ साली ग्रंथ यात्रा काढली गेली. दीड महिन्यांच्या या यात्रेमध्ये तुमचे काम महत्वाचे होते त्याबद्दल आणि यात्रेबद्दल.**

१९८२ ची ग्रंथयात्रा काढली त्यावेळी माझ्याकडे जबाबदारी ग्रंथालींच्या मंडळींबरोबर प्रकाशकांच्या पुस्तक वितरणाची होती . तसंच दौऱ्यात मागून येणाऱ्या लेखक व पुस्तक असलेल्या बसची स्थानिक पातळीवर केलेली व्यवस्थेची पाहणी करणे ही होती . यात्रेतील उपक्रमांना प्रसिद्धी देता येते का हे पाहण्याचे काम ही माझ्याकडे होते. माझाही तो पहिलाच अनुभव होता. यात्रेत महाराष्ट्रातील मान्यवर लेखक व लेखकांची महाराष्ट्रातील प्रकाशकांनी केलेली पुस्तके यांचा सहभाग होता. कित्येक ठिकाणी पुस्तकांची वाट बघत वाचक थांबलेले असायचे. या यात्रेची सांगता पुण्यात टिळक रोडवर झाली. यात बाबासाहेब पुरंदरे, ना.धों. महानोर, जब्बार पटेल, सतीश आळेकर अशी मान्यवर मंडळी सहभागी झाली होती आणि वाचकांना आवाहन करत होती. 'बघता काय सामील व्हा'. मंतरलेले दिवस होते ते. यानंतरच्या मधल्या काळात ग्रंथालीने महाराष्ट्राभर पुस्तक वितरणाची सेंटर सुरू केली. त्यानिमित्त त्या त्या गावात लेखकभेट चर्चासत्र व प्रकाशन समारंभ आयोजित केले.

**प्रश्नः १९८५ साली ग्रंथमोहळ ही ग्रंथालीची यात्रा गाजली होती. त्या यात्रेच्या आठवणी अजूनही अनेकांकडून ऐकायला मिळतात. कोणकोण मंडळी त्यात सामील झाली होती? किती लेखक प्रकाशक होते?**



१९८५ साली ग्रंथालीने ग्रंथमोहळ हा अभिनव उपक्रम राबविला होता. यात लेखक, वाचक, कार्यकर्ते व महाराष्ट्रातील प्रकाशकांची पुस्तके घेऊन महाराष्ट्रातील ५० ठिकाणी तीन दिवसांची ग्रंथप्रदर्शने व त्याला जोडून कार्यक्रम राबविण्यात आला होता. त्यासाठी ग्रंथालीने एस.टी. महामंडळाच्या बसेस घेतल्या होत्या. त्याची सांगता मुंबईत करण्यात आली. मला वाटतं, जगात अशा प्रकारचा उपक्रम या उत्साहात कुठेच घडला नसेल.

**प्रश्नः ग्रंथालीचे प्रतिनिधित्व करत तुम्ही,१९९३ साली पहिली अमेरिका वारी केली. बी एम एम अधिवेशनात ग्रंथालीच्या पुस्तकांचा स्टॉल पहिल्यांदा अमेरिकेत लागला. तो अनुभव सांगा**

१९९३ साली अमेरिकेत बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन होणार होते. त्यासाठी

मुंबईतील प्रकाशक संघटनेचे प्रतिनिधी जाणार होते. त्यांनी  तिथे स्टॉल घेतला होता. ग्रंथालीस असे वाटले की, या अधिवेशनात आपणही स्टॉल घेऊन जावे व आपली पुस्तके अमेरिकेतील वाचकांना उपलब्ध करून द्यावीत. माझ्यासाठी अमेरिकेचा व्हिसा मिळवणे, इतर खर्च अशी



अनेक आव्हानं होती. अनेक लोकांना ही गोष्ट अशक्यप्राय वाटत होती. पण मला व्हिसा मिळाला, आणि अमेरिकेत कॉन्व्हेंशन साठी जाण्याची नांदी झाली. आज तीन हजारच्या वर अमेरिका  स्थित लोकांशी माझा चांगला स्नेह जुळला आहे . कुठेही खंड न पडता, सलग पंधरा बी एम एम अधिवेशनाना मी जात आहे. १३ साली यानिमित्ताने पूर्वी 'रुची' (आता शब्द रुची) मासिकाचा विशेषांक प्रसिद्ध केला. त्यानंतर सातत्याने दर दोन वर्षांनी निघणाऱ्या बीएमएम कन्व्हेंशनला ग्रंथाली आपला स्टॉल घेऊन सहभागी होते. यातूनच ग्रंथालीने अमेरिकेत स्थायिक असलेल्या मंडळींची तीसहून अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत.

**प्रश्न: आजवर अनेक दिग्गज लोकांचा स्नेह तुम्हाला मिळाला त्याबद्दल**

ग्रंथालीच्या निमित्ताने वाचकदिन / पुस्तक प्रकाशन समारंभ / ग्रंथप्रसारयात्रा यानिमित्ताने कुसुमाग्रज, पु.ल. देशपांडे, श्रीराम लागू, कुमारगंधर्व, आशा भोसले, शरद पवार, सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, गुलजार अशा मान्यवर मंडळींना भेटता आले, त्यांच्याशी बोलता आले. माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांची पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने भेट झाली. भारतातील सहा राज्यपाल, राष्ट्रपती-उपराष्ट्रपती यांच्या  बरोबर प्रकाशन समारंभात सहभागी होता आले. हे सर्व ग्रंथालीमुळेच  शक्य



होऊ शकले.

**प्रश्न: २००० नंतर नवीन शतकामध्ये, अनेक गोष्टी बदलल्या. जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञान, आंतरजाल अशा नवीन गोष्टी उदयाला आल्या, त्याचा ग्रंथ निर्मिती, ग्रंथविक्री वर कसा परिणाम झाला?**

२००० नंतर एकूणच छापील शब्दाला-पुस्तक, मासिके, वर्तमानपत्रे यांना वाचकांचा प्रतिसाद कमी कमी होत चालला  आहे. अन्य माध्यमे उपलब्ध झाल्यामुळे त्यातून  वाचन घडते आहे. मराठी माध्यमातून येणारी नवीन पिढी कमी होत चालली आहे. या सर्व गोष्टींचा ग्रंथविक्रीवर परिणाम झालेला जाणवतो.

एकेकाळी पुस्तकांच्या प्रती छापण्याची  संख्या जी होती ती आता  निम्याने  खाली आलेली आहे.

**प्रश्न: कोवीड काळ हे एक नवीन आव्हान होते, ते कसे पेलले?**

खर तर कोविड काळ हे जगासमोर मोठे आव्हान होतेच. याच काळात ग्रंथालीने काही आधी ठरवलेली पुस्तके डिजिटल माध्यमातून प्रकाशित केली. 'साहित्याच्या  पारावर' हा कार्यक्रम यू - ट्यूबच्या माध्यमातून  वाचकांना उपलब्ध करून दिला. यात  लेखक व वाचक दोघांचाही सहभाग असतो. याच जोडीला 'ग्लोबल ग्रंथसफर' हा जागतिक साहित्याची ओळख करून देणारा राजीव श्रीखंडे यांचा कार्यक्रम  सुरू केला. दिवाळीत अंक निघतील का? दिवाळीपहाटचा कार्यक्रम होईल काय? असे वातावरण असताना ग्रंथालीने निवडक पाच दिवाळीअंकांना घेऊन योजना आखली व त्याला



जोडून 'पत्रास कारण की' हा डिजिटल माध्यमातील दिवाळीपहाट वाचकांना बघण्यास उपलब्ध करून दिला. या उपक्रमात महाराष्ट्रभरात २३०० वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिला. अशीच योजना आम्ही यावर्षीही राबवली. याच धरतीवर ग्रंथालीने मागच्या वर्षी निवडक वाचकांना सहभागी करून डिजिटल माध्यमातून वाचकदिन साजरा करून जगभरातील वाचकांना पाहण्यास उपलब्ध करून दिला.



**प्रश्न: या सगळ्या प्रवासात कुटुंबाची साथ कशी मिळते आहे?**

लग्नाआधी, आई, बहिणी यांनी नेहमीच कामाला प्रोत्साहन दिले होते. लग्नानंतर पत्नी शोभा हिची भक्कम साथ राहिली. पुणे विद्यापीठाच्या एका उपक्रमाच्या वेळी तर मुलगी सई ही फक्त सात महिन्यांची होती.

तिला घेऊन आम्ही तो उपक्रम केला होता. आताही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरताना बऱ्याचदा पत्नी आणि मुलगी सई ह्या बरोबर असतात.

**प्रश्न: यापुढचे मनसुबे काय आहेत?**

ग्रंथालीने पहिल्या यात्रेची चाळिशी साजरी करावी आणि पन्नाशीचा मोठा महोत्सव साजरा करावा, अशी सध्याची योजना आहे. त्याला जोडून दरवर्षी नियमित होणारे उपक्रम चालू ठेवावे असा मानस आहे. ग्रंथालीला पन्नास वर्षे पूर्ण होतील . पन्नाशीनंतर नवीन वाचकांना काय हवे आहे याचा शोध घेऊन पुढचा निर्णय घ्यावा असे सध्यातरी आखले आहे. ग्रंथाली नेहमीच वाचक, लेखक, नवीन साहित्यिक यांना जुन्या नव्या माध्यमातून जोडत राहील.


**डॉ मृण्मयी भजक**

ह्या होमिओपॅथी तज्ञ आहेत. दूरदर्शन सह्याद्री वर निवेदिका म्हणून त्या छोट्या पडद्यावर दिसत असतात. अनेक हिंदी, इंग्रजी, मराठी कार्यक्रमांचे निवेदन त्या मुंबई, पुणे, दिल्ली अशा ठिकाणी करत असतात. 'अमेरिका खट्टी मीठी', 'चुटकीभर गंमत' ही त्यांनी लिहिलेली दोन पुस्तके प्रकाशित आहेत.

संपर्क : ९४२२५ ३५०८४

# GOLDEN GATE TO IIT

*"Making your dreams come true since 2005"*

- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals**: Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice**: Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development**: Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 40**. Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

## Our Top Scorers : 2020 Batch


Abhishek Mungekar
IIT Gandhinagar



Anokhi Mehta
IIT Bombay


Mihir Dharap
IIT Palakkad

## Our Top Scorers : 2019 Batch


Shreyas Nadkarni
IIT Bombay


Om Prabhu
IIT Bombay


Atharva Varde
IIT Guwahati


Omkar Nadkarni
IIT Madras

## Our Faculty


Prof. Vinayak Antarkar
B.Tech IIT Bombay

Mathematics


Prof. Manoj Karmarkar
M.Tech IIT Bombay


Prof. Indraneel Naik
M.Tech NIT Trichy

Physics


Dr. U.R. Kapadi
Ph.D. IIT Bombay


Prof. Tarun Ahirwar
B.Tech ISM Dhanbad

Chemistry

**Contact**: Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
**Address**: Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056



# ही फक्त सुरवात आहे



अनुश्री क्षिरसागर

एक छोटा मुलगा आपल्या समवयीन मैत्रिणीबरोबर सायकलवरून गावात राहणाऱ्या दुसऱ्या मित्राच्या घरी गेला होता. तिथे त्याला एका गोष्टीचं आश्चर्य वाटलं की त्यांच्या घरात पुस्तकंच नव्हती. असं कसं घर? पुढे मोठं झाल्यावर लक्षात आलं, घरं अशीच असतात. आपली कॉलनी अपवाद आहे. हा मुलगा म्हणजे भारतीय राजनीतिज्ञ श्री प्रकाश जावडेकर तसेच सुप्रसिद्ध शिक्षण तज्ञ डॉ. प्राची जावडेकर यांचे सुपुत्र श्री आशुतोष जावडेकर. आशुतोष यांचा जन्म आणि बालपण पुण्यातील पत्रकार नगर येथे गेलं. त्यांचे शेजारीपाजारी जे त्यांच्यासाठी काका-मावशी वगैरे होते, ते पुण्यातील नामवंत वृत्तपत्रातील संपादक-उपसंपादक वगैरे होते आणि त्या सर्वांकडे पुस्तकांच्या भिंती होत्या.

आशुतोष हे स्वतः कवी, लेखक, संगीतकार, समीक्षक आहेत. व्यवसायाने डेंटिस्ट आहेत. त्यांचं स्वतःच्या कवितेला चाल देऊन गायलेलं वीण हे गीत किंवा लयपश्चिमा सारखं सदर किंवा समीक्षेच्या प्रस्थापित नियमांना छेद देत लिहिलेलं समीक्षा पर लेखन वा ! म्हणताना हे पाहताना त्यांच्या कामाचा आवाका आपल्याला चकित करतो. त्यामुळे डिसेंबरच्या विशेषांकासाठी त्यांची मुलाखत घेण्याचं नक्की केलं. आशुतोष यांनीही त्यांच्या व्यस्त दिनक्रमातून दोन तास काढून मुलाखतीसाठी भरपूर वेळ दिला आणि दिलखुलास गप्पा मारल्या. त्या शब्दबद्ध करून आपल्यापुढे ठेवत आहे.

आशुतोष यांची आई डॉ. प्राची जावडेकर कॉमर्स कॉलेजमध्ये प्राध्यापिका होत्या. त्यांनी त्या काळात मॅनेजमेंट विषयावर खूप लेखन केलं. त्यांची या विषयावर चार पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत. इंदिरा गांधी इन्स्टिट्यूटच्या सतरा-अठरा कॉलेजेसच्या त्या डीन होत्या. हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये त्यांचे दोन शोधनिबंध प्रासिद्ध झाले आहेत. सध्या स्वतःची





consultancy चालवत आहेत. वाचक म्हणून त्या चांगल्या होत्याच. पण मुलाची वाचनाची आवड ओळखून त्या-त्या परिस्थितीत जशी जेवढी पुरवता येईल तेवढी ती पुरवली.

त्या काळातील आसपासच्या वाचन संस्कृतीबद्दल आणि संस्कारांबद्दल सांगताना आशुतोष म्हणतात, आई नेस वाडिया कॉलेजमध्ये प्राध्यापिका होती. प्रो शेख प्रिन्सिपल होते एकदा आईसह मी कॉलेजात गेलो असताना चटकन् म्हटलं, ग्रंथालयात माझ्यासाठी काहीच पुस्तकं नाहीत. तेव्हा प्रोफेसर शेख यांनी कॉमर्स कॉलेजमध्ये स्टाफने आवर्जुन वापरावीत, त्यांच्या लहान मुलांना द्यावीत, यासाठी ग्रंथालयासाठी लहान मुलांसाठीची पुस्तकं विकत घ्यायला लावली.

आपल्यावरील वडिलांच्या प्रभावाबद्दल बोलताना ते म्हणतात माझ्यावर वडिलांचा प्रभाव खूप आहे. माझा आवाज त्यांच्या सारखा आहे इथपासून सुरुवात होते. बाबांच्या आयुष्याचे मी दोन भाग करतो. एक घरातले, एक राजकारणातले. ते दोन्ही फ्रंट्सवर उत्तमच आहेत. राजकारणातले बाबा सर्वांनाच ठाऊक आहेत. घरात त्यांनी मुलांवर जाणून-बुजून संस्कार केले. घरात दहा पद्धतीची माणसं यायची-जायची. बाबा त्यांची आवर्जुन ओळख करून देत. चहापाणी आणून द्यायला सांगत. तेव्हा अगदी वैताग यायचा. आपण वेटर आहोत का असं वाटायचं. आता मागे वळून पाहताना जाणवतं, तो मुलांना समाजाची ओळख करून देण्याचा एक छान मार्ग होता. त्यांच्याकडे समाजातली, राजकारणातली असंख्य माणसं, कार्यकर्ते, अनेक कामं घेऊन येत. त्यांच्या चर्चा कानावर पडत. त्यामुळे हळूहळू सभोवतालचं जग, राजकारण कळायला लागलं. आशुतोष म्हणतात, तोपर्यंत मी एकांतप्रिय होतो. हळूहळू मला समाज आवडायला लागला, मी समाजाभिमुख झालो.

आशुतोष लहान असताना बाबा ज्या पक्षात होते, तो भाजप एक संस्कारक्षम असा पक्ष होता. पक्षांतर्गत कौटुंबिक वातावरण होतं. त्यामुळे अनेक नेते, त्यांची पुण्यात शिकायला असणारी मुलं, अशी सर्वांची घनिष्ठ मैत्री होती. आशुतोष आणि धाकटा भाऊ अपूर्व यांना बाबा राजकीय प्रवासांना, निवडणूक प्रचाराला घेऊन जात. अशा प्रवासात इतिहास-भूगोलाची परीक्षा घेत. खूप लहानपणापासून या भ्रमंत्या होत असल्याने स्थानिक राजकारणाची माहिती असेच. बाबा सांगायचे, चला इथे ही ही शेतं दिसत आहेत. असे असे प्रश्न आहेत. मग तुला काय वाटतं? पाच मिनिटांचं भाषण करायचंस किंवा येथे पवनचक्क्या दिसत आहेत. त्यावर दहा मिनिटं बोला. त्यामुळे आशुतोष यांच्यातला परफॉर्मर घडत गेला. ते म्हणतात, मी फक्त लेखक नाही, परफॉर्मर आहे. पंधराशे ते दोन-अडीच हजाराचा लोकसमुदाय मला सहज आत्मसात करता येतो. मी अनेक ठिकाणी भाषण करतो, लयपश्चिमासारखे कार्यक्रम करतो. मुळात लेखक म्हणून न राहता ही जी माझी व्याप्ती वाढली, त्याचं मोठं श्रेय बाबांना आहे.

**प्रश्न : आशुतोष, तुमचं लिखाण वाचताना जाणवतं की जगातल्या बऱ्याच भाषांमधलं लिखाण तुम्ही वाचलं आहे. जेव्हा तुमची मातृभाषा पक्की असते तेव्हा तुम्ही इतर कोणतीही भाषा चांगल्या प्रकारे आत्मसात करू शकता. हे खरं आहे का?**

आशुतोष : यात दुमत आहे. माझं प्राथमिक शिक्षण, बाल मंदिर शिक्षण शाळेत मराठी माध्यमात झालं. पुढचं शिक्षण त्याच संस्थेच्या गरवारे हायस्कूलमध्ये झालं. पाचवीपासून आम्हाला सेमी इंग्लिश होतं. माझी आई कॅम्पमधल्या कॉलेजमध्ये प्राध्यापिका होती त्यामुळे तिच्या कॅम्पमधील ख्रिश्चन-पारशी मित्र-मैत्रिणी, सहप्राध्यापक यांच्याकडे जाणं, त्यांच्या



घरचं वेगळं वातावरण, इंग्रजी पुस्तकं, ती चाळणं, याचा नकळत प्रभाव पडत होता. यामुळे शाळेतून टेक्निकली एबीसीडी जरी पाचवीपासून शिकवलं गेलं, तरी इंग्रजी साहित्य, बालसाहित्य



याविषयीची चर्चा आधीपासूनच कानावर पडत होती. एकदा अक्षरओळख झाल्यावर झपाट्याने इंग्रजी तसंच इंग्रजीत भाषांतरित साहित्य वाचायला सुरुवात केली. त्यासाठी शाळेतूनही आमच्यावर विशेष परिश्रम घेतले गेले. त्यामुळे भाषेचं प्रेम तयार झालं. एक मजेशीर आठवण आहे २०१९ मध्ये जेव्हा आशुतोष स्पेनमध्ये फिरत होते, तेव्हा आठवडाभरात कॅफेमधून जेवढे म्हणून स्पॅनिश न्यूज पेपर्स मिळतील तेवढे वाचत बसत. ते म्हणतात मुळात मला शब्दांचं प्रेम आहे. शब्दांचं, नादाचं आणि अर्थातच त्यांच्या अर्थाचं. त्यामुळे ते असलं की आपपरभाव रहात नाही. कुठलीही भाषा असली तरी अभिव्यक्ति तीच राहते. कदाचित याच ओढीने पुढे त्यांनी एमए विथ इंग्लिश केलं.

**प्रश्न : तुम्ही एकाच वेळी कवी, संगीतकार, गायक, लेखक, समीक्षक आणि त्याच वेळी डेंटिस्टही आहात. असा तुमचा आवाका खूप मोठा आहे. मनाला चकित करतो. यातली तुमची कोणती ओळख तुम्हाला जास्त आवडते ?**

आशुतोष : माझी ओळख एका वाक्यात आहे. मी लिहितो गातो आणि दात काढतो आणि हा क्रम महत्त्वाचा आहे. मी पहिला लेखक आहे. शब्दांमधला माणूस आहे. त्याच्या खाली मी गाण्यातला माणूस आहे. मला सूर लागतातच. त्यामुळे मी गातो, संगीत देतो. आधी मुळात ऐकतो. आधी मुळात वाचतो. त्यानंतरची ती अभिव्यक्ती असते. त्यानंतर मी तिसरा आहे तो दात काढतो. तो मी पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून नाही स्वीकारला. मला ते क्षेत्र आवडतं. पण नंबर तीनला. जाणीवपूर्वक केलेली निवड आहे ती. पुढे माझ्या कामांचा परीघ जर वाढत गेला तर कालांतराने कदाचित मी डेंटिस्ट्री कमी करीन. दोनच तास क्लिनिकमध्ये जाईन. पण सोडणार नाही. एवढे सांगून आशुतोष नमूद करतात, की आजकाल डेंटिस्ट हा फॅमिली डॉक्टरसारखा झाला आहे. घरातले सगळे त्याच्याकडे जातात. कधी मुलं आई-वडिलांची तक्रार करतात, तर कधी आपलं दुःख सांगून आया रडून मोकळ्या होतात. कधी पुरुष व्हॉट्सअपवर मेसेज पाठवून व्यक्त होतात. ते म्हणतात बीडीएस मध्ये मी अनेक विषयात पहिला आलो. पण नंतर एमडीएस किंवा परदेशात उच्च शिक्षण हा पर्याय मी निवडला नाही. आपल्याला काय करायचंय हे निश्चित डोक्यात होतं. आता पुढचं शिक्षण घ्यायचं आणि ते साहित्यक्षेत्रात हे नक्की होतं. त्यानंतर साधारण पस्तिशीत एम ए इंग्लिश करायला घेतलं. एकीकडे लिखाण चालू होतं, पुस्तकं येत होती. हे सगळं परस्परपूरक आहे अशी एकसंधतेची जाणीवही डोक्यात होती.

शब्दप्रभू आशुतोष यांची आजवर पाच पुस्तकं प्रसिद्ध झाली आहेत. अंतर्नाद अंकासाठी आशुतोष यांनी ए आर रहमान वर आनंद सरोवरीची कमळे हा लेख लिहिला होता. तो राजहंस प्रकाशनच्या श्री माजगावकर यांना अतिशय आवडला. त्यांच्या सुचवण्यावरून समकालीन बॉलीवुड संगीताचा आपल्या परीने वेध घेणारं पुस्तक नवे सूर नवे तराणे 2011साली आलं.. दुसरी कादंबरी मुळारंभ. हिच्या लेखनाची सुरुवात खरं म्हणजे नवे सूर च्या आधीच, लेखकाच्या कॉलेज काळात झाली. पण आजच्या तरुण पिढीलाही काळाला सुसंगत वाटते आहे, आवडते आहे.. आशुतोष यांनी लोकसत्ता-लोकरंग मधून वर्षभर एक सदर लिहिलं लयपश्चिमा. पाश्चात्य संगीताचा समाजशास्त्रीय, सांगीतिक तसेच भाषिकदृष्ट्या आलेख म्हणजे हे सदर. पुढे या सदराचं पुस्तक आलं. पुस्तक करताना काही लेख भर करून मोठे केले तर काही नवीन प्रकरणांचा समावेश झाला. यावर त्यांनी अनेक दृक्श्राव्य पद्धतीने कार्यक्रम केले आहेत. मराठीत लयपश्चिमा या नावाने आणि इंग्रजीत रिदम ऑफ द वेस्ट या नावाने. त्याला आजवर खूपच चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पार्ल्यात एक कार्यक्रम झाल्यावर एक आजोबा आले. त्यांनी सांगितलं माझा नातू सारखा जस्टीन वीबर ऐकतो आणि मला अजिबात आवडत नाही. तुमचा कार्यक्रम ऐकल्यावर समजू शकलो, की त्याला का आवडतो.. साहित्याचा मनापासून आस्वाद घेणारा आणि तो घेताना वाचकालाही वा!! अशी दाद द्यायला लावणारा समीक्षा लेखसंग्रह वा!! म्हणताना.. तसंच अलीकडेच नवीन आलेलं पुस्तक विशी तिशी चाळिशी. हीदेखील दोन्ही सदरं दैनिक लोकसत्ता लोकरंग मध्ये प्रसिद्ध झाली होती. नंतर त्यांची पुस्तकं आली. आजवर सगळी पुस्तकं गाजली आहेत आणि त्यांना मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत.

आशुतोष यांनी विलायती वाचताना हा कोर्स घेतला. त्याचं कारण विचारताच ते म्हणतात, आजवर इंग्रजी तसंच भाषांतरित साहित्य वाचून मला खूप आनंद मिळाला आहे. आपल्याकडे बरीच मंडळी दिसतात, जी उत्तम वाचतात. जी. ए, ग्रेस वाचतात. पण इंग्रजी वाचताना अडखळतात. पाठ फिरवतात. आपण त्यांना काही टिप्स देऊया, मोकळं करून इंग्रजीभिमुख करूया, या विचाराने हा कोर्स घेतला. आजवर आशुतोष यांनी मुंबई विद्यापीठ, मदुरा कॉलेज, शिवाजी विद्यापीठ, इत्यादी ठिकाणी इंग्रजीत साहित्य विषयावर भाषणे दिली आहेत.

**प्रश्न : आजचे काही तरुण चांगले लेखकही काही वेळा फार भडक-उत्तान लिहीतात हे खरंच आवश्यक असतं का?**



यावर आशुतोष म्हणतात, वाचकाच्या

मनात अशी मतमतांतरं येणे हे लेखकाचं श्रेय आहे. कुठल्याही भाषेत नवीन पिढीतली मंडळी लिहितात ही आधी चांगली गोष्ट आहे. त्यामुळे परंपरा पुढे जात राहते. नवीन लेखक.. मग ते कुठल्याही भाषेतले.. काही धक्के देणार, ते कधी कधी तुम्हाला पचणार, कधी कधी ते धक्के त्यांनी मुद्दाम दिलेले असणार, कधी कधी ते अनाठाई असणार, कधी कधी ते योग्य असणार.. हे सगळं गृहीत धरायचं. आजची तरुण मंडळी खूप चांगलं लिहीत आहेत आणि वेगवेगळ्या माध्यमांतून लिहीत आहेत. जसं फेसबुक वर खूप जण संगीत, भाषा अशा वेगवेगळ्या विषयांवर सिरीज चालवत आहेत.

आशुतोष यांचा गाण्याचा प्रवास कवितेतून झाला आहे वयाच्या चौथ्या वर्षी त्यांनी पावसावर कविता रचून तिला चाल लावून सर्वांना गाऊन दाखवली होती. सन २००० ते २००८-९ पर्यंत त्यांनी खुप उत्कटतेने कविता लिहिल्या आहेत. अनेक मासिकांतून, दिवाळी अंकांतून त्या प्रसिद्ध झाल्या आहेत. पण अजून तरी कवितासंग्रह करावा असा विचार मनात आलेला नाही. अभिषेकी यांचे शिष्य, श्री शेखर कुंभोजकर यांच्याकडे थोडंफार शास्त्रीय संगीत शिकायला मिळालं. त्यांनी कुठल्याही परीक्षा द्यायला लावल्या नाहीत. पण रागाच्या स्वरांतून राग कसा उभा करायचा ते शिकवलं. त्यातूनच माझ्यातला संगीतकार तयार झाला असावा असं आशुतोष म्हणतात.



आशुतोष यांचा संतसाहित्याचा विशेष अभ्यास आहे. त्यातून डॉ. अतींद्र सरवडीकर यांच्यासह गायलेला निर्धार हा संत तुकारामांचा अभंग, दोघे हे टिळक आणि आगरकर यांच्या मैत्री विषयीचं गीत, आस हे सावनी रविंद्र यांच्यासह गायलेलं प्रेम गीत.. अशी तीन आशुतोष यांनी संगीत दिलेली आणि गायलेली गीतं अनुक्रमे एबीपी माझा, दैनिक सकाळ आणि 9X झक्कास या माध्यमांतून प्रसिद्ध झाली आहेत आणि खूप गाजली आहेत. वास्तविक वीण हे त्यांचं पहिलं गाणं. हे कुठेच रिलीज झालं नाही. सिंगापूरला शूट केलंय. निर्धार हा अभंग सोडून बाकी सारी गीते आशुतोष यांनीच लिहिली आहेत. आस हे गीत इंग्रजी आणि मराठी दोन्ही भाषांतून आहे लवकरच एक हिंदी गाणं ही येत आहे.

**प्रश्न : लेखन, गीत, संगीत या व्यतिरिक्त असं अजून काही क्षेत्र आहे का की जिथे काही नवीन शिकायला, प्रयोग करायला आवडेल ?**

आशुतोष : नाही. पण माणूस म्हणून खूप अनुभव घ्यायचेत. मी, माझी पत्नी मानसी आणि मुलगी आरोही आम्हाला तिघांनाही भरपूर फिरायला आवडतं. आरोही लहान असली तरी छान फिरते. तिचं एक स्वतंत्र जग असतं. मागच्या वर्षी कोविड काळात सारी लहान मुलं कडक लॉक डाऊन मध्ये होती, तेव्हा आरोहीने हस्तलिखित वर्तमानपत्र चालवून, त्याचे व्हॉट्सअप ग्रुप बनवून, अखेरीस एका चळवळी प्रमाणे ती तीन ते चार हजार लोकांपर्यंत पोहोचली. त्याची मीडियानेही दखल घेतली आहे. पत्नी मानसी प्राध्यापिका आहे एमबीए कॉलेजमध्ये शिकवते नुकतीच दीड-दोन वर्षांपूर्वी Organization Management या विषयात डॉक्टरेट संपादन केली आहे. I am a proud father and a proud husband.

**प्रश्न : एकंदरीत खूप छान आयुष्य जगत आहात. एवढ्या सगळ्या गोष्टींसाठी वेळ कसा काढता?**

आशुतोष : दु:ख सर्वांना असतं. त्यात मानसिक दृष्ट्या अडकायचं नाही, म्हणजे तुम्हाला वेळ बराच मिळतो. मी टीव्ही जास्त बघत नाही. एका वेळेला अनेक क्षेत्रात असल्याने भरपूर मेहनत घेतो. तिसरी गोष्ट म्हणजे स्वयंशिस्त. मी आय-पॅड वर लिहायला घेतलं की मला दुसरं काही आठवत नाही. मी रेकॉर्डिंग स्टुडिओत गेलो की फक्त गाण्यातला माणूस असतो. क्लिनिक मध्ये फक्त डॉक्टर. तिथे कधीही माझ्या जाहिराती पुस्तकांची कव्हर्स वगैरे दिसणार नाहीत.

**प्रश्न : पत्नीचा या साऱ्या उद्योगांना असणारा पाठिंबा ?**

आशुतोष : मुळारंभ तिलाच अर्पण केली आहे. तो पाठिंबा कायम, जबरदस्त आणि सशक्त आहे. तो नुसता मागून नाही, तर सोबत राहून दिलेला पाठिंबा आहे. मी गमतीत म्हणतो, की मी पु ल देशपांडे नाही. पण आमची बायको रत्नागिरीची असल्याने सुनीताबाई आहे.

**प्रश्न : वडिलांप्रमाणे राजकारणात वळावं असं वाटलं नाही का ?**

आशुतोष : नाही माझा तो पिंड नाही मी करतोय त्या क्षेत्रात बाबांनी जसं त्यांच्या क्षेत्रात कर्तृत्व दाखवलं तस दाखवायला नक्की आवडेल आणि आत्ता तर कुठे सुरुवात आहे. I am just about to begin ही फक्त सुरुवात आहे. आजवर केलंय तो पाया आहे आणि अजून जवळजवळ निम्मं आयुष्य हातात आहे.

आशुतोष, तुमची सारी ईप्सिते साध्य होवोत. 'तुम्हाला पुढच्या वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा'!!

**अनुश्री क्षिरसागर**
व्यावसायिक गायिका, निवेदिका
लेखिका


संपर्क : ९८२०५ ०९७६२



A Promise for "A Unique Experience" "एक सुखद अनुभव"
Eiffel Tower PARIS
Tulip Gardens, Europe Tour
Mt. Titlis Swiss - Europe Tour
SANKALP TOURS & TRAVELS An Unique Experience
UPCOMING TOURS
STATUE OF UNITY
DEC 11
Deluxe Express Tour & Economy Tour 1N/2D
DELUXE PACKAGE: Stay @ Narmada Tent City
ECONOMY PACKAGE: Stay @ Unity Village Deluxe Tents
Marwad - Mewad
23 DEC 2021 | 18 JAN 2022
Dec 29, 2021 @ Jan 24, 2022
rajasthan
The Land of Royal Hearts
Mt. Abu | Udaipur | Pushkar | Jaipur | Jodhpur | Jaisalmer | Bikaner
EGYPT 7N/8D
11 JAN 2022
4N/5D
DUBAI
19 JAN 2022
6N/7D
ANDAMAN
29 JAN 2022
7N
Kerala
21DEC 2021 | JAN & FEB 2022
PARIS 6N/7D
SWISS
APR-JUN 2022
SANKALP TOURS & TRAVELS An Unique Experience
Benefits
Honest Pricing
Well Planned Itinerary
Unique Experience
International Escorted Group Tours
Domestic Holiday Packages
Customised Family / Group Packages
Honeymoon / Family Specials
SANKALP™ TOURS & TRAVELS An Unique Experience
www.sankalptoursandtravels.com
sankalptours1212@gmail.com
Travelwithsankalp
Sankalp Tours&Travels
77381 21381 | 84336 62699 | 022 2611 8901




# पर्यटन व्यवसाय - नव्या दृष्टीकोनाची गरज



दीपक आचार्य

साठ वर्षांपूर्वी मराठी मध्यम वर्गीयांसाठी पर्यटन म्हणजे, असले तर आपल्या, नाहीतर मामाच्या गावी जाणे आणि अगदीच जर सुस्थिती असेल तर माथेरान किंवा महाबळेश्वर म्हणजे डोक्यावरून पाणी. ह्याहून जास्त लांब जाण्यासाठी लागणारे नियोजन, माहिती, वेगवेगळ्या शहरात राहण्याची आणि खाण्या-पिण्याची चांगली सोय, जाण्या-येण्याच्या तिकिटांची सोय , त्या ठिकाणी फिरण्याची सोय ह्या सगळ्या गोष्टी, एका कुटुंबप्रमुखाला जमवून आणणे अतिशय जिकिरीचे होते. शिवाय एका कुटुंबासाठी ह्या सगळ्याचा खर्चही आवाक्याबाहेरचा असायचा. त्यातून, आयत्यावेळी काही अडचणी आल्या तर परमुलुखात त्याचे निवारण करणेसुद्धा अत्यंत अवघड होत असे आणि त्यामुळेच की काय मराठी मध्यमवर्गीय माणूस फारसा ह्या फंदात पडत नसे.

मराठी माणसाला पहिल्यांदा महाराष्ट्राबाहेर पर्यटनासाठी घेऊन जाणारे पहिले नाव, म्हणजे श्री. राजा पाटील ह्यांची 'राजा राणी ट्रॅव्हल्स' ह्याबद्दल कोणाच्याच मनात शंका असण्याचे कारण नाही. त्यांचे बोट धरून मध्यमवर्गीय मराठी माणूस पहिल्यांदा पर्यटनाला महाराष्ट्राबाहेर पडला असे म्हटले तर वावगे होणार नाही. भारताचे नंदनवन काश्मीर, जे मराठी माणसाने फक्त हिंदी सिनेमांमधून पाहिले होते तेथे प्रत्यक्ष जाण्याचा आणि त्या अद्भुत निसर्गाला जवळून अनुभवण्याचा भाग्ययोग लिहिणारी संस्था म्हणजे राजा राणी ट्रॅव्हल्स. आजही काश्मीर म्हटले तर श्री. राजा पाटील ह्यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही एव्हढे ह्या दोघातले नाते गहिरे आहे. पण त्यांनी नुसते काश्मीरच नव्हे, तर मराठी माणसाला संपूर्ण भारतभर फिरवले. शिस्तबद्ध आणि काटेकोर नियोजन ह्यामुळे त्यांची प्रत्येक सहल हा पर्यटकांसाठी एक अतिशय सुखद अनुभव असायचा.

आज त्यांनी सुरु केलेल्या ह्या पर्यटनाच्या व्यवसायाची धुरा त्यांचा सुपुत्र श्री. अभिजित पाटील अतिशय समर्थपणे वाहत आहेत. आई-वडिलांकडून वारसा हक्काने मिळालेली कष्ट, सचोटी आणि शिस्तीची धुरा देखील तेव्हढयाच जबाबदारीने अंगीकारून ते आपली वाटचाल स्वतंत्ररित्या करत आहेत. ज्या वयात मुले कॅडबरी, गोळ्या ह्यासाठी हट्ट धरतात, त्या वयात अभिजित पाटील आपल्या आई-वडिलांना सहलींच्या व्यवस्थापनात मदत करत होते. इतर मदतनिसांना जे नियम लागू होते त्याच नियमांनुसार आणि त्यांच्यासारख्याच परिस्थितीत अभिजित राहायचे. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी त्यांनी स्वतःच्या एकट्याच्या



जबाबदारीवर परदेश सहलीचे पूर्ण व्यवस्थापन केले आहे, हे ऐकून मी चाटच पडलो. अर्थात, वयाच्या ८व्या /९व्या वर्षापासून आई-वडिलांच्या देखरेखीखाली केलेली मेहनत आणि भरभक्कम अनुभवामुळेच हे शक्य झाल्याचे ते सुद्धा मान्य करतात.

खरे म्हणजे, पर्यटन किंवा पर्यटनाच्या व्यवसायात कार्यरत एखादी संस्था म्हणजे पंधरा-वीस कुटुंबांना, त्यांना हव्या त्या ठिकाणी घेऊन जाऊन, त्या पंधरवड्यासाठी त्यांची राहण्यापासून ते खाण्या-पिण्यापर्यंत सर्व व्यवस्था करून, त्यांना महत्वाच्या सर्व स्थळांची सफर घडवून, परत आपल्या घरी सुखरूप आणून सोडणे, हीच संकल्पना माझ्या आणि मला वाटते, आपल्या सर्वांच्याही डोक्यात असणार. परंतु, ह्या माझ्या रूढ आणि मूढ संकल्पनेला उभा छेद श्री. अभिजित पाटील ह्यांनी दिला. माझ्या प्रश्नार्थक आणि त्यामुळे अधिकच बावळट दिसणाऱ्या चेहेऱ्याकडे बघून त्यांनी माझे ह्या विषयावर बौद्धिकच घ्यायला सुरुवात केली.

ते म्हणाले, ' आपल्याकडे पर्यटन ह्या व्यवसायाकडे फारच संकुचित दृष्टिकोनातून बघितले जाते. खरे तर, ह्या व्यवसायाचा आवाका खूपच मोठा आहे आणि नीट बघितले तर काम करणाऱ्याला भरपूर संधी आहे कारण अजून लोकांना 'पर्यटन' ह्या संकल्पनेची पूर्ण व्याप्तीच नाही. गेल्या दोन वर्षात हे आम्हाला फार प्रकर्षाने जाणवले आहे. एक तर रूढार्थाने ज्याला तुम्ही पर्यटन म्हणता ते गेली दोन वर्षे जवळ-जवळ बंदच पडले आहे आणि प्रादुर्भाव कमी झाला तरी त्या धंद्याला पूर्ववत व्हायला कमीत कमी अजून वर्ष सहज जाईल कारण अजूनही बऱ्याच देशांचे धोरण अनिश्चित आहे आणि म्हणूनच आमचे लक्ष रूढ धंदा सोडून बाकी ज्या संध्या उपलब्ध आहेत तिथे वळवायला लागले. '

अजून थोडे खोदून विचारल्यावर त्यांनी ह्या बाबतीत थोड्या विस्ताराने सांगायला सुरुवात केली. ' तसे तर अनेक अश्या छोट्या-छोट्या गोष्टी आहेत ज्या पर्यटनाच्या आवाक्यात आहेत, पण प्रामुख्याने आपण तीन विभाग पाडून ह्याकडे बघू शकतो. असे बघा, गेली कित्येक वर्षे आपल्या देशातल्या विविध प्रदेशांमध्ये, वर्षातल्या वेगवेगळ्या वेळी अनेक धार्मिक मेळाव्यांचे आयोजन केले जाते. मग ते वाराणसीमधले योग शिबीर असो, दक्षिणेतील तंजावुरचा उत्सव असो नाहीतर गोव्याचा कार्निव्हल असो. शिवाय कुंभमेळ्यासारखे महामेळावेही असतात. ह्यातली धार्मिक बाजू थोडा वेळ बाजूला ठेवली तर असे लक्षात येईल की ह्या सगळ्यांमध्ये पर्यटन व्यवसायासाठी खूप मोठी संधी आहे. अक्षरशः लाखो लोक आपापल्या शहरातून त्या ठिकाणी जातात, कधी एक आठवडा तर कधी पंधरा दिवस तेथे वस्ती करतात. ह्या सगळ्यांची जाण्या-येण्याची, राहण्याची, रोजच्या खाण्या - पिण्याची सोय हा सुद्धा एक मोठा व्यवसायाचा भाग बनू शकतो. ह्याच्या व्यतिरिक्त आपल्या देशात, अनेक अध्यात्मिक आणि धार्मिक गुरूंची प्रवचने आणि शिबिरे भरत असतात. तेथेही अनेक लोक, अगदी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहतात आणि त्यात परत काही खास भक्तांसाठी वेगवेगळ्या मेजवान्या आयोजित केल्या जातात, तर अश्या सर्व ठिकाणी आपल्याला ह्या संध्या उपलब्ध असतात कारण, आमचे सर्व मोठ्या शहरांमध्ये असलेले हॉटेल्स, स्थानिक टुरिझम कंपन्या, विमान कंपन्या अश्या सर्वांचे असलेले संपर्क आम्हाला येथेही सहाय्यभूत होऊ शकतात. त्यांनी ह्या विभागाला ' डिव्होशनल टुरिझम' असे नामकरणसुद्धा केले आहे.

ते पुढे सांगू लागले , ' ह्याच पद्धतीने आपण स्पोर्ट्स टुरिझमकडेही बघू शकतो. आज आपल्या देशात अनेक प्रकारच्या खेळांचे राज्य, विभागीय, देश स्तरावर तसेच आंतरदेशीय अनेक सामने सतत चालूच असतात. ह्या सर्व खेळाडूंची सर्व प्रकारची सोय करून त्यांना फक्त खेळावर लक्ष केंद्रित करता येईल अशी चोख व्यवस्था करणे हा ही खूप मोठा व्यवसायाचा भाग बनू शकतो. आज आपल्याला माहिती आहे की, सर्व खेळाडूंना बायो बबल मध्ये राहावे लागते. ह्याची खास सोय आपण त्यांना देऊ शकतो, जेणेकरून सध्याच्या कोरोनाच्या काळामध्ये त्यांच्या आरोग्याची योग्य ती काळजी घेऊन त्यांना ह्या चिंतेतून मुक्तता मिळू शकते. आपण ह्या गोष्टींकडे आधी फारसे लक्ष देत नव्हतो आणि आजही बऱ्याच टुरिझम कंपन्या ह्या रूढ मार्गानेच व्यवसाय करू बघतात पण आज काळाने आपल्यासमोर जी आव्हाने उभी केली आहेत त्याचा विचार करता आम्हाला सुद्धा नवीन गोष्टी आमच्या व्यवसायात आणल्या पाहिजेत नाहीतर टिकाव धरणे मुश्किल होईल आणि म्हणूनच मी रूढ व्यवसायाच्या बरोबरच ह्या सर्व नव्या शक्यतांचा विचार करून आधीच ह्यात

शिरकाव केलेला आहे. माझी कंपनी गेल्या दोन वर्षांपासून ह्या नव्या प्रांतात काम करत आहे आणि व्यवसायाचे खूपच मोठे दालन आमच्यासाठी उघडले आहे ह्यात शंका नाही आणि ते सुद्धा ह्या कोरोनाच्या काळामध्ये.

खरेच, ज्याच्याकडे काळाच्या पुढे पाहायची शक्ती असते, जो खऱ्या अर्थाने द्रष्टा असतो त्याला तर अडचणींतसुद्धा संधी शोधता येते.

त्यानंतर ते तिसऱ्या प्रमुख विभागाकडे वळले आणि तो होता फिल्म टुरिझम. 'ह्या क्षेत्रात तर मी खूपच आधीपासून काम करतो आहे.' ह्या क्षेत्राकडे वळण्याची प्रेरणा कशी मिळाली ह्या प्रश्नाचे उत्तर देताना ते म्हणाले ,''मी माहीमच्या बॉम्बे स्कॉटिश ह्या तसे बघायला गेले तर उच्चभ्रू लोकांच्या शाळेत शिकलो. त्याचा एक मोठा फायदा असा झाला की बऱ्याच हिंदी सिनेमातील तारे-तारकांची मुले माझ्याबरोबर शिकायला होती आणि अनायसे माझी त्यांची मैत्री झाली आणि त्यांच्याशी संवाद साधत असताना, मला त्यांना चित्रीकरणाच्या वेळी, विशेषत: परदेशांमध्ये, येणाऱ्या अडचणींची माहिती झाली आणि तिथूनच ह्या क्षेत्राचा मला शोध लागला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आज परदेशात चित्रीकरण करायचे असेल तर, त्या देशातल्या परराष्ट्र व्यवहार, तसेच सांस्कृतिक खात्यांच्या अनेक प्रकारच्या परवानग्या घ्याव्या लागतात. त्याचप्रमाणे ह्यात बराच क्लिष्ट असा कागदी घोड्यांचाही समावेश असतो. बरेच देश आपल्या देशात पर्यटन वाढावे म्हणून अश्या चित्रपट निर्मात्यांना अनेक सोयी सवलती देखील देतात. ह्या सगळ्या प्रकारची मदत आम्ही चित्रपट निर्मात्यांना करतो. शिवाय, नेहमीप्रमाणेच ह्या सगळ्या चित्रपटाशी निगडित तारे-तारका, तंत्रज्ञ तसेच प्रॉडक्शन टीम ह्या सर्व लोकांना ( नाही म्हटले तरी हा सगळा गोतावळा १५०-२०० लोकांचा सहज असतो ) इथून नेणे आणि त्याचप्रमाणे तिथे प्रत्येकाच्या वकुबाप्रमाणे, त्या त्या दर्जाच्या हॉटेल्समधे राहायची व्यवस्था करणे, त्यांना तिथल्या वास्तव्यात भारतीय चवीचे खाणे-पिणे अरेंज करणे, हे देखील आम्हीच सांभाळतो.



त्याशिवाय, रोज वेगवेगळ्या हॉटेल्समधून सकाळी त्या सर्व लोकांना घेऊन चित्रीकरणाच्या जागेवर वेळेवर सोडणे आणि रात्री परत घेऊन येणे आणि त्याकरता परत वेगवेगळया प्रकारची वाहने पुरविणे म्हणजे अगदी मोठ्या बस पासून लक्झरी वाहनांपर्यंत ह्याचाही आमच्या कामात अंतर्भाव असतो. ह्या सर्व नव्या गोष्टी व्यवसायात अंतर्भूत करण्यासाठी आधी बरेच परिश्रम आम्हाला करायला लागले. विविध देशांच्या परराष्ट्र आणि सांस्कृतिक खात्यांबरोबर संपर्क साधायला लागला, त्यांच्या देशातील नियम आणि सुविधा दोन्हीचा तौलनिक अभ्यास करूनच मग पुढे जायला लागले.

सगळ्यात महत्वाचे म्हणजे, या आधी चित्रपट निर्मात्याला परदेशातील चित्रीकरणासाठी जवळपास १० ते १२ विविध एजन्सीसना संपर्क करायला लागायचा आणि त्यांच्यामधल्या ताळमेळातच त्याचा अर्धा जीव जायचा, पण आता आम्ही त्यांना ' सब दुखोंका एक ही इलाज' च्या धर्तीवर ज्याला आपण मराठीत ' सिंगल विंडो ' म्हणतो तशी सुविधा देत असल्याने त्यांना पण हे खूपच सोयीचे पडते आणि आम्हालाही व्यवसायाच्या दृष्टीने हे फायदेशीर होते.

जवळपास दोन तास झाले होते. अभिजित ह्यांच्याशी गप्पा मारताना वेळ कसा गेला कळलंच नाही. पण एका उमद्या मराठी तरुण उद्योजकाला भेटण्याचे आणि ते ही आपला व्यवसाय अतिशय निष्ठेने आणि सचोटीने करणाऱ्या, अतीव समाधान वाटले. पर्यटन ह्या व्यवसायाबद्दलची जाणीव कित्येक पटींनी प्रगल्भ झाल्याचे

मनोमन कबूल करूनच मी त्यांचा निरोप घेतला.

**दीपक आचार्य**
चार्टर्ड अकाउंटंट,
महेंद्रा कंपनीतून जनरल मॅनेजर
अकाउंट्स आणि टॅक्सेशन
या पदावरून स्वेच्छा निवृत्त

संपर्क :९३३०२५२२७

# म्युच्युअल फंड सही है !

## तुम्ही अजूनही बँकेच्या एफ डी मध्येच कमी व्याजावर पैसे गुंतवताय?

| Hybrid : Dynamic Asset Allocation Funds | |
|---|---|
| **Duration** | **Returns** |
| 3 Years | 12.04% |
| 5 Years | 10.74% |
| 10 Years | 12.39% |
| Category average returns as on 16/11/2021 | |
| Source : www.advisorkhoj.com | |

मागील परतावा येणाऱ्या काळातही कायम राहील याची शाश्वती नाही.

दीर्घावधी मध्ये म्युच्युअल फंड च्या
**बॅलन्सड ऍडव्हान्टेज फंड**
कॅटेगरी ने बँकेच्या एफ डी पेक्षा
जास्त परतावा दिलाय.

---

**तरुणांनो म्युच्युअल फंड च्या एस आई पी (SIP ) मार्फत , देशाच्या आर्थिक प्रगतीचे भागीदार व्हा. दीर्घावधी साठी SIP चालू ठेवून आपली आर्थिक उद्दिष्ट्ये पूर्ण करा.**

| MONTHLY **S I P** REQUIRED TO ACCUMULATE **ONE CRORE** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| RATE OF RETURNS | NO OF YEARS | | | | |
| | 5 | 10 | 15 | 20 | 25 |
| 12.00% | 1,23,300 | 44,650 | 21,020 | 10,880 | 5,322 |
| 15.00% | 1,14,500 | 38,020 | 16,230 | 7,540 | 3,083 |
| Start Early with small amount of SIP to achieve goal of One Crore | | | | | |

---

गुंतवणुकीची संपूर्ण ऑनलाईन प्रक्रिया **www.nileshtawde.com** वर आपले मोफत गुंतवणूक खाते चालू करा. सोबत मोफत मोबाईल अँप जिथे आपण आपली गुंतवणुकीतील वाढ कधीही पाहू शकता. म्युच्युअल फंड बद्दल सोप्या शब्दात अधिक माहिती मिळावी ह्या साठी आमचा फेसबुक ग्रुप "**म्युच्युअल फंड मराठीत** " शी जोडले जा.



**NILESH TAWDE**
GET IT ON Google Play

Connect with us
**9324543832**


म्युच्युअल फंड मधील गुंतवणूक हि बाजार जोखिमेचा अधीन असते, योजनेसंबंधित सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचा.

# पार्लेकर ३०

आम्ही पार्लेकर १९९१ पासून

वार्षिक विशेषांक २०२१

# ‘आम्ही पार्लेकर’ने
# समाजाला जागते ठेवले



अशोक पानवलकर

आजच्या ई-जमान्यातही छापील माध्यमांचा म्हणजेच इंग्रजी आणि भाषिक वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, पाक्षिके यांचा दबदबा बऱ्यापैकी कायम आहे. कोविडमुळे त्यांच्या खपात साधारण २० टक्के कपात झाली असली तरी आज ना उद्या ते वाचकही परत येतील अशी आशा आहे. कोविडपूर्व काळात म्हणजे साधारण २०१८च्या अखेरीस भारतात एक लाखापेक्षा अधिक वर्तमानपत्रांची नोंदणी झालेली होती आणि किमान २४ कोटी लोक ती वाचत होते. कोविड काळामध्ये त्यांचा खप कमी झाला हे खरे असले तरी ती वर्तमानपत्रे (कोविड काळात नाईलाजाने स्वीकाराव्या लागलेल्या) ऑनलाईन जगात अस्तंगत झाली नाहीत. याचे कारण बहुतांश वर्तमानपत्रांची विश्वासार्हता. छापील शब्दच प्रमाण मानणाऱ्यांची संख्या आजही मोठी आहे. या काळात मासिक स्वरूपात प्रसिद्ध होणाऱ्या अनेक प्रकाशनांना, विशेषतः स्थानिक पातळीवर (गाव पातळीवर किंवा मुंबई-पुणे यांचा विचार करायचा तर उपनगर पातळीवर) निघणाऱ्या प्रकाशनांना ऑनलाईन जावे लागले. तोही बदल सुमारे ७५ टक्के वाचकांनी स्वीकारला. परंतु, छापील प्रती काढून वितरीत करण्यापेक्षा ऑनलाईन ती तुलनेने कमी खर्चात अधिक लोकांपर्यंत पोचवणे केव्हाही श्रेयस्कर ठरले आहे. कोविड अजून गेला नाही, उलट ओमिक्रोनने आणखी प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या स्थितीत स्थानिक पातळीवर ही प्रकाशने टिकून राहिली याचे कारण खर्चातली बचत हे एकमेव नाही. या प्रकाशनांची नाळ वाचकांशी एवढी जुळलेली आहे की ती अशी सहजासहजी तुटणार नाही. याचे कारण ही स्थानिक प्रकाशने वाचकांच्या रोजच्या जीवनाशी, त्यांच्या जगण्याशी निगडित आहेत.

स्थानिक बातम्या, स्थानिक लोकांचे यश, स्थानिक समस्या, स्थानिक राजकारण, स्थानिक क्रीडाविश्व हे सारे इथे प्रकाशित होत राहिले. ‘लोकल इज व्होकल’ हे शब्द आज सर्रास वापरले जात असले तरी ज्ञानेश चांदेकर यांनी सुरु केलेल्या ’आम्ही पार्लेकर’ सारख्या मासिकांनी तीस वर्षांपूर्वीपासूनच हे तत्व अवलंबले आहे. शहर अथवा राज्य पातळीवर निघणाऱ्या वर्तमानपत्रांमध्ये उपनगरी वार्तांकन फारसे येत नाही. कारण त्यांचा दृष्टिकोन आणि अंक काढण्याचा हेतू वेगळा असतो. ‘आम्ही पार्लेकर’ने मात्र ‘लोकल इज व्होकल’ हाच फोकस सुरुवातीपासून ठेवला.

स्थानिक कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण हे अतिशय चांगल्या प्रकारे कव्हर करत राहिले. म्हणूनच आज तीन दशकांनंतरही ‘आम्ही पार्लेकर’ अधिक relevant राहिले



आहे. विलेपार्ले हे महामुंबईचे एक उपनगर असले तरी एक संपूर्ण मुंबईची संस्कृती इथे सापडते. 'आम्ही पार्लेकर'ने त्यातील मराठी घटकाशी जास्त जवळीक ठेवली हे अर्थातच समजण्यासारखे आहे. तीस वर्षांपूर्वी विलेपार्ले हे आजच्यापेक्षा जास्त 'मराठी' होते हे खरे आणि आज सर्व स्तरातील मराठी / बिगरमराठी लोकांनी 'आम्ही पार्लेकर'ला मोठे केले हेही खरे आहे. याचे कारण म्हणजे 'आम्ही पार्लेकर' हे केवळ घडणाऱ्या बातम्या देऊन थांबले नाही. त्यांनी बातम्या 'घडवून' आणल्या आणि लोकांना विचार करायला प्रवृत्त केले. हे मी अशा अर्थाने म्हणत आहे की विविध सामाजिक संस्थांमधील घडामोडी, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची कामे 'आम्ही पार्लेकर'ने वेळोवेळी मांडल्याचे परंतु या संस्थांमध्ये काही चुकीचे घडत असल्यास तेही स्पष्टपणे मांडले आणि तसे करताना त्यांच्या चुका ओरडून सांगायच्या असा दृष्टिकोन न ठेवता त्या चुकांवर सामंजस्याने तोडगा कसा काढता येईल, त्या चुका सुधारल्यास पार्लेकरांचाच कसा फायदा होईल हे सांगण्याचा प्रयत्न केला.

त्यामुळे 'आम्ही पार्लेकर' विरुद्ध या संस्था असे शाब्दिक युद्ध फार काळ चालले नाही. काही वेळेला संस्थेचे नाव मोठे असते, परंतु ते नाव टिकविण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत, ते होत नाहीत, तेव्हा 'आम्ही पार्लेकर' ठामपणे उभे राहिले. हे मला खूप महत्वाचे वाटते. आज अनेक संस्थांमधील विविध पदांवरील माणसे 'आम्ही पार्लेकर'शी कायमची जोडली गेली आहेत. त्यांच्या गाऱ्हाण्यांना 'आम्ही पार्लेकर' मध्ये स्थान मिळते म्हणून नव्हे तर संस्था सुरळीत चालण्यासाठी 'आम्ही पार्लेकर'ची मदत होते म्हणून !

'आम्ही पार्लेकर'ने नागरी समस्या वेळोवेळी मांडल्याच, परंतु तिथेच ते थांबले नाहीत. विलेपार्ल्यात गेली तीन दशके नगरसेवक, आमदार राहिलेल्या विविध पक्षांच्या राजकीय नेत्यांना त्यांनी एका मंचावर आणले आणि समस्या सोडविण्याच्या दृष्टीने समन्वयकाची भूमिका पार पाडली. ही फार महत्वाची भूमिका आहे. याचे कारण नागरी समस्यांविषयी नुसतीच आरडाओरड करणे फार सोपे असते.

अर्थात, आज पार्ल्यातील सर्व नागरी समस्या सुटल्या आहेत असे खुद्द राजकीय पक्ष मान्य करणार नाहीत हा भाग वेगळा. आजही अनेक ठिकाणी रस्त्यावरून किंवा असलाच तर पदपथावरून चालणे ज्येष्ठ नागरिकांना कठीण जाते. गाड्या वाटेल तिथे रस्त्यांवर पार्क केल्याने अडचण होते, पार्ले मार्केटमध्ये कोविड काळात आवश्यक असणारी शिस्त गायब झाल्यानेही फटका बसतो. आता महापालिकेची निवडणूक जवळ येत असल्याने 'आम्ही पार्लेकर'ला राजकीय लोकांना पुन्हा एकत्रित आणावे लागेल. पुन्हा (तीच) जुनी आश्वासने नव्याने घ्यावी लागतील. 'आम्ही पार्लेकर'ने सात आठ वर्षांपूर्वी नागरिकांचा जाहीरनामा प्रसिद्ध

केला होता. महापालिका निवडणुकीत आणि एकंदरच नागरी प्रश्नांमध्ये सामान्य नागरिकांचा सहभाग असायला हवा, हा त्यामागील दृष्टिकोन असावा. याच भूमिकेतून 'आम्ही पार्लेकर' कायम काम करत राहिले. गेल्या दोन दशकांमध्ये विलेपार्ले उपनगराचा, विशेषतः विलेपार्ले पूर्व भागाचा पूर्ण कायापालट झाला. रिडेव्हलपमेंट किंवा पुनर्विकास हा शब्द सर्वांच्या तोंडी येऊ लागला, रुळू लागला. पार्ल्यातले जुने बंगले, दोन मजल्यांच्या इमारती जाऊन तिथे आज टॉवर उभे राहिले आहेत. नवीन इमारत बाहेरून अतिशय आकर्षक दिसत असली तरी या पुनर्विकासामध्ये असंख्य अडचणी, तक्रारी वेळोवेळी उद्भवतात आणि काही ना काही कारणाने हा पुनर्विकास लांबतो. त्याचा फटका साऱ्या सदस्यांना बसतो आणि एकदा कोलमडलेली पुनर्विकास प्रक्रिया पुन्हा उभी करायची हे काम अजिबात साधे नसते याची जाणीव आपणा सर्वांना आहेच. म्हणूनच 'आम्ही पार्लेकर' ने गेली काही वर्षे पुनर्विकास परिषदेचे आयोजन करून पार्लेकरांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला. या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून थेट मार्गदर्शन मिळत असल्याने पार्लेकरांनीही या परिषदेला उदंड प्रतिसाद दिला. रोजच्या बातम्यांच्या पलीकडे जाऊन 'आम्ही पार्लेकर'ने एक मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावली आणि अजूनही बजावत आहे, हे महत्वाचे आहे. म्हणूनच पार्ल्याच्या बातम्या छापणारे 'गॅझेट' असे स्वरूप 'आम्ही पार्लेकर'ला कधीच आले नाही.



'आम्ही पार्लेकर'च्या आणखी एका उपक्रमाचा आवर्जून उल्लेख करायला हवा. 'आम्ही पार्लेकर' आणि Townparle.in यांनी एकत्र येऊन 'पार्लेबझार' ही संकल्पना अमलात आणली आहे. ज्ञानेश चांदेकर आणि चंदा मंत्री अतिशय नाविन्यपूर्ण पद्धतीने हा उपक्रम राबवतात. पार्ल्यातील उद्योजकांना प्रसिद्धीसाठी एक सक्षम मंच असे याचे वर्णन करता येईल.

https://parlebazaar.com/about-us/ इथे जाऊन तुम्ही अधिक माहिती मिळवू शकता आणि नोंदणीही करू शकता.

पार्ल्यात जसे कला, क्रीडा, साहित्य, अभिनय या क्षेत्रातले वेगवेगळे लोक राहतात तसेच अनेक छोट्या उद्योगांपासून मोठ्या कंपन्या चालवणारे लोकही पार्ल्यात राहतात. त्यांच्यासाठी कमी खर्चात या मंचाच्या आधारे आपला उद्योग अधिक लोकांपर्यंत नेण्याची, स्वतःची आर्थिक वृद्धी करण्याची आणि पार्लेकरांनाही 'स्थानिक' उत्पादने घेण्याची संधी मिळते. गरज असल्यास लोकांना त्यांच्या उद्योगाचे स्वतंत्र वेबपेज करून मिळते. या वेबपेजची झेप वैश्विक असल्याने त्या व्यक्तीला फायदा होतोच. या बाबतचा सगळा मजकूर हा 'आम्ही पार्लेकर'च्या नेहेमीच्या मजकुराचा भाग नसला आणि हे थोडे 'विस्तारीकरण' असले तरी ते करणे हे ज्ञानेश चांदेकर आणि चंदा मंत्री याना सामाजिक जाणिवेच्या दृष्टीने आवश्यक वाटले, हे महत्वाचे आहे. 'आम्ही पार्लेकर' आज तीस वर्षांनंतरही का महत्वाचे राहिले याची ही सगळी कारणे आहेत.

'आम्ही पार्लेकर'ने कला, क्रीडा, साहित्य, मनोरंजन, शाळा -महाविद्यालये या सर्व क्षेत्रांना वेळोवेळी न्याय दिला. असंख्य लोकांना लिहिते केले. प्रसिद्धीचा पहिला 'ब्रेक' दिला. याबद्दल त्या-त्या क्षेत्रातील लोकांनी लिहिलेच आहे. 'आम्ही पार्लेकर'ने स्वतः मोठे होत असताना अनेक पार्लेकरांना आपल्यापेक्षाही मोठे होण्यात मोलाचा हातभार लावला, त्यात आनंद मानला.

भविष्यकाळातही हेच सूत्र कायम राहील याची खात्री वाटते. 'आम्ही पार्लेकर'चे त्रिदशकपूर्तीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन आणि भविष्यकाळासाठी शुभेच्छा!

Blog : www.ashokpanvalkar.com

**अशोक पानवलकर**
चार दशकांची पत्रकारितेची कारकीर्द
३७ वर्षांच्या महाराष्ट्र टाईम्स मधल्या कारकीर्दीतून कार्यकारी संपादक म्हणून सेवानिवृत्त
तरंग, जगाच्या पाठीवर आणि नेट भेट या सदरांचे लेखन
समाज माध्यमांच्या अभ्यासात विशेष रस

संपर्क : ९९८७७ ८२३४५

# PETRIX
# Dr Gautami's
# Small Animal Clinic

*Good parenting is all about getting better at it everyday.*
*We are here to help you with better parenting and easier management.*
*So get geared up for your new friends or your old buddies accompanying you throughout.*
*let us help you provide them with better care to improve their health and give them the best life!*

## Veterinary Clinic



* Consultation and General Checkup
* Vaccination and Deworming
* Systemic Treatment
* Tick Treatment
* Dermatology
* Drop and Pickup for Animals
* Stray Animals Treatment
* House Visits
* Emergency and Critical Care

## Veterinary Diagnostics



* Blood Analysis
* Urine Analysis
* Microscopic Examination
* Histopathology
* Culture Studies
* Radiography

## Veterinary Surgery




* Dog and Cat Sterilization
* Systemic Surgeries
* In-patient Boarding
* Post OP Care and Management
* Stray Surgeries with Special Packages with Pick up and Drop Facility and Boarding

## Pet Shop



* Dog Food
* Cat Food
* Cat litter
* Dog and Cat Treats
* Dog and Cat Accessories

## Pet Spa and Grooming





* Pet Normal Bath
* Pet Tick Bath
* Pet Medicated Bath
* Pet Hair trimming
* Pet grooming

**We serve your pets with all the best possible services.**

+91 637 992 3890
gautami.sadekar@gmail.com
petrix_smallanimalclinic
Petrix Dr Gautami's Small Animal Clinic

A2, Ground Floor, Parle Colony, Sahakar Road, Vileparle East, Mumbai 57

# 'आम्ही पार्लेकर'चे
# तीन दशकांचे साहित्य संचित



माधवी कुंटे

एखाद्या उपनगराची संस्कृती, सौंदर्य म्हणजे तिथली घरं, दारं, बागबगीचे, शिक्षणसंस्था, वाचनालये, कलादालने, भव्य वास्तू हे सारं बाहेरील वस्त्रासारखं ! उपनगराचा आत्मा म्हणजे तिथले लोक, त्यांचे नातेसंबंध, त्यांच्या बुद्धीचे आविष्कार, संगीत, चित्रकला, शिल्पकला यांचा आविष्कार, लोकांची सामाजिक जाण, सामाजिक संस्थांचं कार्य, क्रीडा, कलांचे उपक्रम, हे सारं आणि बरंच काही...

विलेपार्ले नगरीचं चैतन्यदायी स्वरूप प्रतिबिंबित करणारं खास असं नियतकालिक असावं ही कल्पना ज्ञानेश चांदेकरच्या मनात आली आणि त्याने त्या कल्पनेला मूर्त स्वरूप दिलं तो सुदिन म्हणावा लागेल. तेंव्हापासून गेली तीस वर्षे अव्याहत हे मासिक ज्ञानेशने कष्टपूर्वक जोपासलं, वाढवल अगदी कोरोना काळातही डिजिटल माध्यमाच्या स्वरुपात ते पार्लेकरांना मिळत राहिलं. पार्लेकरांचं वैविध्यपूर्ण कर्तृत्व, येथील बातम्या, समस्या, संस्थाविषयक घडामोडी, या साऱ्यांबरोबर साहित्यविषयक मजकूरालाही, आम्ही पार्लेकर मधे नित्य स्थान मिळत राहिलं. पार्ल्यात अनेक नामवंत साहित्यिक, कलावंत, तंत्रज्ञ, विविध विषयातील तज्ञ उद्योजक अशा नामवंतांची मांदियाळीच आहे. या साऱ्यांनी उत्तम पुस्तके लिहिली... लिहित आहेत. या पुस्तकांचा परिचय, आम्ही पार्लेकरांमध्ये आवर्जुन दिला जातो. ही 'घरची' शाबासकी सुखावणारी आणि प्रोत्साहन देणारी असते असं साऱ्यांनाच वाटतं. पार्ल्यातील उदयोन्मुख लेखिका चित्रा वाघ, छाया पिंगे, दीपा मंडलिक, लीना माटे, अनीता नागले यांच्या पुस्तकांचा परिचय आम्ही पार्लेकर मधे आला आणि पार्ल्यात कौतुक होऊ लागलं तेंव्हा त्यांनी अशी भावना मनापासून व्यक्त केली होती.

आम्ही पार्लेकरची खासियत अशी की जगाच्या पाठीवर जिथे जिथे मूळचे पार्लेकर वास्तव्याला आहेत तिथे तिथे पार्लेकर वाचलं जातं. डॉ. (कै) दिलीप सरवटे यांनी या बाबतीत मला सांगितलेली एक आठवण नमूद कराविशी वाटते. त्यावेळी सरवटे पतीपत्नींनी पार्ल्यात नुकताच छोटा फ्लॅट घेतला होता. वास्तव्य पुण्याला असलं तरी त्यांच्या पार्ल्याला सतत वाऱ्या होत असत. आम्ही 'अर्धे पार्ले निवासी आहोत असं ते गंमतीने म्हणत. डॉ. दिलीपच्या एका पुस्तकाचा परिचय मी 'आम्ही पार्लेकर' मधे लिहिला होता. एक दिवस सकाळीच डॉ. दिलीप यांचा फोन आला. ते म्हणाले. 'आम्ही पार्लेकर' मुळे पुस्तकाला एका रात्रीत प्रसिद्धी मिळाली त्यांना त्या पुस्तकाबद्दल परदेशी वास्तव्य करणाऱ्या मित्रांचेही फोन आले होते. वर्षभरातील दहा उत्तम पुस्तकांचा परिचय वार्षिक अंकात 'वाचता वाचता वेचलेले' सदरात देण्यात येई.



अनेक उत्तमोत्तम ग्रंथांचे परिचय या सदरात आलेले आठवतात. परिचय आल्यावर ग्रंथालयात त्या पुस्तकांची मागणी वाढत असे. चोखंदळ पार्लेकरांना हे सदर आवडत असे. छोटे ललित लेख, मुलाखती इत्यादी साहित्य प्रकारांना 'आम्ही पार्लेकरमधे' नेहमी स्थान मिळतं. पार्ल्यातील लिहित्या हातांना ते हक्काचं व्यासपिठ असतं. थोडक्यात मुद्देसूद पण आशयपूर्ण ललितलेख व मुलाखतींची एक परंपरा पार्लेकरांनी अखंड चालविली आहे.

अनेक गुणीजन पार्ल्यात वास्तव्याला असल्याने त्यांच्या विशेष कर्तृत्वाची नोंद घेणाऱ्या त्यांच्या मुलाखती वेळोवेळी प्रसिद्ध होत राहिल्या त्याचबरोबर पार्ल्याबाहेरच्या थोर कलावंत साहित्यिकांच्या मुलाखतीही 'पार्लेकरच्या' वार्षिक अंकांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. पुष्परचना, वृक्षसंस्कृती, बोन्साय, पक्षीजगत, प्रवासवर्णन, अशा विषयांपासून व्यवस्थापन शास्त्र, विज्ञान, खगोलशास्त्र, मानसशास्त्र, वैद्यकशास्त्र वगैरेतील वैविध्यपूर्ण विषयांवर ललित लेख दर अंकात येत राहिले.

'शब्दसखी' हे सदर प्रा. मंगला गोखले यांनी बराच काळ चालविलं होतं. मराठी भाषेप्रमाणेच इतर अनेक भारतीय भाषा देखिल दर्जेदार साहित्याने संपन्न आहेत. त्यातील ज्ञानपीठ अथवा साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित लेखिकांच्या साहित्य कृतींचा नितांत सुंदर परिचय या सदरात दिलेला असे. या खेरीज कारणा-प्रसंगाने मंगेश पाडगांवकर, पु. ल. देशपांडे, रवीन्द्र पिंगे, जयवंत दळवी यांच्यासारख्या अनेक थोर साहित्यिकांबद्दल लेख, त्यांच्या आठवणी इत्यादिबद्दल ललित लेख येत असत. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षांबद्दल ही व्यक्तीचित्रणात्मक, किंवा त्यांच्या साहित्याबद्दलचे लेख आवर्जुन प्रसिद्ध केले जात असत. संमेलनाध्यक्षाच्या भाषणातील मुख्य मुद्यांचा परामर्श घेणारे लेखही येत असत. या खेरीज पार्लेकट्ट्यावर अनेक प्रख्यात साहित्यिकांच्या मुलाखती घेतल्या गेल्या. त्या मुलाखतींवरून लेख तयार करुन तेही वेळोवेळी 'आम्ही पार्लेकर' मधे प्रसिद्ध केले गेले. या सर्वांमुळे 'आम्ही पार्लेकर' मधील साहित्य विषयक दालन नेहमी भरगच्च राहिले.

आणखी एक साहित्य विषयक वैशिष्टपूर्ण उपक्रम 'आम्ही पार्लेकरने' अनेक वर्षे चालविला. वार्षिक अंकासाठी दर वर्षी विविध साहित्य प्रकारांसाठी स्पर्धा घेतल्या जात असत. विजेत्या मंडळींना आम्ही पार्लेकर' च्या वार्षिक अंक प्रकाशनाच्या दिमाखदार सोहळ्यात पारितोषिके दिली जात असत. ही स्पर्धा फक्त पार्लेकरांपुरती मर्यादित नव्हती त्यामुळे महाराष्ट्र भरातून स्पर्धक आपापल्या साहित्यकृती पाठवित असत. पारितोषिक प्राप्त साहित्यकृती त्या वार्षिक अंकात प्रसिद्ध होत असत. या स्पर्धामधून अनेक गुणी लेखक, लेखिका उदयाला आले. आजघडीच्या उत्तम कवयित्री, लेखिका डॉ. सुमन नवलकर यांनी या

संदर्भात माझ्याजवळ म्हटलं होतं, आम्ही पार्लेकरमधील स्पर्धेत भाग घेऊन तीन वर्षे पारितोषिके मिळाल्यावर माझा आत्मविश्वास वाढला. लिहिण्यास प्रोत्साहन मिळाले त्यामुळे मी, 'आम्ही पार्लेकरची' नेहमी ऋणी राहीन.

'आम्ही पार्लेकर' चा वार्षिक विशेषांक म्हणजे एखाद्या दिवाळी अंकासारखा दर्जेदार साहित्याने संपन्न असतो. दिवाळी अंकांचं वाचन संपतासंपता हा वार्षिकांक हाती पडतो. त्यामुळे वाचनानंद अधिक वाढतो. काही विशेषांकांवर नुसती नजर टाकली तरी त्यातील वैविध्य आणि सौंदर्य लक्षात येतं.

२०११ सालचा वार्षिकांक हा २० वर्षे पूर्ण झाल्याचा विशेषांक होता. त्यात प्रज्ञा काणे यांनी डॉ. मुग्धा कर्णिक यांची घेतलेली मुलाखत, प्रा. केशव परांजपे यांनी मुलाखतीतून शब्दांकित केलेलं नामवंत गायिका आशा खाडिलकर यांचं कर्तृत्व, व्यक्तीमत्व, गुरू ठाकुर या सुप्रसिद्ध कवीची मानसी खाडिलकर यांनी घेतलेली मुलाखत, अनेक उत्तम लेख, राजश्री बर्वे व सीमा गोरे यांच्या पारितोषिक प्राप्त कथा, वा. ना. देसाई यांची बक्षिस विजेती कविता वाचता वाचता वेचलेले सदरातील उत्तम साहित्य कृतींचा परिचय अशा अनेक गोष्टींनी या अंकातील साहित्य दालन अत्यंत वाचनीय झालं होतं.

२०१३ च्या वार्षिकांकावर नजर टाकली तर अरुणा ढेरे यांचा इंदिरा संत यांचं काव्य व व्यक्तीमत्वावरील निरतिशय सुंदर लेख, 'नीलकंठी कविता' वाचायला मिळतो. माधवी कुंटे यांची पाणी ही कथा आणि पाणी विषयक समस्यांचा वेध घेणाऱ्या लेखांचा परिसंवादात्मक विभाग आहे. राजश्री बर्वे, दीपा मंडलीक यांच्या सुंदर कथा अत्यंत वाचनीय आहेत. अभिनय देव, निखिल वागळे, डॉ. संदीप वासलेकर, स्वानंद किरकिरे यांच्या मुलाखती या प्रसिद्ध व्यक्तींचं व्यक्तीमत्व व कर्तृत्व यांवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. ॲड. किशोर जावळे यांनी 'वाचता वाचता वेचलेले' मधे त्या वर्षीच्या दहा उत्तम पुस्तकांचा परिचय करून दिला आहे.

२०१६ सालचा वार्षिकांक हा रौप्यमहोत्सवी अंक असल्याने दिवाळी विशेषांक म्हणून प्रसिद्ध झाला. त्यातील लेख आणि मुलाखती बहारदार आहेत. 'साहित्यरंग' हा विभाग अनुवादित कथा कवितांनी सजला आहे. बा ते जगदंबा ही रोहिणी हट्टंगडी यांची चित्रा वाघ यांनी घेतलेली मुलाखत वैशिष्टपूर्ण आहे. पुस्तकांच्या भेटी पुस्तके येती हा ग्रंथपाल मंजिरी वैद्य यांचा लेख मुळतून वाचावा एवढा सुंदर आहे.

संस्कृत भाषा आणि साहित्य यांच्या बद्दल डॉ. आसावरी बापट यांनी लिहिलेला लेख अभ्यासपूर्ण आहे. 'मंतरलेलं मालदीव' हे अमोल उकिडवे याचं नितांत सुंदर प्रवासवर्णन आणि श्रीराम शिवदेकर यांचा 'अद्भूत अंकोरवॅट' हा माहितीपूर्ण, रंजक लेख वाचायला मिळतो. या दोन्ही लेखांना उत्तम छायाचित्रांची जोड मिळाली आहे. अफलातून प्रवासाला शब्दांमधून जिवंत केलं आहे अरुंधती भेडसगांवकर यांनी ! 'विष्णूशास्त्री चिपळूणकर' 'मराठी भाषेचा शिवाजी' हा चिपळूणकरांच्या मराठी भाषाविषयक कार्याचा आढावा घेणारा सुधीर महाबळ यांचा लेख माहितीपूर्ण मनोज्ञ आहे. या सर्व अंकांच साहित्य दालन ही खरोखर रसिकांसाठी मेजवानी आहे.

अगदी अलिकडचा म्हणजे २०१९ चा वार्षिकांक ! या अंकात अशुतोष उकिडवे यांची सुंदर कथा, मोस्साद या इरवाएली गुप्तहेर संस्थेचे अभ्यासपूर्ण परिचय करून देणारा ॲड. किशोर जावळे यांचा लेख 'इस्त्राएलच्या मराठी कनेक्शन' बद्दल सविता दामले यांनी लिहिलेला सुंदर ललित लेख, अनेक उत्तम मुलाखती अशा वैविध्यपूर्ण साहित्याने हा अंक फार वाचनीय झाला आहे.

तीस वर्षाचं 'आम्ही पार्लेकरचं' हे अस संपन्न साहित्य संचित ! त्याचा वेध घ्यावा तेवढा थोडाच आहे. तीन दशके पार करून चौथ्या दशकात प्रवेश करणा-या 'आम्ही पार्लेकरचं' आणि संपादक ज्ञानेश चांदेकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन !

लेखाची पूर्ती करतांना 'आम्ही पार्लेकर' ही कविता सादर करीत आहे........

'आम्ही पार्लेकर'
महाराष्ट्राचे भूषण
गाव विलेपार्ले असे
'आम्ही पार्लेकर' खास
त्याचे मुखपत्र असे ।।१।।
विलेपार्ले बुध्दीमंत
विलेपार्ले सुसंस्कृत
'आम्ही पार्लेकर' सांगे
त्याची कीर्ती जगतात ।।२।।
कला क्रीडा नी साहित्य
सा-या घटनांचे वृत्त
कर्तृत्वाचे परिचय
देई पार्लेकर नित्य ।।३।।
आम्ही पार्लेकर' असे
विलेपार्ल्याची शान
कार्य घडू दे सतत
वाढो गावाचा या मान ।।४।।


**माधवी कुंटे**

ज्येष्ठ साहित्यिक.

आत्तापर्यंत कथा, कादंबर्या ,कविता , ललितलेख संग्रह, वैचारिक लेखसंग्रह, बालसाहित्य अशा विविध प्रकारची ९१ पुस्तके प्रसिद्ध.

संपादन क्षेत्रातही काम.

आकाशवाणी, दूरदर्शन चित्रपट आदी दृक्श्राव्य माध्यमांसाठी लेखन.

विविध साहित्यिक संस्थांमध्ये विविध पदांवर काम.

अनेक पुरस्कार मानसन्मान प्राप्त.

संपर्क : ९८१९६ ७९५५०



# भावबंध

(ट्रेडमार्क नंबर : १५३४२४९) - स्थापना : २००५



## ''भावबंध'' च्या माध्यमातून सर्व विवाहोत्सुक वधूवरांना सुवर्णसंधी

## फ्री सर्विसेस

- नोंदणी
- "www.bhavbandh.com" ह्या वेब साईट वर फोटो सहित तुमची माहिती ठेवण्याची सोय
- वेब साईट द्वारे तुमच्या पसंतीच्या स्थळांना मेसेज पाठवण्याची सोय
- नोंदणीकृत स्थळांची माहिती मॅचिंग स्थळांपर्यंत पोहोचवली जाईल
- आमच्या पेड मेम्बर्सकडून विचारणा झाल्यास तुमचे कॉन्टॅक्ट डिटेल्स त्यांना दिले जातील

## पेड मेंबर्ससाठी अधिक सर्विसेस*



- वेब साईट द्वारे तुमच्या पसंतीच्या स्थळांना संपर्क करण्याची सोय
- भावबंध च्या ''संवाद'' ह्या व्हाट्स ॲप ग्रुप मध्ये नोंदणी
- फक्त वधूवरांसाठी वेगळा व्हाट्स ॲप ग्रुप
- प्रोफशनल फोटोग्राफर मार्फत पोर्टफोलिओ सर्विसेस
- विडिओ मिटींग्स द्वारे सुयोग्य वधू वरांच्या गाठीभेटी
- वेगवेगळ्या लोकेशन्सवर आयोजित केलेल्या कॅम्प द्वारे प्रत्यक्ष भेटण्याची संधी
- व्हाट्स ॲपच्या माध्यमातून वेळोवेळी मुलामुलींचे समुपदेशन

*टर्म्स आणि कंडिशन्स लागू होतील.




: संपर्क :

**सौ. भावना जोगळेकर**

संचालिका

वेळ : मंगळवार, गुरुवार, रविवार सकाळी १० ते १

सुट्टीचा दिवस : शनिवार


**संपर्क क्रमांक : ९७६९४५७२२३, ९९३०१७१७५७**

Email : bhavbandh@yahoo.com

‘आम्ही पार्लेकर’

# नवोदित कलाकारांचे हक्काचे व्यासपीठ





वैशाली सामंत

आम्ही पार्लेकरचा प्रवास सुरु झाला तेव्हा नवीन सांस्कृतिक कार्यक्रम झाला होता। माझी छोटीशी ओळख एका छोट्याआर्टिकलद्वारे आम्ही पार्लेकर मध्ये आली तेव्हा माझ्या घरच्यांना प्रचंड अभिमान वाटला होता।

तेव्हा मी पहिल्याप्रथम स्टेजवर गाणे सादर केले तिथून माझे आणि आम्ही पार्लेकरचे ऋणानुबंध।

हळूहळू सगळ्या पार्लेकराना आम्ही पार्लेकर अंकाची सवय झाली।

अर्थात। अत्यंत चोखंदळ अशा पार्लेकराना बातमी पुरवणे म्हणजे सोपे नव्हे। कुठेही अतिशयोक्ती/ अतिरंजकता न करता योग्य त्या शब्दात योग्य माहिती पोचवने ही एक कला आहे आणि हा समतोल आम्ही पार्लेकरने नेहमीच साधला आहे असे मी म्हणेन।

पार्ल्यात झालेल्या राजकीय सांस्कृतिक व्यावसायिक घडामोडी थोडक्यात त्या महिन्यातील पार्ल्यातील सर्व घडामोडी एका ठिकाणी वाचायला मिळतात।



अख्ख्या जगात ओळख होणं एक वेगळा आनंद असतो आणि आपण जिथे राहतो तिथे आजूबाजूला आपले कौतुक होणे याचे अप्रूप काही औरच असते ।


आधीच पार्ल्याला सांस्कृतिक वारसा खूप दांडगा आहे।

त्यामुळे कलाकारांची इथे कमतरता नाही। आम्ही पार्लेकरने पार्ल्यात कलाकार आणि सांस्कृतिक कार्यक्रम याना नेहमीच प्राधान्य दिलेले आहे। हक्काच व्यासपीठ दिल आहे। वेगवेगळे विषय फार विचारपूर्वक निवडून त्यावर योग्य ती माहिती मिळवून मगच ती छापण्याचा अट्टाहास पार्लेकरच्या वृत्त संपादकांचा असतो।

काळानुसार बातमी पुरवण्याच माध्यम बदलत जात आणि अस असतानाही पेपर चालू ठेवण ही काही सोपी गोष्ट नाहीये आणि पेपरा बरोबरच आता आम्ही पार्लेकरनी स्वतःचा डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू केलेला आहे त्यासाठी सुद्धा तुमची सगळी टीम प्रयत्नशील असते काळानुसार आपला मूळ गाभा तसाच ठेवून ऍडॉन होत जाणं ही फार महत्त्वाची गोष्ट आम्ही पार्लेकर करत आहे . माझ्या आम्ही पार्लेकरच्या पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा आणि माझ्याकडूनही असच एक कलाकार म्हणून चांगलं काम होत जावो की जिथे आम्ही पार्लेकरनी त्याची नोंद घेत जावी हीच इच्छा आहे.

**वैशाली सामंत**
पार्श्वगायिका, संगीतकार

संपर्क : ९८२१४ २०३०५
insta@vaishalisamant




## Buying 1 Cr. Property to Earn monthly 18k-20k Rent?

**You can also Consider Mutual Funds to get regular money.**

**Invest 1 Cr & Get Per month Regular Fixed 50,000/- Tax Efficiently.**

**Also**

**At the end of 10 years Value Can Appreciate as per Below:**

**@ 8% Value Can : 1.25 Crs**

**@ 10% Value Can : 1.60 Crs**

**@ 12% Value Can : 2.00 Crs**

**It's New for you & want to experience it?**
**Invest 20 Lacs & Start Getting Per month Regular Fixed 10000/- Tax Efficiently.**

**Mutual funds investments are subject to market risk.**

# पार्ले 'क्रीडानगरी' होण्यासाठी
# 'आम्ही पार्लेकर'चे महत्वाचे योगदान



मिलिंद पुर्णपात्रे

विलेपार्ले हे मुंबईतील अतिशय नावाजलेले उपनगर आहे. यास कारणही तसेच आहे. विलेपार्ले येथे थोर विचारवंत लेखक, नाट्यक्षेत्रातील मंडळी, सामाजिक क्षेत्रात फार मोठे काम करणाऱ्या जुन्या संस्था, तसेच वैद्यकीय क्षेत्र व राजकारणातील सुध्दा बरीच चांगली मंडळी येथे राहात असतात. जरी आकाराने लहान असले तरी या सर्व दिग्गज मंडळीमुळे विलेपार्ल्याचे नाव मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्रात व देशात मानाने घेतले जाते.

सर्व गोष्टींचा विचार करून श्री. ज्ञानेश चांदेकर व त्यांच्या सौ. अनिता चांदेकर यांनी 'आम्ही पार्लेकर' हे मासिक वर्तमानपत्र चालू केले. दोघेही पार्लेकरच असल्याने या माध्यमातून विलेपार्ले उपनगराला कशी मदत करता येईल हे ठरवूनच त्यांनी हे मासिक काढले. त्याचप्रमाणे दरवर्षी डिसेंबरमध्ये एक वार्षिक विशेषांक सुध्दा सुरू केले. मुंबई, महाराष्ट्र व भारतात अशी अनेक स्थानिक वर्तमानपत्रे निघाली व काळाच्या ओघात ती केव्हा बंद झाली ते समजले पण नाही. पण श्री. व सौ. चांदेकरांचा मुळ हेतूच व्यवसाय नसून विलेपार्ले शहराला नावारूपास आणण्यासाठी आपल्यापरीने मदत करण्याचा असल्याने त्यांच्या या प्रामाणिक उद्देशाने सुरु केलेले हे मासिक वर्तमानपत्र यावर्षी ३० वर्षे पूर्ण करीत आहे व त्यात सर्वतोपरीने वर्तमानपत्राचा दर्जा काळानुरूप त्यांनी सुधारत नेला आहे. सातत्याने ३० वर्षे कोणाचीही मदत न घेता सलग प्रवास हे फारच कौतुकास्पद व कठीण काम त्या दोघांनी व त्यांच्या टिमने फारच चिकाटीने, जिद्दीने केले असून वृत्तपत्र हा समाजाचा चौथा स्तंभ असतो हे तंतोतंत त्यांनी सिध्द केले आहे. कोणत्याही राजकीय पक्षाची त्यांच्यावर सावलीदेखील पडली नाही.

जसे विलेपार्ले विविध क्षेत्रातील मान्यवर लोकांचे माहेरघर आहे, तसेच आज विलेपार्ले हे क्रीडा क्षेत्रात पण आपला दबदबा निर्माण करण्यात फारच यशस्वी झाले आहे. क्रिकेट, नेमबाजी, कबड्डी, मल्लखांब, जिमनॅस्टीक, बॅडमिंटन, टेबल टेनिस अशा विविध क्षेत्रात विलेपार्ले येथील मुले / मुलींनी फारच भरीव कामगिरी करून जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पार्लेकरांचा झेंडा सतत फडकावला आहे यात तिळमात्र शंकाच नाही.

क्रीडा क्षेत्रातील मुलं / मुलींना सुरुवातीच्या काळात तसेच पुढेही नेहमी पाठिंबा आवश्यक असतो. तो म्हणजे उत्तम दर्जाचे प्रशिक्षक व प्रेमाने शाबासकी देणाऱ्या हाताची गरज त्यांना नेहमी असते.

गेली ३० वर्षे सातत्याने वरील सर्व



प्रकारातील क्रीडा प्रकारात 'आम्ही पार्लेकरने' सतत खेळाडूंना मार्गदर्शन, प्रोत्साहन, प्रसिध्दी, संधी व एक फ्लॅटफॉर्म उभा करुन देण्याचे फार महत्वाचे काम केल्यामुळे पार्लेकर कोणत्याही खेळाडूला कधीच विसरु शकणार नाही.

विलेपार्ले येथे ३० वर्षापूर्वी क्रिकेटपासून इतर सर्व प्रकारात प्रामुख्याने मुलांना खेळासाठी मैदान उपलब्ध करुन देण्यापासून, चांगले प्रशिक्षक, विविध स्पर्धांचे आयोजन करणे. त्याच प्रमाणे यासाठी त्यांनी कै. डॉ. रमेश प्रभूंच्या सहकार्याने पार्ल्यासाठी एक दूरदर्शन चॅनल चालू केले व त्यात खास करुन विविध क्षेत्रातील उभरत्या, नावाजलेल्या खेळाडू, प्रशिक्षक यांच्या सतत मुलाखती, तसेच त्यांच्या व खेळाडूंच्या पालकांचे परीसंवाद पण घडवून आणले त्याचा फायदा सर्व क्षेत्रातील खेळाडू, प्रशिक्षक व आयोजकांना मोठ्या प्रमाणात झाला. त्यांना प्रोत्साहन मिळाले व त्यांचे मनोबलपण वाढले.

'आम्ही पार्लेकर' दर वर्षी डिसेंबर महिन्यात एक वार्षिक मासिक काढते व त्यावेळी मान्यवरांच्या




उपस्थितीत पार्ले येथील खेळाडूंना बक्षिसे देऊन त्यांचे मनोबल उंचावण्याचे काम करते.

आज तिथीस विलेपार्ल्यातील 'पार्ले महोत्सव' फारच प्रसिध्द झाला आहे. तो सुरु करण्याच्या दिवसापासून आम्ही पार्लेकर त्यांना सर्वतोपरी मदत मिडीया पार्टनर म्हणून करत आली आहे. विलेपार्ले येथे होणाऱ्या बहुतेक स्पर्धाचे मिडीया पार्टनर, प्रसिध्दी प्रमुख या नात्याने आम्ही पार्लेकर नेहमीच मदत करत आहे. मासिक वर्तमानपत्र व वार्षिक मासिक या माध्यमातून विविध खेळातील खेळाडूंच्या प्रशिक्षकांच्या आयोजकांच्या मुलाखती, अडचणी 'आम्ही पार्लेकर' ने पार्लेकरांना माहिती करून दिल्यात. यामुळेच खेळाडू, प्रशिक्षकांचे एक हक्काचे प्रसार माध्यम म्हणून पार्लेकर या 'आम्ही पार्लेकर' ला ओळखतात.

त्याचप्रमाणे खेळाडू, प्रशिक्षकांना काहीही अडचण असेल तर त्यासाठी 'आम्ही पार्लेकर' चा प्लॅटफॉर्म कायम उपलब्ध व त्यात काही लिहीले की लोकांना तुमच्या अडचणी समजून त्यातून लगेच उपाय सुचलेला दिसतो.




**मिलिंद पूर्णपात्रे**
अंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू व प्रशिक्षक
सन्मान :
शिवरत्न पुरस्कार (२०१३)
क्रिडा प्रविण्य पुरस्कार (२०१७)
दिल्ली सरकारकडून लाईफटाईम अचिव्हमेंट ॲप्रिसीएशन पुरस्कार (२०१९)

संपर्क : ९८२१२ ५६०८२

# Shree Sidhivinayak Enterprises

## Agarbatti dhup stick Dhupvati

### सुगंधीत अगरबत्ती



### इलेक्ट्रिक दीपमाळ



### ओज आयुर्वेदिक साबण




### दिपस्तंभ




## SANJAY GAJRE & ARTI GAJRE

9867995509 / 7208666759

shree_siddhivinayak_ent


mail: gajre.sanjay@gmail.com

# अर्थकारण

आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
वार्षिक विशेषांक २०२१

# बिटकॉइन - सत्य आणि मिथकं





सतिश जोशी

७ सप्टेंबर २०२१ रोजी एल साल्वाडोर ह्या मध्य अमेरिकेतील छोट्याशा देशात एक महत्वाची घटना घडली. बिटकॉइन ह्या क्रिप्टो-करन्सीला देशाचं अधिकृत चलन म्हणून मान्यता देण्यात आली. म्हणजेच ह्या देशातील कुठल्याही आर्थिक व्यवहारासाठी बिटकॉइनही चलन म्हणून साल्वाडोरच्या अधिवृत्त चलनाबरोबर (जे आतापर्यंत अमेरिकी डॉलर होतं) वापरता येईल.  इतकंच नव्हे तर, अशा व्यवहारातील एका सहभागी व्यक्तीला जर बिटकॉइन वापरायचे असेल, तर ह्या व्यवहारातील इतर सहभाग्यांना ते स्वीकारणं (साल्वाडोरच्या अधिवृत्त चलनाऐवजी) बंधनकारक राहील.

जागतिक अर्थव्यवहारात एल साल्वाडोरचा वाटा अगदीच  नगण्य आहे. पण तरीसुद्धा सर्व जगातील मध्यवर्ती बँकांच्या अध्यक्ष्यांचे कान टवकारले जावेत असं महत्वाचं ह्या घटनेत काय होतं ?

त्यासाठी आपल्याला थोडं खोलात जाऊन आधी क्रिप्टो-करन्सी म्हणजे नक्की काय ह्याची वास्तव माहिती करून घ्यावी लागेल.

'वास्तव' हा येथील महत्वाचा शब्द आहे. कारण पारंपारिक आणि नवीन सोशल अशा दोन्ही वृत्तमाध्यमांमधून क्रिप्टो-करन्सी बद्दल प्रसिद्ध होणाऱ्या सनसनाटीपूर्ण, अतिरंजित पण पोकळ बातम्या फक्त खळबळ माजविण्याचं काम करतात.

ह्या पुढे जेंव्हा जेंव्हा मी 'बिटकॉइन" असा शब्द वापरीन तेंव्हा त्यामध्ये बिटकॉइन सारख्या इतर सर्व क्रिप्टो-करन्सीचा (इथेरियम, बिआन्स, टेथर इत्यादी) समावेश गृहीत आहे. जिथे भिन्न-भिन्न क्रिप्टो-करन्सी मधील फरक महत्वाचा असेल तिथे तसा  स्पष्ट उल्लेख केला जाईल.

बिटकॉइन समजून घेण्यासाठी आपल्याला त्याकडे ३ दृष्टीकोनातून पहायला हवं.

१. बिटकॉइनचा चलनाच्या (करन्सी) स्वरूपात वापर

२. बिटकॉइन मागील तंत्रज्ञान. बिटकॉइन अस्तित्वात आणण्यासाठी आणि ती व्यवहारात वापरण्यासाठी कुठली नवीन टेकनॉलॉजी विकसित केली गेली ? ती कशी वापरली जाते ?

३. बिटकॉइनचा मालमत्ता (ऍसेट) ह्या स्वरूपात वापर.

अर्थात चलन आणि मालमत्ता ह्या संकल्पनांतील सीमारेषा कधी कधी धूसर होऊ शकते. उदाहरणार्थ तुमच्या पिशवीत १ कोटी

रुपयांच्या चलनी नोटा असतील तर तो तुमच्या मालकीचा ॲसेटही आहेच. परंतु 'ॲसेट' ह्या संकल्पनेमध्ये इतर अनेक मूर्त (उदाहरणार्थ शेतजमीन, घर) आणि अमूर्त (उदाहरणार्थ – 'Goodwill') गोष्टींचा समावेश होऊ शकतो आणि जरी त्या सर्वांचाच चलन म्हणून प्रत्यक्ष वापर आपण करू शकत नसलो तरी त्यातील काहींचा निदान तत्वतः चलनासारखा वापरही होऊ शकतो. परंतु तात्पुरता हा मुद्दा आपण जरा बाजूला ठेवू आणि चलन (करन्सी) आणि मालमत्ता (ॲसेट) ह्या शब्दांचा सर्वसाधारणपणे लावला जाणारा अर्थ गृहीत धरू.

**पण करन्सी/चलन म्हणजे काय?**

समजा तुम्हाला बटाटे विकत घ्यायचे आहेत. भाजीवाल्याने तुमच्या पिशवीत १०० रुपये मूल्य असलेले बटाटे ओतल्यावर त्याबदल्यात तुम्ही त्याला काय द्याल? तुम्ही द्याल त्याला तुमच्या खिशातील एक कागदाचा तुकडा – ज्याच्यावर १०० रुपये असं, आणि शिवाय बरंच काही सरकारी छापखान्यात छापलेलं आहे! तो भाजीवालाही तो कागदाचा तुकडा त्याच्या बटाट्यांच्या बदल्यात आनंदाने घेईल. अगदी छपाईचा खर्च जमेस धरून सुद्धा त्या तुकड्याची किंमत १०० रुपयांच्या जवळपास सुद्धा जाणार नाही. तरीही त्याचं मूल्य मात्र सर्वानुमते १०० रुपये असं मान्य केलं गेलं आहे. तुम्ही समजा दुसऱ्या एखाद्या कागदाच्या तुकड्यावर तोच मजकूर स्वतःच्या हाताने लिहिला तर तो भाजीवाला त्या तुकड्याचा स्वीकार १०० रुपये म्हणून करेल का? मग केवळ सरकारी छापखान्यात छापला गेल्यामुळे ह्या कागदाच्या तुकड्याचं १०० रुपयात परिवर्तन झालं आहे का?

तुमच्या कागदाच्या तुकड्यावर काय छापलं आहे ते जरा निरखून पहा. "I promise to pay the bearer a sum of one hundred rupees" असं त्यावर छापलेलं आहे आणि रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरची त्याखाली सही आहे. म्हणजेच तो तुकडा म्हणजे १०० रुपये नव्हेत तर ते एक वचन आहे – जो कोणी हा तुकडा हातात घेऊन गव्हर्नरच्या दारात उभा राहील त्याला १०० रुपये देण्यास गव्हर्नर (आणि त्याच्या रूपाने भारत सरकार) बांधील आहे, हे वचन. अर्थात तो कागदाचा तुकडा १०० रुपये ह्या मूल्याचं केवळ एक प्रतीक आहे. जो पर्यंत ह्या वचनावर बहुतांश लोकांचा विश्वास आहे तोपर्यंत कोणालाच प्रत्यक्ष गव्हर्नरच्या दारात जाऊन १०० रुपयांची मागणी करण्याची गरज वाटणार नाही. कारण प्रत्येकाला ही खात्री असेल की स्वतःकडच्या कागदाच्या तुकड्याच्या चलनी मूल्यावर इतर सर्वांचाही तेव्हढाच विश्वास आहे आणि त्यामुळे कुठल्याही आर्थिक व्यवहारात हा तुकडा प्रत्यक्ष १०० रुपायांऐवजी स्वीकारला जाईल.

जेंव्हा हा विश्वास उडेल (जसं व्हेनेझुएला मध्ये झालं) तेंव्हा देशाची अर्थव्यवस्थाच



कोलमडून पडेल कारण कुठल्याही आर्थिक व्यवहारांत मग असे पोकळ वचनांचे कागद स्वीकारले जाणार नाहीत.

तेंव्हा कुठल्याही वस्तूचा चलन म्हणून वापर होण्यास महत्वाचा आहे, हा विश्वास.

अनादिकालापासून अनेक वेगवेगळ्या वस्तू चलन म्हणून - म्हणजेच खऱ्या मूल्याचं प्रतीक म्हणून वापरल्या गेलेल्या आपल्याला दिसतील - धातूचे तुकडे, कवड्या, मणी, चामड्याचे तुकडे, ट्युलिपचे कंद (१७व्या शतकातील युरोप), तांदूळ (मध्ययुगीन जपान) आणि आधुनिक काळात, कॉम्प्युटरच्या मेमरीमधले आकडे!

ह्या सर्व विवरणाचा मुख्य मुद्दा असा की करन्सी किंवा चलन म्हणून कुठलीही मूर्त किंवा अमूर्त गोष्ट वापरली जाऊ शकते आणि त्या गोष्टीच्या अंगभूत मूल्याचा त्याच्या चलनी मूल्याशी काहीही संबंध असण्याची गरज नसते. मात्र कुठलीही गोष्ट चलन म्हणून वापरण्यासाठी ४ अटी पूर्ण व्हाव्या लागतात.

१. निर्विवाद मालकी - कोणत्याही क्षणी चलन म्हणून वापरल्या जाणाऱ्या गोष्टीचा मालक कोण हे निर्विवादपणे कोणालाही सिद्ध करता आलं पाहिजे. जेंव्हा चलन नाणी, नोटा असं मूर्त स्वरूपात असतं तेंव्हा ज्याच्या हातात नोट तो त्याचा एकमेव मालक असं ठरविणं सोपं असतं. जेंव्हा ते अमूर्त स्वरूपात असतं, जसा तुमच्या बँकेच्या कॉम्पुटरमधील तुमच्या खात्यात जमा असलेल्या रकमेचा आकडा, तेंव्हा तुमच्या बँकेसारख्या एखाद्या विश्वासू मध्यस्थाची गरज निर्माण होते.

२. तुमच्या मालकीची रक्कम एकापेक्षा अधिक वेळी खर्च करण्यास प्रतिबंध - तुमच्या कडे जर १०० रुपये असतील तर ते तुम्ही फक्त एकदाच खर्च करू शकता - तेच १०० रुपये तुम्ही १००, १०० रुपयांचे बटाटे दोनदा विकत घ्यायला वापरू शकत नाही. जेंव्हा चलन मूर्त स्वरूपात असतं तेंव्हा ह्या अटीची अंमलबजावणी सोपी असते. एकदा १००रुपयाची नोट भाजीवाल्याला दिली गेल्यानंतर तीच नोट तुम्ही आणखी एकदा वापरू शकत नाही. जेंव्हा चलन अमूर्त स्वरूपात असतं (तुमच्या बँकेच्या कॉम्पुटरमधील तुमच्या खात्यात जमा असलेली रक्कम) तेंव्हा ही अट पूर्ण करण्यासाठी पुन्हा बँकेसारख्या एखाद्या विश्वासू मध्यस्थाची गरज निर्माण होते.

३. चलन म्हणून वापरायच्या गोष्टीचा नियंत्रित पुरवठा - 'नियंत्रित' हा येथील महत्वाचा शब्द आहे. कोणीही कधीही कुठल्याही कष्टांशिवाय नवीन चलन निर्माण करू शकत असेल आणि पुरवठा जर अनियंत्रित असेल तर चलनी मूल्याला काही अर्थच राहणार नाही.

४. विश्वास - आपण ह्याबद्दल आधीच बोललो आहोत. माझ्या मालकीच्या प्रतीकांच्या बदल्यात जेंव्हा मला वाटेल तेंव्हा - आज, उद्या, १० महिन्यांनी, १० वर्षांनी किंवा भविष्यात कधीही, ते ज्याचं प्रतीक आहे ते मूल्य मला मिळेल (इथे चलनवाढीमुळे होणाऱ्या मूल्याच्या ऱ्हासाचा मुद्दा जरा बाजूला ठेवू) असा विश्वास.

अनादिकालापासून दोन व्यक्तींमधील आर्थिक व्यवहार ह्या चार अटी पूर्ण करण्यासाठी एखाद्या विश्वासू मध्यस्थाच्या सहभागाविना सुरळीतपणे करणं अशक्य मानलं गेलं होतं आणि प्रत्यक्षातील अनुभवही असंच दाखवत होता. ही मध्यस्थीची गरज वेगवेगळ्या व्यक्ती किंवा संस्था भागवित होत्या - उदाहरणार्थ बँका, सरकार किंवा सरकारच्या मालकीच्या मध्यवर्ती बँका, अडते, सावकार, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती इत्यादी.

बिटकॉइनची यंत्रणा निर्माण करण्यामागची मुख्य प्रेरणा, तंत्रज्ञानाचा वापर करून ह्या मध्यस्थांची गरज मोडीत काढणे ही होती. बिटकॉइनसाठी जी प्रणाली निर्माण करण्यात आली, त्यामध्ये वरील १, २ आणि ३ ह्या अटींची पूर्तता मध्यस्थांच्या कुठल्याही प्रकारच्या सहभागाशिवाय करण्यात आली. चौथी अट मात्र मुक्त बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्याच्या तत्वावर पूर्ण केली जावी अशी बिटकॉइनची भूमिका होती.

आपण थोडक्यात बिटकॉइन प्रणालीमध्ये एखाद्या मध्यस्थाविना, निव्वळ तंत्रज्ञानाच्या मदतीने, ह्या तीन अटी कशा पूर्ण केल्या जातात हे पाहूया - परंतु त्याची सांगोपांग माहिती देणं मात्र इथे शक्य होणार नाही (मुख्यतः public key cryptography म्हणजे काय आणि त्याचा वापर बिटकॉइन यंत्रणेत कसा होतो हे विशद करणं इथे शक्य नाही. आणि block-chain यंत्रणा जो बिटकॉइनचा गाभा आहे तो नीट समजून घेण्यासाठी public key cryptography समजणं जरुरीचं आहे). सध्या आपण एव्हढच म्हणूया की बिटकॉइनचे व्यवहार करू इच्छिणाऱ्या प्रत्येकाची एक पब्लिक की आणि एक प्रायव्हेट की असते. त्यांचा उपयोग प्रत्येक बिटकॉइन व्यवहाराचं प्रमाणीकरण (Authentication) करण्यासाठी केला जातो.

बिटकॉईनच्या प्रणालीमध्ये वर वर्णन केलेल्या पहिल्या दोन अटी पूर्ण करण्यासाठी दोन यंत्रणा निर्माण केल्या गेल्या.

१. लेजर किंवा खातेवही (Block-chain) - ज्यामध्ये, अस्तित्वात असलेल्या प्रत्येक बिटकॉइनचा संपूर्ण इतिहास, अर्थात ते बिटकॉइन वापरून झालेला प्रत्येक व्यवहार नोंदला जाईल. बिटकॉइनचे व्यवहार ज्या व्यक्ती करतात, त्या सर्वाना ह्या खातेवहीत काय नोंदलं गेलं आहे ते पाहता येईल, पण त्यात एकदा एखादा व्यवहार यशस्वीपणे नोंदला गेल्यावर नोंदीत कुठल्याही प्रकारचा बदल कोणाही व्यक्तीला करता येणार नाही आणि ही खातेवही वैध रित्या अद्ययावत राखण्याचे काम कुठल्याही मध्यस्थाच्या सहभागाविना बहुमताने होईल.

२. नोंदल्या गेलेल्या सर्व व्यवहारांची कालानुसार निर्विवाद क्रमवारी ठरविण्याची अश्या प्रकारची योजना, ज्यामध्ये बिटकॉइन वापरून आर्थिक व्यवहार करणाऱ्या कुठल्याही व्यक्तीला कुठल्याही प्रकारचा बदल करणे शक्य होणार नाही आणि ही क्रमवारी सुद्धा बहुमताने ठरविली

जाईल.

ही दोन्ही वाक्य 100% खरी नाहीत. तत्वतः खातेवही आणि क्रमवारी दोन्हीमध्ये बदल करणं शक्य आहे पण public key cryptography चा चतुराईने वापर करून, असे मनमानी बदल करणं प्रत्यक्षात एव्हढं कठीण आणि वेळखाऊ करण्यात आलं आहे की अशी लबाडी करणं कोणाच्याही फायद्याचं होणार नाही.

दोन्ही यंत्रणा एखाद्या मध्यस्थांच्या सहभागाशिवाय कशा वापरल्या जातात ते आपण एका उदाहरणाच्या साहाय्याने पाहू.

समजा लता अनिलला १ बिटकॉइन देऊ इच्छिते. लताकडे असेलली बिटकॉइन मुळात आली कुठून हा मुद्दा जरा बाजूला ठेवू. लताकडचं बिटकॉइन कशा स्वरूपात तिच्या लॅपटॉपवरील बिटकॉइन वॉलेट मध्ये ठेवलेलं आहे ? वर वर्णन केल्याप्रमाणे लताचं बिटकॉइन म्हणजे त्याच्या संपूर्ण इतिहासाची नोंद (हा इतिहास हेच बिटकॉइन) आहे. अनिलला देण्यापूर्वी लता आपली प्रायव्हेट की आणि अनिलची पब्लिक की वापरून तिच्याकडील बिटकॉइनच्या व्यवहाराची नोंद खातेवहीमध्ये करून बिटकॉइनच्या नेटवर्कमध्ये प्रसारित करेल. हा व्यवहार वरील पहिल्या दोन अटी पूर्ण करतो की नाही (१. ते कॉइन लताच्याच मालकीचं होतं आणि २. तिने ते आधीच दुसऱ्या कोणालाही दिलेलं नाही) हे बिटकॉइन नेटवर्कमध्ये सहभागी असलेलं कोणीही पडताळून पाहू शकतो. जेंव्हा बहुमताने हे मान्य केलं जाईल की हा व्यवहार योग्य होता तेंव्हाच तो बिटकॉइनच्या खातेवहीत अपरिवर्तनीय रीतीने नोंदला जाईल. मात्र बिटकॉइनच्या व्यवहाराची वैधता (अट क्र. १ आणि २ च्या दृष्टिकोनातून) ठरविण्याची हि प्रक्रिया अतिशय कठीण, वेळखाऊ आणि म्हणून खर्चिक आहे. म्हणून ही प्रक्रिया जो सर्वात आधी पूर्ण करू शकेल (Proof-of-Work) त्याला ह्या कामाचा मोबदला म्हणून नवीन बिटकॉइन दिलं जातं - जे, ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्यास निर्माण होतं. बिटकॉइन नेटवर्कचे जे सभासद हे काम करतात त्यांना बिटकॉइन miner असं म्हणतात. अर्थात हे mining कोणीही करू शकतो - परंतु ह्या कामासाठी एव्हढया मोठ्या संगणक-शक्तीची जरूर असते की प्रचंड मोठं भांडवल हाताशी असल्याशिवाय बिटकॉइन mining करणं अशक्य आहे.

अशा रीतीने बिटकॉइन यंत्रणेने एखादी गोष्ट चलन म्हणून वापरली जाण्यास अनिवार्य अशा ३ अटी पूर्ण केल्याचं आपल्याला दिसेल आणि ते ही कुठलीही मध्यस्थाची गरज न पडता. परंतु चौथ्या अटीचं काय ? बिटकॉइनचं चलन म्हणून मूल्य कोण आणि कसं ठरविणार ?

कुठल्याही नेहेमीच्या चलनाच्या बाबतीत, त्या त्या देशाची एकूण अर्थव्यवस्था, तेथील मध्यवर्ती बँक आणि सरकार, आपल्या चलनाचं मूल्य, स्थैर्य आणि क्रयशक्ती ठरविण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावतात. चलनाचा पुरवठा, परिस्थितीनुसार नियंत्रित करून अर्थव्यवस्थेला चालना देणे किंवा लगाम घालणे हे ही त्यांचं महत्वाचं काम असतं.

बिटकॉइनसारख्या यंत्रणांमध्ये अर्थव्यवस्थेतील ह्या मध्यवर्ती भूमिकेचं स्थानच नाहीसं करण्यात आलं आहे. त्याचे दोन महत्वाचे परिणाम म्हणजे १. बिटकॉइनमध्ये होणारे व्यवहार पूर्णपणे निनावी असतात कारण कुठल्याही व्यवहारात कुठल्याही प्रकारचा मध्यस्थ नसतो आणि २. चलनाचा पुरवठा आणि मूल्य दोन्ही केवळ मागणी-पुरवठा ह्यांच्या गणितावर अवलंबून असल्यामुळे, त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचं मध्यवर्ती नियंत्रण नसतं.

बिटकॉइन जसं अधिकाधिक वापरलं जाऊ लागलं तशी एकाबाजूला जगातल्या मध्यवर्ती बँकांची झोप उडाली तर दुसऱ्या बाजूला सट्टेबाजांना बिटकॉइनमुळे एक नवीन रोमांचक साधन मिळालं.

आपल्या वाचनात सर्वसाधारणपणे येणाऱ्या क्रिप्टो-करन्सी बद्दलच्या सनसनाटी बातम्या मुख्यतः ह्या सट्टेबाजीशी संबंधित असतात.

इथे थोडंसं विषयांतर करून मी अगदी सुरुवातीला म्हटलं त्या क्रिप्टो-करन्सीच्या 'ॲसेट' ह्या रूपाबद्दल बोलूया. चलनाप्रमाणेच कुठली मूर्त (उदाहरणार्थ - सोनं) अथवा अमूर्त (जशी Brand Value) गोष्ट ॲसेट असू शकते आणि त्या गोष्टीच्या अंगभूत मूल्याचा त्याच गोष्टीच्या ॲसेट म्हणून बाजारपेठेतील मूल्याशी काहीही संबंध असण्याची गरज नसते. उदाहरणार्थ लोखंड किंवा तांबे अश्या धातूंची उपयुक्तता आणि म्हणून त्याचं अंगभूत मूल्य सोन्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त आहे. पण



बाजारात ॲसेट म्हणून सोन्याचं मूल्य नेहेमीच लोखंडापेक्षा कित्येक पटींनी अधिक असतं. त्यामुळे कुठलीही गोष्ट - ज्या मध्ये आज पैशाची गुंवणूक केल्यास उद्या त्या गुंतवणुकीपेक्षा जास्त

परतावा मिळण्याची शक्यता असते, ती ॲसेट ह्या रूपात वापरली जाऊ शकते - मग ते सोनं असो, जमीन असो, एखाद्या कंपनीचे शेअर्स असो, पिकासोचं पेंटिंग असो की बिटकॉइन असो. बिटकॉइनचा ॲसेट म्हणून वापर करण्यासाठी ते मिळविण्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे वरती वर्णन केलं तसं स्वतःच कॉईन-miner बनणं किंवा एखाद्या बिटकॉइन exchange (जिथे रुपयाच्या बदल्यात बिटकॉइन घेता येतात) मधून बिटकॉइन विकत घेणं. आजच्या घडीला तरी बिटकॉइनचं मूल्य भविष्यात कसं बदलेल ते ब्रह्मदेवसुद्धा सांगू शकणार नाही. पण केवळ ह्या अस्थिरतेमुळेच बिटकॉइन आज साहसी (आणि सट्टेबाज) गुंतवणूकदारांचं आवडीचं साधन बनू पाहत आहे. अर्थात बिटकॉइन व्यवहाराचं संपूर्ण निनावी स्वरूप ही सुद्धा त्यातील एक आकर्षणाची बाब आहे - खास करून ज्यांना आपली गुंवणूक जगापासून लपवायची आहे त्यांच्यासाठी. त्याच बरोबर आज बिटकॉइन बाबत अनेक गोष्टी कायद्याच्या दृष्टीने धूसर आहेत - उदाहरणार्थ भांडवली लाभावरील (Capital gain) कराचं दायित्व, हा सुद्धा बिटकॉइनमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना आकर्षित करणारा मुद्दा आहे.

आजमितीला बिटकॉइन वापरून होणाऱ्या व्यवहारांची संख्या आणि मूल्य दोन्ही जागतिक आर्थिक उलाढालीच्या तुलनेत नगण्यच आहे आणि नजीकच्या भविष्यातही ह्यात काही म्हणावा तितका फरक पडेल ह्याची शक्यता नाही. तेंव्हा सट्टा ज्यांना खेळायचा त्यांना खेळू दे, ज्यांना बिटकॉइनचा चलन म्हणून विश्वास वाटतो त्यांना आपापसातील व्यवहारात त्याचा चलन म्हणून वापर करू दे, सरकारला त्यात दखल देण्याचं किंवा बिटकॉइन मुळे आपल्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होईल ह्याची काळजी करण्याचं काय कारण आहे ? ह्या प्रश्नाचं ही सविस्तर उत्तर इथे देणं शक्य नाही, पण ढोबळ मानाने त्याची कारणं काय आहेत ?

१. जर एखाद्या चलनाचं मूल्य किंवा क्रयशक्ती, मागणी आणि पुरवठ्याच्या स्थितीप्रमाणे मिनिटा-मिनिटाला सतत बदलत राहणार असेल तर कुठल्याही प्रकारचे दीर्घकालीन आर्थिक व्यवहार असं चलन वापरून करणं जवळ जवळ अशक्यच होऊ शकतं. उदाहरणार्थ, समजा मी १०० बिटकॉइनचं १० वर्ष मुदतीचं कर्ज नवीन घर विकत घेण्यासाठी काढलं. पुढच्या ६ महिन्यात बिटकॉइनचं मूल्य दुप्पट होऊ शकतं किंवा ५० टक्क्यांनी घटूही शकतं. ते जर दुप्पट झालं तर माझं कंबरडं ते फेडता फेडता मोडेल, जर ते घटलं तर बँकेचं मोडेल!
२. चलनपुरवठा ही नेहेमीच प्रस्थापित राज्यसत्तेची मक्तेदारी राहिली आहे. चलन पुरवठयाचं नियंत्रण, देशाची अर्थव्यवस्था स्थिर आणि वृद्धिंगत ठेवण्याचं एक महत्त्वाचं साधन आहे. त्याचं नियंत्रण जर खासगी रित्या होऊ लागलं तर संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था अश्या खासगी यंत्रणेची बटीक होण्याची भीती नाकारता येणार नाही.
३. बिटकॉइन सारख्या यंत्रणेत तंत्रज्ञानाने जरी पहिल्या ३ अटी कोणाही मध्यस्थाविना पुऱ्या होत असल्या तरी चौथ्या अटीला - विश्वास - त्यात कुठलंही ठोस उत्तर नाही. भविष्यात जर काही कारणांनी हा विश्वास उडाला तर त्याचे परिणाम काय होतील ह्याचं नक्की उत्तर कोणालाच आज देता येणार नाही.

बिटकॉइनसारख्या यंत्रणांतील अस्थिरतेला उत्तर म्हणून काही वेगळ्या प्रकारची क्रिप्टो-करन्सी यंत्रणा पुढे आली उदाहरणार्थ टेथर किंवा बियान्स - ज्यामध्ये ह्या क्रिप्टो-करन्सीचं मूल्य एखाद्या नेहेमीच्या चलनाशी (उदाहरणार्थ अमेरिकी डॉलर) जोडण्यात येतं. ह्या यंत्रणांमध्ये जेवढी क्रिप्टो-करन्सी निर्माण करण्यात येते त्याला अनुरूप नेहेमीच्या चलनात गंगाजळी साठवून ठेवली जाते. वर नमूद केलेली चौथी अट त्यामुळे पूर्ण होते. एव्हढच नव्हे तर चलनाचं मूल्य किंवा क्रयशक्ती ह्यांचं स्थैर्य मग एकूण त्या देशाच्या अर्थव्यवस्थेशी आणि आर्थिक धोरणांशी बांधलं जातं. ह्याच कारणासाठी जगातील अनेक मध्यवर्ती बँका राष्ट्रीय क्रिप्टो-करन्सी निर्माण करण्याचा विचार करू लागल्या आहेत. त्याचप्रमाणे बिटकॉइन सारख्या सरकारी अखत्याराबाहेरील यंत्रणावरही कायद्याचा अंकुश कसा असावा ह्या बद्दलही विचार जगभरची सरकारे करू लागलेली दिसतात.

भविष्यात बिटकॉइनचं नक्की काय होईल कोणीच आज सांगू शकणार नाही. क्रिप्टो-करन्सी नेहेमीच्या चलनांना पूर्णपणे मोडीत काढतील, असं म्हणायला आज तरी काही जागा नाही. तसेंच जरी क्रिप्टो-करन्सी मोठ्या प्रमाणात वापरात आल्या तरी त्या बिटकॉइनसारख्या स्वतंत्र सरकारी नियंत्रणाबाहेर असतील की प्रस्थापित राज्य सत्ता स्वतःच्या किप्टो-कंरन्सी वापरात आणतील हे ही सांगणं कठीण आहे. एक गोष्ट निर्विवाद - कुठल्याही मध्यस्थाविना खातेवही अद्ययावत राखण्याचे तंत्र (Block-chain technology) जे बिटकॉइनमुळे विकसित करण्यात आलं, ते भविष्यात केवळ क्रिप्टो-करन्सी नव्हे तर अनेक इतर प्रश्न सोडविण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे.

**सतीश जोशी**

हॅपिनेसफॅक्टरी ह्या फायनान्शिअल टेक्नॉलॉजी स्टार्ट-अप मध्ये कार्यरत. मागील ३५ वर्षांत TIFR, पटणी कॉम्पुटर, iGate संस्थांमध्ये कॉम्पुटिंग टेक्नॉलॉजी रिसर्च, डेव्हलपमेंट आणि इनोव्हेशन क्षेत्रात काम. २०१४ साली स्वेच्छा निवृत्त.

संपर्क : ९८२०२२८२७९

# निरोगी जीवनशैलीचं नवं नाव...

**Fresh Fusion**

The way to healthy life

Freshly Prepared | No Preservatives

## हेल्दी सॅलेड व सूप ची

## ओळख करून घ्या ... कशी ?

आमच्या सदस्यता आधारित योजनेचा लाभ घ्या ते ही घरपोच.



दादर ते कांदिवली | ठाणे येथे ही उपलब्ध

+91 9821208384 | 9224458989

आधिक माहितीसाठी ...
वेबसाईटला भेट द्या



# अमेरिकन शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या संधी



प्रकाश जोशी

पूर्वी म्हणजे सुमारे १/२ पिढ्या अगोदर जन्माला आलेल्यांच्या तरुणपणीच्या काळात मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात शेअर मार्केटबद्दल बोलणे सहसा होतच नसे. त्याचे कारण म्हणजे तत्कालीन वडिलधाऱ्यांचा त्याबद्दलचा दृष्टीकोन एकूणच नकारात्मक होता. हे 'आपले' काम नव्हे आपण अजिबात त्या फंदात पडू नये असाच सल्ला बहुतेक वेळी दिला जात असे. ह्याला दोन कारणे होती ती म्हणजे एक तर त्या काळात अनेक कुटुंबात येणारा पैसा खूप मर्यादित होता व ह्या विषयाचे संदर्भात माहिती, ज्ञान व अनुभव जवळजवळ नगण्य होते. मात्र आताचा काळ झपाट्याने बदलतो आहे. आजच्या, मुख्यत्वे करून तरूण पिढीला ह्या विषयात खूपच रूची उत्पन्न झाली आहे व त्यांची मानसिकता आता वेगाने बदलत चालली आहे. ही पिढी आता खूपच कॉप्युटर सॅव्ही झाली असून त्यांना ह्या संदर्भात नवनवीन माहिती मिळवून पैसे कमावण्याची व ते व्यवस्थित वाढविण्याची इच्छा झाली आहे. हे करताना त्यांची थोडीबहूत कॅलक्युलेटेड रिस्क घेण्याची पण तयारी आहे. एक गोष्ट नक्की खरी आहे ती म्हणजे जर ह्या विषयात सुयोग्य ज्ञान मिळविले, स्वतः अनुभव घेतला व अत्यंत शिस्तबध्द कामकाज केले तर शेअर मार्केटमधील गुंतवणुकीपासून खुप चांगला परतावा मिळू शकतो हे आता अनेक जणांना उमगले आहे. भारतीय शेअर बाजार आता बऱ्यापैकी प्रगल्भ झाला आहे मात्र येथल्यापेक्षा अमेरिकेतील शेअर बाजार जो जगातील एक नंबरवर आहे तो कितीतरी पटीने मोठा व आकर्षक आहे हे किती जणांना माहिती आहे? तेथे गुंतवणूक करून उत्तम परतावा मिळतो हे आपण नीटपणे समजून घेऊन त्यातील गुंतवणूक काही व्यवधाने पाळून प्रत्यक्षात आणणे आता आवश्यक वाटते व त्या अनुषंगाने मी आपणास आता अगदी थोडक्यात माहिती देतो. अमेरिकन शेअरबाजाराला जवळजवळ २०० वर्षांपेक्षा जास्त अशी प्रदीर्घ परंपरा आहे. तेथे मुख्यतः दोन महत्त्वाची स्टॉक एक्स्चेंज आहेत ती म्हणजे 'न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंज' व 'नैसडॅक' तेथील सांप्रतचे एकूण मार्केट कॅपीटलायझेशन सुमारे ४९ ट्रिलियन यू. एस्. डॉलर आहे जे आपल्यापेक्षा सुमारे १५ पटीने मोठे आहे. आजमितीला तेथे अंदाजे ६,००० कंपन्यांचे समभाग, २७०० पेक्षा जास्त एक्स्चेंज ट्रेडेड फंडस् व १५,००० पेक्षा जास्त म्युच्युअल




फंडस् सूचीबध्द आहेत (ही आकडेवारी सतत बदलत असते.) यास्तव आपणास तेथे गुंतवणूक करण्यास खूपच विविध पर्याय व वाव आहे. मात्र आपली जोखीम घेण्याची क्षमता ओळखून ह्या सर्वातून योग्य व उत्तम निवड करून गुंतवणूक करणे ही कला व ज्ञान आत्मसात करणे इष्ट होईल. जगातील विविध क्षेत्रातील मोठमोठ्या अनेक चांगल्या कंपन्या तेथील स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचीबध्द झालेल्या आढळून येतील तसेच तेथील नियामकांचे बाजारावर बारीक लक्ष असते. यातील एक आकर्षक विकल्प व गुंतवणूक करून देखरेख करण्यास तुलनेने सुलभ असा पर्याय म्हणजे 'एक्सचेंज ट्रेडेड फंड'. सोप्या शब्दात ही एक प्रकारची संबंधित विविध कंपन्यांच्या समभागांची एकत्रित केलेली बास्केट (पिशवी) आहे असे समजू. याव्दारे गुंतवणूक करणे खूपच सोपे व सुलभ होते व पर्यायाने जोखीम विखुरली जाते म्हणून ह्या पर्यायाकडे विशेष लक्ष द्यावे असे सुचवावेसे वाटते. ज्यांना 'पॅसिव्ह इनव्हेस्टिंग' मध्ये रूची आहे त्यांच्यासाठी बऱ्याच प्रकारचे 'इंडेक्स ETF' आहेत उदा. काही (नमुन्यादाखल) एस ॲन्ड पी – १००/ मिडकॅप ४००/ ५००/ स्मॉल कॅप ६००, नॅसडॅक १००/ नॅसडॅक कॉंपोझिट इंडेक्स, रसेल १०००/२०००/३००० इंडेक्स इ. शिवाय इतर ' थीम बेस्ड' असे ETF पण पुष्कळ आहेत त्यांची ओळख करून घेणे अगत्याचे होईल. आणखी एक विलक्षण वेगळा प्रकार (जो आपल्याकडे अद्याप उपलब्ध नाही ) म्हणजे २/३ X Bull Leveraged ETF हे फारच जोखीम युक्त व अस्थीर (Volatile) असतात मात्र या प्रकारातील ऊिंझ खरेदी करून दीर्घ काळासाठी पकडून बसल्यास (Buy & Hold) खूपच आकर्षक परतावा देतात असा इतिहास आहे. असो एकूणच हा बाजार ही अलिबाबाची गुहा आहे व त्याची निटपणे बारकाईने माहिती करून घेणे आवश्यक आहे. ह्या गुहेच्या संदर्भात आपल्याला अलिबाबा सारखे काम करावयाचे आहे त्याचा भाऊ कासीम सारखे नाही एवढे जरूर लक्षात ठेवावयाचे आहे. एक विशेष समजून घेण्याची बाब म्हणजे गेल्या अनेक वर्षांपासून अमेरिकन डॉलरच्या तुलनेत भारतीय रूपयाची किंमत घसरत चालली आहे व पुढील नजिकच्या भविष्यकाळात यात काही बदल होईल ही शक्यता दुरापास्त वाटते तेंव्हा या परिस्थितीत आजच्या अमेरिकन डॉलरच्या भावात केलेली गुंतवणूक पुढील काळात मोडून भारतीय रूपयात घेण्याची वेळ येईल तेंव्हा दुहेरी फायदा होण्याची दाट शक्यता असेल याचे कारण तेंव्हा अमेरिकन डॉलर वधारला असेल व आपण तेथे केलेल्या गुंतवणुकीवरचा लाभांश व भांडवली नफा पण मिळेल ही गोष्ट नक्कीच दुर्लक्ष करण्यासारखी नाही. आता गुंतवणूक योग्य उत्तम ETF कसे शोधून काढावयाचे व प्रत्यक्षात त्यात भारतातून कशी गुंतवणूक करावयाची हे शिकून घेणे आवश्यक आहे. वाचकांपैकी अनेक जणांचे नातेवाईक, इष्टमित्र व परिचित सांप्रत अमेरिकेत व इतर परदेशात असतील तसेच काही विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी तेथे गेलेले असतील (पैकी अनेकजण नंतर तेथेच स्थाईक होण्याची मनिषा बाळगून असतिलच) ते तेथूनच गुंतवणूक करू शकतील. या सर्वांनीच या विषयाची आता संपूर्ण व सखोल माहिती जरूर करून घ्यावी. तसेच 'टेक्नो-फंडामेंटल ॲनालिसिस' ही शेअर बाजार संबधित संकल्पना पण थोडीबहूत आत्मसात करावी. तरूण वयातच मिळालेल्या योग्य ज्ञानाचा पुढील आयुष्यात खूपच फायदा होतो. मी स्वतः या विषयाचा गंभीरपणे अभ्यास करीत असतो व काही फायदेशीर निष्कर्ष काढीत असतो हे सर्व सशुल्क शेअर करणे मला आवडेल. तसेच भारतातील वय वर्षे १८ ते २८ या वयोगटातील तरूणवर्गासाठी मी 'MONEYSMART' या नावाने एक दिवसाचा खास प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार केलेला आहे व त्यात त्यांना सर्वांगिण अर्थसाक्षरता येईल असे विषय निवडले आहेत. अधिक माहिती हवी असल्यास माझ्याशी संपर्क साधावा. तसेच सदर प्रशिक्षण On-line देणे घेणे google meet मुळे सुलभ झाले आहे. गुंतवणूक करण्यासाठी सर्वांना माझ्या तर्फे हार्दिक शुभेच्छा !!!

**प्रकाश जोशी**

सेवानिवृत्त वरिष्ठ बँकर. भारत आणि यूएसए मध्ये बँकिंग आणि गुंतवणूक, म्युच्युअल फंड आणि ETF मध्ये शिकवण्याची आणि प्रशिक्षण देण्याची क्षमता असणारे..

ई-मेल ppjoshi49@gmail.com

संपर्क : ९१-९९२०३३४७६२




# वॉर्ड क्र. ८४ येथे साकारत असलेले ३ महत्वाचे प्रकल्प




**नित्यानंद मनपा शाळेमागे जम्बोदर्शन येथे ८५०० चौरस फूटाचे उद्यान व ३२५ मीटर वॉकींग ट्रॅक**

हा भूखंड पोहोच रस्ता नसल्याने ३० वर्षे विनावापर पडून होता. तेथे पोहोच रस्त्याची उभारणी करुन व आतल्या भूखंडावर उद्याननिर्मिती कार्य सुरु केले आहे ते डिसेंबर २०२१ मध्ये पूर्ण होईल.




**शहाजी राजे मार्ग येथे स्वर्गीय मनोहर पर्रिकर आरोग्य केंद्राची ५ मजली इमारतीच्या**

सर्व परवानग्या, आराखडा व अंदाज पत्रक मंजूर करुन घेतले.
बांधकामाची निविदा प्रसिध्द झालेली आहे.
निविदा मंजुर झाल्यानंतर कामाची सुरुवात होईल.



**सुभाष रोड येथे १ मजली अभ्यासिकेच्या**

सर्व परवानग्या, आराखडा व अंदाज पत्रक मंजूर करुन घेतले.
लवकरच निविदा निघून निर्माण कार्य सुरु होईल.

## अभिजित सामंत

उपनेता – भाजपा मनपा गट
नगरसेवक – वॉर्ड क्र. ८४



# न्यूजमेकर्स
# २०२१

आम्ही पार्लेकर
१९९१ पासून
वार्षिक विशेषांक २०२१



# अदर पूनावाला

- जगातील सर्वांत मोठी लस उत्पादक कंपनी 'सीरम इन्स्टिटट्यूट ऑफ इंडिया'चे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)
- टाईम मॅगझीनच्या जगातील सर्वाधिक प्रभावशाली 100 व्यक्तींच्या यावर्षीच्या यादीमध्ये समावेश
- गेल्या वर्षीच्या फॉर्च्यून मॅगझीनच्या आरोग्यसेवा विभागातील '40 अंडर 40' यादीमध्ये समावेश
- कोरोना प्रतिबंधात्मक कोविशिल्ड लसींच्या उत्पादन प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भूमिका
- सीरम इन्स्टिटट्यूट द्वारा आजवर एक अब्ज कोविड प्रतिबंधात्मक लसींची निर्मिती
- कोविशिल्ड लसींच्या मागणीसाठी धमक्यांचे फोन आल्याने मे महिन्यात अदर यांचे लंडनला प्रयाण. केंद्र सरकार द्वारा अदर यांना 'वाय' दर्जाची सुरक्षा.
- १९६६ मध्ये सायरस पूनावाला यांच्या द्वारे स्थापित सीरम इन्स्टिटट्यूटमध्ये २००१ साली अदर यांचा प्रवेश . त्यावेळी ३५ देशांना लसींचा पुरवठा, आता १६५ देशांमध्ये लसींची निर्यात




# नीरज चोप्रा

- ऑगस्ट 2021मध्ये टोक्यो येथे पार पडलेल्या ऑलिम्पिक २०२० क्रीडास्पर्धेत ८७.५८ मी. भालाफेक (जेवलिन थ्रो) करून सुवर्णपदक पटकावणारा भारतीय खेळाडू
- वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळवणारा सर्वात तरुण भारतीय (वय २३ वर्षे)
- ट्रॅक अँड फिल्ड प्रकारामध्ये ऑलिम्पिक पदक मिळवणारा पहिला भारतीय
- वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्णपदक मिळवणारा आजवरचा दुसरा भारतीय (पहिला मानकरी - अभिनव बिंद्रा )
- ऑगस्ट २०२१ पासून जागतिक अथलेटिक्स क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर
- वर्ल्ड ज्युनिअर चॅम्पियनशिप (२०१६), एशियन गेम्स (२०१७, २०१८), कॉमनवेल्थ गेम्स ( २०१८) अशा स्पर्धांमधून आजवर एकूण सहा सुवर्णपदकांची कमाई
- माजी भालाफेकपटू आणि जर्मन कोच ‘उवे होन’ यांच्याकडून प्रशिक्षण प्राप्त
- २०१६ मध्ये भारतीय सेनेमध्ये दाखल. सध्या ‘राजपुताना रायफल्स युनिट’ मध्ये, ज्युनियर कमिशन्ड ऑफिसर (सुभेदार) या पदावर कार्यरत
- विशिष्ट सेवा पदकाने सन्मानित



# डॉ.सौम्या स्वामीनाथन्

- २०१९ पासून जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) प्रमुख शास्त्रज्ञ
- कोविड१९ साथी संदर्भात वेळोवेळी अधिकृत माहिती (प्रेस ब्रिफींग्स) देण्याची जबाबदारी
- प्रख्यात बालरोगतज्ञ आणि क्लिनिकल शास्त्रज्ञ
- क्षयरोग आणि HIVवरील संशोधक म्हणून जगभरात ओळख
- मे २०२१ मध्ये युरोपियन कमिशनद्वारा आयोजित जागतिक आरोग्य शिखर परिषदेच्या वैज्ञानिक मंचाच्या महत्त्वपूर्ण सदस्या
- २०१५ ते २०१७ दरम्यान भारत सरकारच्या आरोग्य संशोधन क्षेत्राच्या सचिव आणि इंडियन मेडिकल कौन्सिलच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत
- ३५० हून अधिक संशोधनात्मक प्रबंध प्रकाशित



# डॉ. स्वाती मोहन

- अमेरिकन अंतराळ संस्था ‘नासा’मधील भारतीय-अमेरिकन वैज्ञानिक
- नासाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी ‘मार्स २०२०’ मोहिमेमध्ये ‘नेव्हिगेशन आणि कंट्रोल ऑपरेशनचे’ नेतृत्त्व
- या मोहिमेतील ‘पर्सिव्हेरन्स रोव्हरचे’ नेव्हिगेशन आणि मंगळावरील लँडिंग यशस्वी करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका
- जुलै २०२० मध्ये पृथ्वीवरून निघालेल्या ‘पर्सिव्हेरन्स रोव्हरचे’ १८ फेब्रुवारी २०२१ रोजी मंगळावर सुरक्षित लँडिंग
- डॉ स्वाती यांचे शिक्षण अमेरिकेतील कार्नेल विद्यापीठातून. मेकॅनिकल अँड एअरोस्पेस विषयात अभियांत्रिकी पदवी प्राप्त
- त्यानंतर मॅसेच्युसेट्स इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधून ‘एरोनॉटिक्स अँड ऍस्ट्रोनोटिक्स’मध्ये डॉक्टरेट प्राप्त
- २०१३ पासून नासाच्या जेट प्रोपल्शन प्रयोगशाळेत मार्स रोव्हर मिशनच्या सदस्य
- तत्पूर्वी ‘कॅसिनी’ ह्या शनीग्रहाच्या अभ्यास मोहिमेत तसेच ‘ग्रिल’ ह्या चंद्राकडे पाठवण्यात आलेल्या जुळ्या स्पेसक्राफ्ट मोहिमेत महत्त्वपूर्ण सहभाग
- स्वाती यांचा जन्म भारतात, त्यांनतर मोहन कुटुंब अमेरिकेत स्थलांतरित
- टीव्ही मालिका ‘स्टार ट्रेक’ पाहून स्वाती यांना अंतराळ संशोधन क्षेत्रात काम करण्याची प्रेरणा


भारतीय जनता पार्टी
विलेपार्ले विधानसभा
संपूर्ण नायनाट होवो कोरोनाचा
सर्वांगीण विकास होवो भारताचा
होवो अंगीकार 'मेक इन इंडिया' चा
आनंदी जावो प्रत्येक क्षण नवीन वर्षाचा
नूतनवर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा!
स्वागत
२०२२
-: शुभेच्छुक :-
पराग म. अळवणी
(आमदार - विलेपार्ले विधानसभा)
विलेपार्ले विधानसभेतील
सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते

# विविधा

आम्ही

१९९१ पासून

पार्लेकर

वार्षिक विशेषांक २०२१



# काका, सोशल मिडियावर जरा जपून



मुक्ता चैतन्य

त्यादिवशी काकांनी नेहमीप्रमाणे त्यांचं फेसबुक उघडलं आणि मेसेंजरवर गेले. काल एका अनोळखी स्त्रीच्या प्रोफाईलवर त्यांनी हॅलो म्हणून मेसेज टाकलेला होता. त्यावर काय रिप्लाय आलाय हे जाणून घेण्यासाठी काका त्या मेसेजबॉक्समध्ये गेले आणि हादरलेच. त्या स्त्रीने काकांना यथेच्छ शिविगाळ केलेली होती. ते लंपट आहेत, आणि बायकांना इनबॉक्समध्ये हाय हॅलो करून त्रास देतात असं प्रचंड काय काय धमकी वजा लिहिलेलं होतं. आपलं नेमकं काय चुकलं आणि हॅलोचा पंजा असलेला इमोजी टाकला तर इतकं काय झालं हे त्यांना समजेना. सोशल मीडियावरून नवीन ओळखी होतात, मैत्री होते, समविचारी लोकांशी कनेक्ट होता येतं असं काय काय त्यांनी ऐकलेलं होतं. या बाई आणि त्यांच्यात अनेक कॉमन फ्रेंड्स होते. त्यामुळे या बाईंशी ओळख करून घ्यावी इतक्याच हेतूनेही त्यांनी हॅलो चा पिवळा पंजा मेसेंजरमध्ये टाकलेला होता. पण समोरच्या बाईंचा अनोळखी पुरुषांबद्दलचा अनुभव कदाचित वाईट असल्यामुळे असेल पण त्यांनी काकांच्या मेसेजचा पूर्णतः चुकीचा अर्थ काढला आणि काकांना धारेवर धरलं. घाबरलेल्या काकांनी मुलांशी बोलून लगेच बाईंना ब्लॉक करून टाकलं आणि अनोळखी माणसांशी कनेक्ट नको की मैत्री नको असा निष्कर्ष काढला.

अशा एक ना अनेक घटना सोशल मिडियावर घडत असतात आणि स्त्रीपुरुष त्यांच्या पूर्वानुभवाच्या आधारावर सोशल मीडियामध्ये वावरायचं कसं हे ठरवत असतात. तरीही अनेकदा गैरसमज होतात, गल्लत होते आणि अनपेक्षित समस्यांना आणि धोक्यांना सामोरं जायची वेळ येऊ शकते. जशी वर दिलेल्या उदाहरणात त्या काकांवर आली.

अजून एक केस इथे जरुर शेअर करते. काका पंच्याहत्तरी ओलांडलेले. काकू साठी ओलांडलेल्या. कुठल्याशा व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये या काका काकूंची ओळख झाली. छान मैत्री झाली. ग्रुपच्या व्यतिरिक्त पर्सनल चॅटिंग, गप्पा सुरु झाल्या. आधी पुस्तक, कविता, सिनेमा, सीरिअल्स यावरच्या चर्चा हळूहळू घरगुती प्रश्न, समस्या, खासगी विषयांवर गेल्या. दोघांचेही जोडीदार नव्हते त्यामुळे आयुष्यातला एकटेपणा भरून निघत होता. छान मैत्र जुळले होते. कुठेतरी मनात एकमेकांबद्दल काळजी आणि प्रेमही निर्माण होत होतं. एकमेकांना छान वाटेल अशा गप्पा सुरु झाल्या होत्या. अगदी टिनेजर्स करतात तसलं सेक्स्टिंग नाही पण अधूनमधून ॲडल्ट जोक्सचं शेअरिंग, क्वचित चावट गप्पा... सगळं दोघंही एन्जॉय करत होते आणि एक दिवस काकूंनी अचानक काकांशी गप्पा, संवाद सगळंच

बंद करून टाकलं. कदाचित आपण जास्तच वाहवत चाललो आहोत अशी जाणीव काकूंना झाली असावी, किंवा घरातल्या कुणीतरी चॅटिंग बघितलं असावं, किंवा कुणाला समजलं तर आपली छीथू होईल ही भीती काकूंना वाटली असावी.. कारण त्यांचं त्यांना माहित.. पण संवाद अचानक बंद झाल्यामुळे काका अस्वस्थ झाले आणि त्यांचा मला फोन आला. माझं काय चुकलं असं ते मला विचारत होते. अर्थातच माझ्याकडे त्यांना द्यायला ठोस उत्तर नव्हतं. पण त्यानिमित्ताने ऑनलाईन जगात निर्माण होणाऱ्या नात्यांमधला गोंधळ फक्त टिनेजर्स, तरुण आणि मध्यमवयीन स्त्रीपुरुषांच्या आयुष्यात असतो असं नाही तर पन्नाशी ओलांडलेल्या आणि जेष्ठ नागरिकांच्या आयुष्यातही उलथापालथ होऊ शकते हे प्रकर्षाने जाणवून गेलं.

**शब्दावाचून कळले सारे..**

जुन्या ब्लॅक अँड व्हाइट सिनेमातलं गाणं, शब्दावाचून कळले सारे शब्दांच्या पलीकडले.. एकदम रोमँटिक. दिलसे! पण ऑनलाईन जगात एकदा आपण आलो की शब्द असूनही शब्दांच्या पलीकडले अनेकदा समजत नाही आणि या माध्यमांशी नव्यानेच दोस्ती झालेल्या माणसांचा पुरता गोंधळ उडतो. अनेक वयानं मोठ्या असलेल्या स्त्री पुरुषांना हे माध्यम सोयीचं वाटत, वापरायला आवडतही, आपण समकालीन आहोत, जगाच्या प्रवाहाबरोबर जाणारे आहोत याचा आनंदही होत असतो त्यांना, पण जे मी नेहमीच म्हणत आले आहे तेच परत एकदा लिहिते, आपल्याला तंत्रज्ञान वापरता यायला लागलं आहे, माध्यम अजूनही आपण वापरायला पुरेसं शिकलेलो नाही आणि मोठी माणसं तर याबाबत बाल्यावस्थेतच असतात. माध्यम वापरायला शिकलेलो नाही म्हणजे काय हे थोडं सांगते.

चॅटिंगमध्ये वापरल्या जाणाऱ्या भाषेचा, इमोजीचा अनेकदा थेट अर्थ अनेकांना माहित नसतो. अंदाजपंचे ठाऊक असतं आणि त्याबळावर बेधडक चुकीच्या गोष्टी चुकीच्या ठिकाणी वापरल्या जातात. उदा. फेसबुक आणि व्हॉट्सअपवर उपलब्ध असलेले बदाम. कशाला बदाम द्यावा, कशाला देऊ नये याचा विचारच आपण अनेकदा करत नाही, कुणालाही, कुठेही, कसल्याही पोस्टवर बदाम वाटण्याची सवय अनेक ज्येष्ठांना असते आणि त्यातून अगणित गैरसमज जन्माला येऊ शकतात. सोशल मिडियावर प्रेमात असलो तरच बदाम हे गणित अजिबातच नाहीये, एखादी गोष्ट खूपच आवडली तर त्याला बदाम दिला जातो, पण फेसबुक काय किंवा इतर कुठलाही सोशल मीडिया हा भारतीय विचारधारेतून जन्माला आलेला नाहीये, तो अमेरिकन आहे. त्यामुळे अमेरिकन सांस्कृतिक संकेतांसह तो तयार झालेला आहे. पण भारतीय माणसं जेव्हा तो वापरतात तेव्हा अनेक पूर्वग्रह आणि चुकीच्या धारणांमुळे बदाम या इमोजीकडे भलत्याच नजरेनं बघायला लागतात. एखाद्या बाईच्या वॉलवरच्या प्रत्येक पोस्टला एखादा पुरुष जो तिच्या परिचयाचा नाही सतत बदाम देऊ लागला की ती बाई आणि तिच्या वर्तुळातली इतर मंडळी वैतागतात. हेच उलटही होतं आणि मग त्यातून भलतेच अर्थ काढण्याची मालिका सुरु होते. बदाम टाकणाऱ्या व्यक्तीचा हेतू हा वेगळाच विषय आणि तो दरवेळी भलताच असायला हवा असंही नाहीये, एखादा खरोखर पोस्ट्स आवडतात म्हणूनही टाकत असेल पण आजूबाजूची फेसबुकी डोकी निरनिराळे अर्थ काढून गॉसिप आणि स्क्रीनशॉट्सचा सुळसुळाट करून सोडते आणि हे जेव्हा त्या स्त्री पुरुषांच्या लक्षात येतं त्यांना वेगळाच मनस्ताप होतो. हीच गोष्ट मेसेंजर किंवा पर्सनल मेसेजिंगमध्येही घडते. एखाद्याशी नव्याने मैत्री करत असताना संवादाची सुरुवात कशी करावी, कुठले शब्द वापरावेत, कुठले टाळावेत याचा विचार अनेकदा बाजूला पडतो आणि तुमचा डीपी मधला फोटो फार छान आहे, तुम्ही फार सुंदर दिसता, देखणे आहात छाप चॅटिंगने सुरुवात होते. जे अनेकांना आक्षेपार्ह वाटू शकतं. इथे माध्यम शिक्षण महत्वाचं आहे. आभासी जगात जे शब्दात मांडलेलं आहे तेच समोरच्या व्यक्तीच्या मनात असतं असं नाही. अनेकदा भावना आणि शब्द यांचं नातं विसंगतीचं असतं. जे म्हणायचं आहे आणि जे पोचतंय त्यात अंतर असतं आणि समज गैरसमज सुरु होतात. त्यामुळे शब्द जे आहेत त्याच भावना असतील असं नाही. जे इमोजी आहेत तेच नेमकं म्हणायचं असेल असंही नाही. शब्द आणि भावनांमध्ये दरी असू शकते अनेकदा हे लक्षात ठेवलंच पाहिजे.

**दिसतं तसं नसतं..**

आपल्याला फ्रेंड रिक्वेस्ट पाठवणारा प्रत्येकजण हा जेन्युईन आहे, खरा आहे असं मानून चालायचं नाही. अनेकदा अनेक मोठी माणसं समोरची व्यक्ती खरी आहे असं मानून चालतात. विश्वास टाकतात आणि फसवले जातात. ही फसवणूक बहुतेकदा आर्थिक असते पण त्यातून होणारा मानसिक त्रास ना मोजता येणारा आणि भरून काढता न येणारा अनेकदा असतो. आपण फसवले गेलो ही भावना कुणाला आवडते सांगा? म्हणूनच सोशल मिडियावर मैत्री करत असताना चार चार वेळा तपासून बघायला हवं. कुणाचीही फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारण्याआधी त्या व्यक्तीच्या प्रोफाईलवर जाऊन एक चक्कर मारा. काय काय शेअर केलं आहे, कशाप्रकारचे फोटो शेअर केले आहेत, काय पोस्ट्स लिहिल्या किंवा शेअर केल्या आहेत, ती व्यक्ती कुणाला फॉलो करते, विचारधारा काय आहे हे सगळं एकदा नजरेखालून घाला. त्यानंतर फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारावीशी वाटली तरच स्वीकारा. स्विकारल्यानंतरही जर ती व्यक्ती तुमच्या पोस्टखाली काहीतरी वेडंवाकडं लिहीत असेल, मेसेंजरवरून काहीतरी चुकीचं सातत्याने पाठवत असेल, चॅटिंगसाठी आग्रह धरत असेल आणि त्या सगळ्याचा तुम्हाला त्रास व्हायला लागला तर अशा व्यक्तीला लगेच ब्लॉक केलं पाहिजे, जेणेकरून तुमच्या वॉलवरची त्या व्यक्तीची अनावश्यक लुडबुड थांबू शकेल. एक लक्षात ठेवलं पाहिजे, सोशल मीडियावर अगणित फेक प्रोफाईल्स आहेत. लोकांना फसवण्याचे रोज नवे उदयोग शोधले जातात. जर कुणी ऑनलाईन फ्रेंड पैशांची मागणी करत असेल, त्यासाठी कितीही दर्दभरी स्टोरी सांगितली असेल तरीही जोवर तुमची खात्री पटत नाही तोवर पैसे द्यायचे नाहीत. कारण ऑनलाईन मैत्री करून जेष्ठ नागरिकांकडून पैसे उकळण्याचे

प्रकार वरचेवर होत असतात. पैसे का हवेत, कशासाठी हवेत, कुणी कॉमन फ्रेंड असेल ज्याच्याशी बोलता येणं शक्य आहे त्यांच्याशी बोलून, प्रत्यक्ष भेटून मगच मदतीचा विचार निश्चित करावा किंवा जे काही कारण सांगितलेलं आहे त्याची प्रत्यक्ष शहानिशा करून मगच आर्थिक मदत करावी.

**भावनांचा निचरा इथे नको..**

अनेकदा अनेक वयानं मोठ्या माणसांना सोशल मीडिया हे भावनांचा निचरा करण्याचं एक उत्तम माध्यम वाटत असतं. मग ती स्वतःची वॉल असो, ऑनलाईन मैत्री असो की इतर कुठलेही नातेसंबंध. राग आला, जा सोशल मिडियावर, आनंद वाटला टाक पोस्ट, एकटेपणा वाटला तर लगेच कुणालातरी मेसेंजरवर पकड आणि स्वतःची दु:खभरी कहाणी ऐकव किंवा ऐक. असे अनेक उद्योग माणसं करतात आणि जाळ्यात अडकतात. हा ट्रॅप काहीवेळा बाहेरच्या माणसांनी टाकलेला असतो तर काहीवेळा आपल्याच मनाचा असतो.

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, सोशल मीडिया हे आपल्या भावनांचा निचरा करण्याचं माध्यम नाहीये. सोशल मिडियाचा किंवा ऑनलाईन जगाचा बाजार आपल्या जीवावर चालतो. आपण जितकी भावनिक गुंतवणूक जास्त करू तितका सोशल मिडियाचा आर्थिक फायदा त्यात आहे त्यामुळे अशी भावनिक गुंतवणूक आपली असता कामा नये. आपल्या सुखदु:खाचं भांडवल आपण सोशल मीडिया कंपन्यांना देऊन त्यांचा नफा वाढवून स्वतःकडे डिपेन्डन्सीचा त्रास ओढवून घ्यायचा नाहीये. त्यामुळे आपण नेमक्या कुठल्या भावना आणि कशा पद्धतीने व्यक्त करतोय याकडे बारकाईने बघितलं पाहिजे. अनेकदा आपल्याहून वयाने लहान व्यक्तींना चार गोष्टी समजावण्याच्या नादात अनेक मोठी माणसं ट्रोल बनून गेलेली मी बघितलेली आहेत. टीका कुठे संपते आणि ट्रोलिंग कुठे सुरु होतं हे अनेकांच्या लक्षात येत नाही आणि माणसं स्वतःच्या सीमा ओलांडून जातात. जे बरोबर नाही. आयुष्यभर आपण कुणालातरी शिकवतच असतो, लहानांनी ऐकलं पाहिजे हा विचार मनात पक्का असतो, पण सोशल मिडियावर अनेकदा स्वतःचं म्हणणं पटवून देण्याच्या नादात अनेक वयाने मोठ्या माणसांचा तोल जातो आणि ते वेडंवाकडं बोलायला सुरुवात करतात. त्यामुळे आपल्या भावनांचा निचरा करण्याचं हे माध्यम नाही तसंच आपले विचार जगाला शिकवण्याचंही हे माध्यम नाही. आपण चुकूनही ट्रोलिंग आणि बुलिंग करत नाहीयोत ना याकडे सतत बारीक लक्ष ठेवलं पाहिजे. कारण आयटी कायद्यानुसार या दोन्ही गोष्टी गुन्हा आहेत.



**वन्स ऑनलाईन ऑल्वेज ऑनलाईन**

तुमची पोस्ट, फोटो, व्हिडीओ, लाईक किंवा इतर काहीही जे तुम्ही ऑनलाईन जगात जाऊन करता ते कधीही तिथून पुसलं जात नाही. अगदी आपण ते प्रोफाइलमधून, फोनमधून डिलिट केलं

तरीही ते कधीच डिलीट होत नाही. त्यामुळे वन्स ऑनलाईन ऑल्वेज ऑनलाईन ही गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे. म्हणजेच कुठलीही गोष्ट पोस्ट करताना, शेअर करताना,फॉरवर्ड करताना विचार केला पाहिजे. फेसबुक, व्हॉट्स अँप, शेअर चॅट वगैरेवर फिरणारे फॉरवर्ड्स सिरियसली घेताना आणि आपल्याला नेमकी माहिती पहिल्यांदा मिळाली आहे आणि साऱ्या जगाला ती वाटून आपण सगळ्यांचं कल्याण करणार आहोत असं वाटून घेताना क्षणभर थांबा.

काही मुद्दे लक्षात घ्या, स्वतःला काही प्रश्न विचारा.

1) तुमचा हेतू कितीही चांगला असला तरी चुकीची/खोटी/द्वेष पसरवणारी माहिती पुढे पाठवताना आपण कशासाठी आणि काय फॉरवर्ड करतोय याचं भान फार आवश्यक आहे.

2) आपल्यापर्यंत पोचलेलं सगळं खरं नसतं आणि सगळं पोचलेलं पुढे धाडलं पाहिजे असंही काही नसतं.त्यामुळे चुकीच्या माहितीचे वाहक/गुलाम बनून ती पसरवण्यात सहभागी होऊ नका.

3) ही माहिती खरी असू शकेल का? आहे का? (जमल्यास त्यातले तपशील खरे आहेत का हे तपासा, त्यासाठी गुगलची मदत घ्या..कशी त्याविषयी वेगळी पोस्ट लिहिणार आहे.)

4) लॉजिकली विचार करा, पूर्वग्रहदूषित विचार नको. लॉजिकली काही गडबड वाटली, शंका आली तर व्हेरिफाय केल्याशिवाय फॉरवर्ड करू नका.

५) आपण जो फोटो बघतोय तो फोटोशॉप केलेला तर नसेल ना? हा प्रश्न फॉरवर्ड मधल्या प्रत्येक फोटोसाठी विचारा.

६) एखादी गोपनीय माहिती न्यूज चॅनलकडे, वृत्तपत्राकडे असणं वेगळं आणि व्हॉट्स अँप, शेअर चॅट वर अचानक फिरायला लागणं वेगळं. फॉरवर्ड खेळासाठी आपला वापर होतोय का?

७) बातम्या तर्कशुद्ध पद्धतीनेच बघायला हव्यात. तशा आपण बघतोय ना हे स्वतःला विचारा.

८) सतत सकारात्मक मेसेज फॉरवर्ड केले कि सकारात्मकता पसरते हा मोठा गैरसमज आहे. त्यामुळे जगाचं सतत कल्याण करण्यासाठी मेसेज फॉरवर्ड करायच्या मोहापासून स्वतःला वाचवा.

९) हा मेसेज मी का फॉरवर्ड करतोय? त्याचा समोरच्याला उपयोग आहे का? त्याचा समोरच्याला त्रास होणार नाही ना? मी सतत सुप्रभात, शुभरात्री आणि विविध दिनविशेष मेसेज करण्याची गरज आहे का?

१०) फॉर्वर्डच्या निमिताने आपण आपल्या आणि समोरच्याच्या फोनमध्ये डिजिटल कचरा तर तयार करत नाहीयोत ना?

फॉरवर्ड, फेक न्यूज आणि मेसेजेच्या बाजाराचे हुकमी गुलाम म्हणून वावरणं आता तरी आपण बंद केलं पाहिजे...कारण त्याने डिजिटल कचरा तयार होतो, डोक्याचा ताप वाढतो आणि ताणही!

ऑनलाईन जग अद्भुत आहे, जादुई आहे, त्याचा पुरेपूर वापर करून घ्यायचा तर जागतं आणि सजग असायलाच हवं. त्या जगात वावरताना वयाचा अडथळा येता कामा नये, त्याचप्रमाणे कुठल्याही जाळ्यात अडकताही कामा नये. यासाठी,

विचार करा, जागते राहा.



**मुक्ता चैतन्य**
मुक्त पत्रकार, ब्लॉगर आणि सोशल मिडिया विश्लेषक
'स्ट्रगलर्स' १३ ते २३ ' पुस्तके प्रसिध्द,
ब्लॉग रोझ इंडियाच्या सहसंस्थापक
' जस्ट राईट सिनेमा ' वेब साईटच्या संपादक
विविध वृत्तपत्र, मासिके यांमध्ये विपुल लेखन.

संपर्क :९८२३३८८८२८




Sweet Blend

LAYERS OF CONFECTIONS!

# Sweet Blend

Where we bake memories !




**Customized Cake**

**Fresh cream cakes**

**Special Hampers**

**Cupcakes**

**Cakesicles**



**Party orders will be accepted.**
**(Veg &Non-veg)**

sweetblendbyvs sweetblendbyvs

8879471993 - 9004662042

sweetblend.vs@gmail.com

**Shop. No 2 Rathode Niwas Hindu Friends Society Road, Jogeshwari (E) Mumbai 400060**

# सफर मेघालय आणि आसामची





संजय देवस्थळी

डिसेंबर महिन्यातील एका रविवारी सकाळी मोबाईलच्या रिंग मुळे झोपमोड झाली. 'संजय', पलीकडून माझा नाशिकस्थित डॉक्टर मित्र बोलत होता, 'आपण चार महिन्यापूर्वी गुवाहाटीचे तिकीट काढले आहे. विसरलास का?'. मार्च मधील आमच्या ट्रीपसाठी तिकीटदर कमी म्हणून आगाऊ बुकिंग केले होते याची आठवण झाली आणि ते विस्मृतीच्या पडद्याआड गेल्याने मी थोडासा खजील झालो. प्रवासाची अतिशय आवड असतानाही असे का बरं व्हावं? बहुदा ईशान्य भारतातील आसामची सफर असल्याने असेल.

सात बहिणी असं गोजिरवाणं नाव असलेल्या अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, मणिपूर, मिझोराम, नागालँड, त्रिपुरा या सर्व राज्यांपैकी सामान्य माणसाला खूपच कमी माहिती आहे. आसाम सोडले तर इतर राज्यांच्या विषयी अज्ञान, ऐकीव माहिती, अनेक अफवांमुळे येथे



प्रवास करणे म्हणजे भयंकर संकट ओढवून घेणे असे आपल्याला वाटते. मग आम्ही वेगळे कसे असणार? त्यातल्यात्यात आसाम मधील काही भागांना भेटी देऊन, अंदाज घेऊन मग इतर राज्यांची सफर करणे असा सुटसुटीत मध्यमवर्गीय विचार करून आसामच्या प्रवासाची आखणी आणि तयारी केली. आणि सात दिवस अलिबाबाच्या मोहमयी गुहेत फिरल्याचा आनंद लुटला. या मनमोहक गुहेतून बाहेर पडूच नये अस वाटण्यासारखं आसाम सुंदर आहे!

मुंबई ते गुवाहाटी विमान प्रवासात आसामविषयी वाचलेली, ऐकलेली माहिती डोळ्यासमोर येत होती. या प्रदेशांबद्दल अनेक गैरसमज किंवा चुकीची माहिती प्रचारात आहे. भारताच्या या पूर्वेकडील राज्यांना ईशान्य राज्य म्हणणे हे चुकीचे वाटते. दुसरे म्हणजे आसाम म्हणणे तसं बघायला गेले तर चुकीचेच. असम हा उच्चार बरोबर असला तरी आपल्याला तो हिंदी वाटतो. आणखी एक गैरसमज म्हणजे आसामची भाषा बंगाली आहे हा. बंगालमधील अनेक लोकं आसाममध्ये पिढ्यान पिढ्या स्थायिक झाले आहेत. बांगला देशातील बंगाली मुस्लिमांनी तर बंगालसारखा असमचाही फक्त कब्जा घ्यायचाच बाकी ठेवला आहे. या दोनही बंगालींना आपल्या भाषेचा जाज्वल्य अभिमान. मूळ असमिया लोक तसे सोशिक. त्यामुळे बंगालीचा जबरदस्त प्रभाव

दिसून येतो. असे असले तरी असमी भाषा बंगलीपेक्षा वेगळी आहे. काय गम्मत आहे पहा बंगाली, तामिळ, केरळचे लोक कुठल्याही ठिकाणी स्थानांतरित झाले तरी आपली भाषाच बोलतात, आजूबाजूच्या लोकांना बोलायला भाग पडतात. मग महाराष्ट्रात राहूनही मराठी बोलायची आपल्याला लाज का वाटते ?

असम म्हटल्यानंतर डोळ्यासमोर येते ती ब्रह्मपुत्रा नदी. खरं तर ब्रह्मपुत्र असं म्हणणंच बरोबर आहे. ही नदी नसून नद आहे. पुल्लिंग असणारी बहुदा एकच नदी किंबहुना नद. यामुळेच पावित्र्य असले तरी या नदावर पापक्षालनासाठी किंवा शुचितेसाठी स्नान करण्यासाठी घाट नाहीत हे प्रकर्षाने नमूद करावे लागेल.



असमी लोक हे आक्रमक, भांडखोर अशी चुकीची समजूत आपल्याला तत्कालीन राज्यकर्त्यांनी करून दिली आहे. घुसखोर बांगलादेशी, त्यांना मताच्या राजकारणासाठी पाठी घालणारे तत्कालीन राज्यकर्ते, आक्रमक भारतीय बंगाली यांच्या कात्रीत सापडलेल्या मूळ असमियांनी मग आंदोलन उभारले तर काय चुकले ? आज राज्यपालटानंतर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अथक प्रयत्नाने हा प्रदेश मूळ प्रवाहात आल्यासारखा वाटतो हे नक्कीच.

गुवाहाटी विमानतळाबाहेर आम्हाला न्यायला 'असम ऑन व्हील्स' ची गाडी आली होती. ९९ किमी अंतरावर असलेल्या शिलाँग पर्यंतचे अंतर पार करायला साधारण तीन-सव्वातीन तास लागतात. चौपदरी काँक्रिटच्या रस्त्याने जाणे म्हणजे एक सुखावह अनुभव. निळे-जांभळे डोंगर, हिरवीगार झाडी, विविध रंगछटा असणारी मऊशार कुरणे, झाडीतून डोकावणारी टुमदार घरे, छोटी दुकाने, पाण्याची तळी, मत्स्यशेतीची तळी आणि त्यावरील लाकडी पूल, मासे झोळणारी माणसे, स्थानिक कलाकारांनी मांडलेले विक्री स्टॉल हे सर्वच मनमोहक. अशा वेळी एखादा प्रतिभावान कवी म्हणून जातो, 'हिरवळ आणि पाणी. तेथे स्फुरती




मजला गाणी'.

जाता जाता सहज मैलाच्या दगडावर कोरलेली AH १ अक्षरे पहिली आणि एशियन हायवे नंबर १ वरून जात असल्याचा साक्षात्कार झाला. हा हायवे जपान, उत्तर आणि दक्षिण कोरिया, थायलंड, मलेशिया, म्यानमार, पाकिस्तान, भारत, बांगलादेश, अफगाणिस्तान, इराण, तुर्कस्थानला जोडतो. २०,५५७ किमी लांबीच्या, टोकियो आणि इस्तंबूल शहरांना जोडणाऱ्या प्रासिध्द रस्त्यावरून जात असल्याने विनाकारण आम्ही आपली कॉलर उगीचच टाइट केली. रस्त्याच्या बाजूला शाकाहारी आणि मांसाहारी उपहार गृहातील जेवण तर एक अवर्णनीय आनंद. पहिल्याच असमी जेवणाने आम्हाला असमी जेवणाची चटक लावली. दुपारचे जेवण, सृष्टीसौंदर्य चित्रित करायला थांबणे, स्थानिक कलाकारांनी बनविलेल्या शोभेच्या वस्तू पाहणे असे करत करत शिलाँग गाठेपर्यंत दुपार उलटून गेली.

## शिलाँग

पर्यटकांच्या आवडीचे शिलाँग सर्वार्थाने राजधानी शहर आहे. शिलाँगने पूर्वी संयुक्त असमची आणि १९७२ पासून नव्याने निर्माण केलेल्या मेघालयची राजधानी असण्याचा मान पटकावला आहे. हिल स्टेशन असल्याने हवा खूप प्रसन्न आहे. मोठमोठे उद्योग जवळपास नसल्याने प्रदूषण जवळजवळ नाहीच. बऱ्याच वेळा ढग खूप खाली येतात त्यावेळची शोभा काही औरच असते. थंड हवा, आजूबाजूच्या टेकड्या, हिरव्यागार दऱ्या पूर्वाश्रमीच्या ब्रिटिश लोकांना स्कॉटलँडची आठवण करून द्यायच्या. आजही शिलाँगला पूर्वेकडील स्कॉटलंड असे नाव आहे.शिलॉंग मधील प्रसिध्द वार्ड लेक जवळील सर्वात जुन्या, ऐतिहासिक 'पाईन वूड' मध्ये आम्ही आगाऊ आरक्षण करून ठेवले होते. १९व्या शतकात एका स्विस दाम्पत्याने बांधलेले हॉटेल आता मेघालय सरकारच्या अधिपत्याखाली आहे. दिसायला जुने असले तरी सुंदर बगीचा, भव्य परिसर, रंगीबेरंगी फुलांनी डवरलेली अनेक झाडे, लाकडी खोल्या, भव्य स्वागत कक्ष, स्वच्छता आणि टापटीप, सुसज्य जेवणघर यामुळे अजूनही याला खूप मागणी आहे.

संध्याकाळी वार्ड लेकवर चक्कर टाकून आलो. वार्ड किंवा पोलार्ड लेक शंभर वर्ष जुना असला तरी वेळोवेळी योग्य देखभाल केल्याने


Shillong Point

अजूनही खूप उत्कृष्ट अवस्थेत आहे. सुंदर बगीचा, डेरेदार वृक्ष, नितळ पाणी, पोहणारी बदके, या तीरावरून त्या तीरावर जाणारा पूल, नौकानयन या सुविधांमुळे पर्यटकांची पसंती घेऊन जातो. कुठल्याही गावाची, शहराची सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय ओळख करून घेण्यासाठी मी स्थानिक बाजाराला भेट देतोच. शिलाँगचा बाजार - सेंटर पॉईंट छोटेखानी असला तरी सर्व प्रकारच्या वस्तू

दुकानात दिसत होत्या. राज्याची राजधानी तसेच इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची दुकानेही खूप दिसल्याने सामान्यांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी असावी. कुठलाही सणवार नसताना खरेदीकरांची गर्दी होती. एकंदरीत लोकांच्या चेहऱ्यावर समाधान होते.

प्रवासाच्या दुसऱ्या दिवशी अनेक महत्वाच्या स्थळांना भेटी दिल्या. सर्वात प्रथम आम्ही दावकी सीमा पाहायला गेलो. भारत बांगलादेश मधील सीमा अनेक ठिकाणी सच्छिद्र आहे. दावकी हे अगदी नमुनेदार उदाहरण. भारतीय सीमेजवळील एका टेकडीवजा डोंगरावरून सीमेकडे पहिले की दावकी नदी दिसते. तिच्या अलीकडे भारत आणि पलीकडे बांगलादेश. बरेचदा नदीला अतिशय कमी पाणी असते. फक्त गुडघाभर पाण्यातून चालत कोणीही सीमा पार करू शकतो. तेथेच बॉर्डर सेक्युरिटी फोर्सचा फक्त एक शिपाई पहाऱ्यावर असलेली चौकी आहे. नदीच्या पात्रात नदी पार करून आलेले शेकडो बांगलादेशी दिसत होते. आता एक सैनिक इतक्या लोकांवर कसे लक्ष ठेवणार? अनेक बांगलादेशी दावकी, ब्रह्मपुत्रा आणि सीमेवरील अशाच नद्या पार करून येथे येतात. अशा निर्वासितांचा भारतातील पक्ष आणि स्वतःला उदारमतवादी, धर्मनिरपेक्ष म्हणवणाऱ्या लोकांना पुळका आहे. हे लोक इथे स्थायिक होऊन येथील यंत्रणेवर भार टाकतात. राजकीय पक्ष एकगठ्ठा मतांसाठी त्यांना रेशनकार्ड, नागरिकत्व बहाल करतात आणि स्थानिकांच्या वाट्याचे रेशन, नोकऱ्या यांच्या वाट्याला जातात. सी. ए. ए., सी. ए. बी. ला आगोदर चोरून घुसलेले, राजकीय पक्ष म्हणूनच विरोध करतात. काय अवस्था झाली आहे देशाची? स्थानिक देशवासियांना कोणीच वाली नाही हि व्यथा अनेक लोकं मांडताना पाहायला मिळतात. सत्तापालटानंतरही पुढील कारवाई करताना



बहुमतातील सरकारदेखील कचरताना दिसते. पुढे दोन किलोमीटरवर सामान्यांच्या डोळ्यात धूळफेक करण्यासाठी रीतसर चौकी आहे. दोन्ही कडे गेट्स, मध्ये नो मॅन्स लँड वगैरे रीतसर दाखवायच्या गोष्टी आहेत. विषण्ण आणि पराभूत भावनेने आम्ही पुढच्या टप्प्यावर निघालो.



मॉसमई गुंफा

उदासीनता घालवण्यासाठी मग मावलींनॉन्ग गावाला भेट दिली. एशियातील सर्वात स्वच्छ गाव अशी त्याची ओळख गावात शिरताच पटते. टुमदार घरे, छोटे रस्ते गाव पाहताना कमालीची स्वच्छता नजरेत भरते. गावातील लोकच पुढाकार घेऊन आपले गाव या बाबतीत अव्वल राहील याची काळजी घेतात. गावात बहुदा ग्रामपंचायत नसावी एरव्ही गाव स्वच्छ कसे? अगदी सुधारलेले म्हणवणाऱ्या लोकांनीही यातून बोध घ्यावा.

पुढचे स्थळ होते 'रूट्स ब्रिज'. मेघालय मधील लोक झाडाच्या मुळांचे पूल तयार करण्यात वाकबर आहेत आणि असे अनेक पूल येथे आहेत. नदीच्या दोन तीरावरील वाढणाऱ्या झाडांची मुळे एकमेकांत गुंफून या तीरावरून त्या तीरावर जाण्यासाठी पूल तयार केला जातो. दगड आणि माती टाकून चालण्यासाठी व्यवस्थित रस्ता बनवला जातो. यावरून वाटसरूच काय काही ठिकाणी छोटी वाहने पण जाऊ शकतात. मावलींनॉन्ग जवळचा पूल खूप खोल दरीत होता. उतरणे सोपे असले तरी जवळजवळ ७५० पायऱ्या चढायला लागतील म्हणून मी जरा साशंक होतो. तरीसुद्धा असा पूल कधी पाहिला नसल्याने तसेच शिवाजी महाराजांचा आदर्श समोर असल्याने त्यांचेच नाव घेऊन खाली उतरलो आणि सार्थक झाल्याचे वाटले. खरंच ही कला स्थापत्य विशारदांनाही नक्कीच तोंडात बोटे घालायला लावेल. कधी या बाजूला गेलात तर पाहायला विसरू नका. रूट्स ब्रिज पासून थोड्याच अंतरावर एक नैसर्गिक चमत्कार आहे. एका छोट्या दगडावर एक मोठा लांबुडका दगड तोल सांभाळून वर्षानुवर्षे बसला आहे. तरफेचे तत्व, पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र अशापैकी अनेक कारणांपैकी कुठलेही कारण सर्वमान्य नाही. मेघालय प्रवासी खात्यातर्फे दगडाखाली बुटकस ग्रील का लावलं आहे हे समजायला काही मार्ग नव्हता.

पूर्व भागात सूर्य लवकर मावळतो. हे पाहून होईपर्यंत अंधार पडायला सुरुवात झाली. हॉटेलवर परतणे भाग होते. उद्या चेरापुंजीला जायचे होते आणि वाचलेल्या माहितीनुसार तिथेही अनेक आकर्षणे वाट पाहत होती.

### चेरापुंजी आणि आजूबाजूचा परिसर

चेरापुंजीला जाण्यापूर्वी शिलॉंग पॉईंटला भेट दिली. मिलिटरीच्या ताब्यात असला तरी प्रवाश्यांना नोंद करून पॉईंट बघता येतो. १९६५ मी. उंचावरून शिलाँगचे विहंगम दृश्य दिसते.. डोंगर उतारावरील सुबक घरे, क्रिकेटचे मैदान चित्रित केल्याशिवाय समाधानच होत नाही. धुकं नसेल तेव्हा हिमालयाची काही छोटेखानी शिखरेही दुर्बिणीतून पाहायला मिळतात. येथेच लैशिलाँग देवीचे निवासस्थान असल्याची आख्यायिका आहे. शिलाँग नाव त्यावरूनच पडले.

शिलॉंगच्या वाटेवर एलिफंट फॉल्स नावाचा छानसा धबधबा लागतो. धबधब्याला तीन थर आहेत. अगदी तिसऱ्या थरापर्यंत उतरायला पायऱ्यांचा जिना बांधला आहे. अनेक प्रवासी

शेवटच्या खोल थरापर्यंत उतरतात आणि नैसर्गिक सौंदर्याची मजा लुटतात.

चेरापुंजींच्या जवळच सोहरा गावाजवळील मॉसमई गुंफा हे एक भुशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय आश्चर्य. गुंफांपर्यंत जाण्यासाठी डोंगराच्या बाजूला दरीत बांधलेल्या लाकडी पुलावरून जावे लागते. वर गर्द झाडी, डोंगराच्या काटकोनात असलेला पूल, खाली दरी सर्वच मोहक. गुंफा अरुंद आहेत. काही ठिकाणी रांगत जावे लागते. स्टेलॅक्टाइट आणि स्टेलॅगमाइट दगडांचा जन्म कसा होतो हे इथे पाहायला मिळते. गुहेच्या आतील भागात एक गोड्या पाण्याचा तलाव आहे आणि त्यात डोंगरावरील काही झाडांची मुळे पाणी शोधत येथपर्यंत आलेली दिसतात. भिंतीवरील काही दगडांवर जीवाश्मे पाहायला मिळतात. गुहेत खूप वेळ फिरून आम्ही निसर्गाचे कौतुक करत बाहेर पडलो.

या गावाजवळच सात धारा असलेला सुंदर 'सेव्हन सिस्टर वॉटर फॉल' पाहायला आवर्जून गेलो. ३१५ मी. उंचीवरून पडणारा प्रपात धुकं नसेल तेव्हा पाहणे एक भाग्य म्हणावे इतकी त्याची शोभा अवर्णनीय आहे. आम्ही गेलो तेव्हा दुपार टळून गेली होती. धबधबा धुक्यात केव्हाच पडदानशीन झाला होता. तरीसुध्दा आपल्या धीरगंभीर आवाजाने अस्तित्वाची जाणीव करून देत होता.

नोहकालीकाई फॉल्स नावाचा एक अतिसुंदर धबधबा जवळच आहे. चेरापुंजी जगातील सर्वात जास्त पाऊस पाडण्याचे ठिकाण आहे. एका छोट्याश्या पठारावरून साठलेले पावसाचे पाणी ३४० मी. उंचीवरून दरीतील कुंडात कोसळते. नोहकालीकाई फॉल्स संदर्भातील लोककथा येथील लोक रंगवून सांगतात. एका पुनर्विवाहितेच्या नकळत तिच्या बाळाला दुसऱ्या नवऱ्याने मारून त्याचे मास तिलाच खायला दिले. आईला जेव्हा समजले तेव्हा दु:खाने वेडीपिशी होऊन तीने या धबधब्याजवळ स्वत:ला झोकून आत्महत्या केली. तिच्या का लिकाई नावावरून फॉल्सला नाव पडले. एका दु:खद कथेची आठवण करून देणारा फॉल्स मात्र अतिशय नेत्रदीपक आहे. जगात असे काही विरोधाभास असतातच!

**काझीरंगाला आगमन**

गाडी काझीरंगाच्या दिशेने पळत होती. लहानपणापासून काझीरंगाला भेट देण्याची स्वप्ने मी पाहत असे. ब्रह्मपुत्र खोऱ्यात अदमासे ५२० स्क्वे. किमी. दलदलीच्या प्रदेशात वसलेल्या काझीरंगा अभयारण्यात जगातील ७० टक्के एकशिंगी गेंडे काझीरंगात घर करून आहेत. काझीरंगा म्हणजे छोटी-मोठी डबकी, दलदल, गवताळ प्रदेश आणि घनदाट अरण्य. छोट्या छोट्या 'मिकीर' टेकड्यांनी भरलेला प्रदेश. दलदल असल्याने रानम्हशीं, अनेक प्रकारची




हरणे, पाणथळीतील पक्षी, चिखल तुडवणारे पक्षी आणि काझीरंगाचे भूषण असलेले गेंडे येथे खूप मोठ्या संख्येने आढळतात. जंगलांमुळे अनेक शिकारी पक्षी, वाघ, बिबळे आढळतात. माझ्यासारख्या वन्यजीव अभ्यासक आणि फोटोग्राफर्सचे नंदनवन.

काझीरंगामध्ये शिरल्यावर डावीकडे एक 'व्ह्यू पॉईंट' आहे. समोरील मोठ्या गवताळ मैदानात दूरवर गेंडे, रानम्हशीं, हरणे एकत्रित चरत होते. झाडावर दोन वेस्टर्न हुलॉक गिबबॉन पाहिल्यावर काझीरंगाला आल्याचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

अशा सुंदर ठिकाणी काँक्रीटच्या जंगलात न राहता आम्ही एका नेचर कॅम्प मध्ये व्यवस्था केली होती. दलदलीच्यापासून चार-पाच फूट उंचावर असलेल्या प्लॅटफॉर्मवर कॉटेज होत्या. बाहेरून गवताने शाकारलेल्या, आतून मातीने सारवलेल्या झोपड्या आधुनिकतेने परिपूर्ण होत्या. जेवणघर फक्त बांबू आणि स्थानिक वस्तू वापरून बनविलेले. जेवणही अप्रतिम. जंगल में मंगल म्हणण्यासारखी उत्तम सोय. साडेपाच तासांचा प्रवास, स्वप्नवत परिसर, सुरेख जेवण यामुळे झोप कधी लागली ते समजलेच नाही.

**काझीरंगा सफारी**

अगदी जवळून गेंडे पाहायचे असतील तर हत्तीच्या पाठीवरून सफारी करणे चांगले. दलदल, एलिफंट ग्रास यातून हत्ती आरामात जाऊ शकतो. गेंडा सुद्धा हत्तीला जवळ येऊ देतो. गेंड्याची दृष्टी कमकुवत असल्याने त्याला पाठीवर बसलेले पर्यटक दिसत नसावेत किंवा हत्तीपासून धोका नाही असे वाटत असावे. माहूत हत्तीला अनेक गेंड्याच्या जवळ घेऊन गेला आणि आपण त्यागावचे नाहीत अशा अविर्भावात गेंडे चरत राहिले. असे असले तरी गेंडा माथेफिरू असतो. क्वचित प्रसंगी मन खाली करून हत्तीवर चालून येतो. अशा वेळी महाकाय हत्ती सुध्दा शेपूट वर करून सुसाट पळत सुटतो.

भारतीय गेंडे आणि आफ्रिकन गेंड्यात अनेक फरक आहे. भारतीय गेंडा एकशिंगी तर



तोल सांभाळून बसलेला दगड

आफ्रिकन दोन शिंगी. आफ्रिकन गेंडा आकाराने थोडा मोठा. आफ्रिकन गेंड्याच्या कातडीवर वळ्या नसतात. जाड कातडी, वळ्या आणि रिबिट मारल्यासारखे उंचवटे असल्याने भारतीय गेंडा चिलखती रणगाड्यासारखा दिसतो. आक्रमकही तसाच.

ज्याला शिंगं म्हणतात ते खरे केसांसारखे तंतू वाढत एकमेकात गुंतत तयार होते. त्यात हाड नसते आणि कवटीला पण जोडलेले नसते. यात पौरुषत्व वाढवण्याचे गुणधर्म असतात असा एक गैरसमज झाल्याने अनेक गेंड्यांची शिकार होते. माणूस पौरुषत्व वाढवण्यासाठी काय खाईल याचा नेम नाही. आसाम शासनाने आता गेंड्यांच्या शिकारीबद्दल जबरदस्त शिक्षा ठेवल्याने अवैध हत्येला खूप आळा बसला आहे.

हत्तीसफारी करून त्याच दिवशी पूर्व भाग आणि पश्चिम भागात जीप सफारी केल्या. हरण, ससे, रानडुक्कर, रानम्हैस, हत्ती असे अनेक प्राणी त्याचप्रमाणे विविध बगळे, बलाक , तुतारी, ससाणे, गरुड चमच्या, पेलिकन असे अनेक पक्षी पाहिले. अचानक एक हत्ती एका जीपवर चालून जाण्याचा प्रसंग अजूनही आठवणीत आहे. अर्थात चालक प्रशिक्षित असल्याने काही विपरीत प्रसंग घडत नाहीत. काझीरंगाच्या आठवणी मनात आणि कॅमेऱ्यात चित्रित करून निरोप घेतला आणि गुवाहाटीला प्रयाण केले.

कामाख्या मंदिर, गुवाहाटी

पार्वतीच्या मृत्यूनंतर शंकराने शोकाकुल अवस्थेत तिचे पार्थिव घेऊन तांडव केले. त्याचा वेग आणि आवेग इतका होता की पार्थिव शरीराचे अनेक तुकडे झाले आणि नृत्य सुरु असताना अनेक ठिकाणी पडले. प्रत्येक ठिकाणी एक एक शक्तीपीठ स्थापन झाले. ज्या ठिकाणी योनी असलेला भाग पडला त्या ठिकाणी कामाख्या शक्तीपीठ स्थापन झाले अशी आख्यायिका आहे. कामाख्या शक्तीपीठ नीलांचाल पर्वत श्रेणीत, गुवाहाटीपासून ६ किमी. अंतरावर आहे. मंदिराचे बांधकाम दगडी असून स्थापत्याचा



सुरेख नमुना आहे. येथे भाविकांची गर्दी कायम असते. देवीला नवस बोलून तो पूर्ण झाल्यावर कोंबड्याच्या किंवा बकऱ्याचा बळी चढवण्याची प्रथा आहे. येथील भटजी ब्राम्हण असले तरी प्रसाद म्हणून मांसभक्षण करतात असे समजले. योनी पडल्याने शक्तीपीठ स्थापन झाले असल्याने महिन्यातून चार दिवस देवीला ऋतुस्राव होतो अशी मान्यता आहे. स्थानिक जाणकार मंत्रमुग्ध होऊन सांगत होता. दिवेलागणीची वेळ होती. टेकडीवरून गुवाहाटी शहराचे दिवे हळूहळू लागताना दिसत होते. अशा रम्य सायंकाळी समोरचे दिवे बघून मन थोडे भावुक होतेच. 'शुभंकरोती कल्याणं आरोग्यम धनसंपदा'... नकळत अनुष्टूभ बाहेर पडले. मुक्काम संपला होता. हॉटेलवर जाऊन सामानाची बांधाबांध करून निघायचे होते. असमला बायबाय करून आणि लवकरच सातही राज्यांचा दौरा करायचे वचन देऊन जड अंतःकरणाने विमानात पाय ठेवला. आता वाट पाहत आहे पुनर्भेटीचा योग कधी येतो आहे याची........




**संजय देवस्थळी**
इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि व्यवस्थापनातील पदवी.
डॅनिश कंपनीमध्ये कार्यकारी संचालक
वन्यजीवांचा सखोल अभ्यास, लेखन आणि सहलींचे आयोजन.
सर्व प्रकारच्या फोटोग्राफीचा अभ्यास, छंद आणि व्यवसाय

संपर्क : ९८३३८६६४६२




# प्राचीन भारतीय विमान विद्येचे आद्यसंशोधक - पंडित शिवकर बापूजी तळपदे




अमेया जाधव

गेली शंभर वर्षे आपण ऐकत आलो आहोत की विमानाचा शोध हा इ. स. १९०३ साली राइट बंधूंनी अमेरिकेत लावला. संपूर्ण जगाने ह्या घटनेला मान्यता दिली आहे. पण मुंबईत गिरगाव चौपाटीवर असाच एक प्रयोग करण्यात आला. त्याचे श्रेय वेदविद्या अभ्यासक, संशोधक पं. शिवकर बापूजी तळपदे यांना जाते. भारत पारतंत्र्यात असल्यामुळे ही घटना त्यावेळेच्या राज्यकर्त्यांनी पूर्णपणे दडपून टाकली. सगळे पुरावे नष्ट करण्यात आले. स्वातंत्र्यासाठी भारावलेल्या आपल्या तत्कालीन देशबांधवांनी, प्रेरणादायी चरित्रे असणा-यांनी, स्वातंत्र्य प्राप्त करण्याचे प्रयास करत असतानाच, अत्यंत द्रष्टेपणाने भारतीय विद्यांचा, भारतीय साहित्याचा अत्यंत अभ्यासपूर्ण, सखोल असा अभ्यासही केला होता. अशा या थोर देशभक्तांची मांदियाळी आपल्या देशात दिसते. त्यांतील एक म्हणजे पं. शिवकर बापूजी तळपदे हे होत. भारतातील पुष्कळ लोकांना ह्यांचे नाव विमान तयार करणारे पहिले भारतीय म्हणून ठाऊक आहे; परंतु हा पं तळपदेंच्या कर्तृत्वाचा एक पैलू आहे. त्याहून त्यांचे कर्तृत्व अधिक उंचीचे आहे, हे लोकांपर्यंत पोहोचावे म्हणून हा एक छोटासा प्रयत्न.

बालपण आणि अध्ययनाविषयी थोडेसे - महाराष्ट्रातील अत्यंत प्रगतीशील समुदाय पाठारे प्रभु समाजामधे, इ. स. १८६४ साली मुंबई येथे जन्म झालेल्या शिवकरजींच्या मनात बालपणापासूनच ध्येयासक्ती आणि राष्ट्रप्रेम यांचे बीज रूजलेले दिसते. पुढे राष्ट्रप्रेमाने भारावलेल्या तळपदेंनी, आपल्या गृहस्थाश्रमी







जीवनाची बाजू सांभाळत आपली अध्ययनसाधना आजन्मभर चालू ठेवलेली आपल्याला दिसते. इ. स. १८८१-८२ च्या आसपास त्यांनी जे. जे स्कूल ऑफ आर्टस् मधे प्रवेश घेतला. त्यांचे कलाशिक्षक होते पंडित चिरञ्जीलाल वर्मा. पंडित वर्मा हे कलेबरोबरच वेदविद्येचेही चांगले जाणकार होते. स्वामी दयानंद सरस्वती यांनी केलेल्या वेदभाष्याच्या पद्धतीला अनुसरत वेदमंत्रांचा वैज्ञानिक अर्थ ते करत असत आणि वेदांमधे विद्यमान् असलेल्या विविध विद्यांबाबत ते आपल्या विद्यार्थ्यांना सांगत असत. त्यांच्या विचारांनी प्रभावित झालेल्या तळपदेंच्या मनात वैदिक काल आणि तत्समयी असणारे विज्ञान विषयक दृष्टिकोण हे पूर्णांशाने बिंबले गेले आणि अधिक अध्ययनासाठी ते प्रवृत्त झाले. पुढे जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् मधे अध्यापनाचे कार्य करत असताना, प्राचार्य जॉन ग्रिफिथ यांच्याबरोबर बीजापूरचे सर्वेक्षण, अजंठा येथील गुफांमधील चित्रांचे अध्ययन आणि जतन ह्या प्रकल्पात ते सहभागी झाले.

अध्यापनाचे कार्य करत असतांनाच, पं. चिरञ्जीलाल वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी भारतीय शास्त्रांचे अध्ययन करावयास सुरुवात केली. स्वामी दयानंद सरस्वतींच्या विविध ग्रंथसंपदेतून विमानविद्या विषयक मूलभूत सिद्धांत त्यांनी सखोल अभ्यासले. चारही वेद, ब्राह्मण, आरण्यक, उपनिषद्, सहा वेदाङ्गे यांचे उपवेदांसह अध्ययन त्यांनी केले. ह्या सगळ्या काळात विमानविद्याविषयक प्रयोग करण्याचा त्यांचा संकल्प अधिकाधिक दृढ होत गेला. प्राचीन संस्कृत साहित्यातून या विद्येचा अभ्यास करत असताना त्यांनी पश्चिमेकडील देशांमधे विमानविद्येविषयक होणारे प्रयोगही सविस्तर अभ्यासले. या सर्वांचाच परिपाक म्हणजे त्यांच्या प्रयत्नातून इ. स. १८९२ साली उभी राहिलेली प्रयोगशाळा होय.

मरुत्सखाची योजना- वेदमंत्रांवर सखोल चिंतन करुन त्यांचा वैज्ञानिक अर्थ स्पष्ट करत प्रायोगिक तत्त्वावर त्याची सिद्धता पडताळत अशा पद्धतीने ते आपले संशोधन कार्य पुढे नेत होते. ह्या पद्धतीने अहर्निश प्रयत्नशील राहात त्यांनी विमानाचे एक प्रतिमान (model) तयार केले. आपला अभ्यास आणि संशोधन सगळ्यांसमोर ठेवून अभ्यासकांच्या सूचना प्राप्त करण्याच्या हेतूने, आपल्या म्हात्रे नामक मित्रद्वयांमार्फत, त्या प्रतिमानाचे एक चित्र बॉम्बे आर्ट सोसायटी येथील प्रदर्शनात त्यांनी ठेवले होते. त्यांची 'प्राचीन विमानकलेचा शोध' या विषयावरील तीन व्याख्याने खूप गाजली. त्यांच्या या व्याख्यांनातून युरोपातील विमानविद्येचा इतिहास आणि भारतातील विमानविद्येचा




इतिहास यांचे सखोल विवेचन त्यांनी केलेले आहे. विमानविद्येची बीजे वेदांत कशा प्रकारे दिसून येतात याचा विचार त्यांनी ह्या व्याख्यांनातून केला आहे. त्यांच्या विद्वत्तेचा गौरव 'विद्याप्रकाशवारिधि' ही उपाधि त्यांना देऊन करवीरपीठाच्या श्रीशंकराचार्यांनी केलेला दिसतो.

विमानाचे प्रतिमान तयार करण्याचे महद् योगदान तळपदेंनी दिले होते, परंतु त्यांना पुढील कार्यासाठी साहाय्य हवे होते आणि त्यांना ते प्राप्त होऊ शकले नाही हे वास्तव आहे. परंतु, इ. स १९१५ साली त्यांच्या या कार्याच्या दृष्टीने एक खूप महत्त्वाची घटना घडली. बेंगरूळू येथील प्राचीन शास्त्र आणि तंत्रज्ञान यांचे चांगले जाणकार पंडित सुब्राय शास्त्री नामक स्वामी शंकराचार्यांच्या परंपरेतील एक महात्मा तळपदेंच्या संपर्कात आले. त्यांनी तळपदेंना महर्षि भारद्वाज कृत 'यंत्रसर्वस्व', 'अंशुबोधिनी', 'आकाशतंत्र' आदि प्राचीन ऋषि – महर्षिंच्या विमानविद्या संबंधित भौतिकशास्त्रे शिकविली. त्यांच्या प्रयासानंतर, पं. सुब्राय शास्त्रीं बरोबर तळपदेंनी इ. स. १९१५ ते १९१७ या दरम्यान 'मरुत्सखा' नामक विमानाचे प्रायोगिक दृष्टीने उड्डाण घडविले.

चिंतनशील संशोधक आणि सर्जनशील लेखक- वेदांचे पठण – पाठण आणि अध्ययन या हेतूने पं. वर्मा यांनी स्थापित केलेल्या वेद-धर्म प्रचारिणी सभेच्या स्थापनेपासूनच तळपदे तिच्याशी जोडले गेले आणि पं. वर्मांच्या मृत्यु पश्चात् त्यांनी ह्या सभेची धुरा समर्थपणे वाहिली. शामराव कृष्ण आणि मंडळी यांनी प्रकाशित केलेल्या आर्य-धर्म पत्रिकेचे संपादक म्हणून तळपदे यांनी काम पाहिलेले दिसते. 'ऋग्वेद-प्रथमसूक्त व त्याचा अर्थ' या आपल्या पुस्तकात, स्वामी दयानंद सरस्वतींच्या भाष्यशैलीला अनुसरत ऋग्वेदाच्या पहिल्या सूक्तातील नऊ ऋचांचे, आध्यात्मिक आणि भौतिक असे दोन अर्थ, ते अतिशय सुबोध भाषेत करतात. वर उल्लेखिलेली त्यांची दोन्ही पुस्तके, 'प्राचीन विमानकलेचा शोध' आणि 'ऋग्वेद-प्रथमसूक्त व त्याचा अर्थ', मराठी भाषेत आहेत. हिंदी भाषेत लिहिलेले त्यांचे पहिले पुस्तक म्हणजे

'योगदर्शनान्तर्गत शब्दों का भूतार्थ दर्शन' हे होय. या पुस्तकात महर्षि पतंजलींच्या योगदर्शनातील ४४५ शब्दांपैकी अनुक्रमणिकेनुसार ४१ शब्दांचे आर्ष (वैदिक) ग्रंथांच्या आधारे व्याख्या करताना ते दिसतात. हिंदी भाषेतील त्यांचे दुसरे पुस्तक म्हणजे 'मन और उसका बल' हे होय. याबरोबरच, गायत्री मंत्राचे रहस्य उलगडवून दाखविणारे त्यांचे 'गुरुमन्त्रमहिमा' नावाचे पुस्तक गुजराती भाषेत आहे. एका अर्थाने, संस्कृत, मराठी, हिंदी, गुजराती आणि इंग्रजी या भाषांचा त्यांचा अभ्यास चांगला होता हे आपल्या सहज लक्षात येते. आपले संशोधन करत असतानाच १७ सप्टेंबर १९१७ रोजी त्यांनी इहलोकीची यात्रा संपन्न केली. आज संपूर्ण भारतात विमान निर्माण करणारे पहिले भारतीय अशी त्यांची ओळख आहे.

मुंबई विद्यापीठात इ. स. २०१५ साली झालेल्या १०२ व्या इंडियन सायन्स कोंग्रेस मध्ये प्राचीन भारतीय विमानशास्त्र हा विषय बराच गाजला. त्याचे पडसाद पार नासापर्यंत पोहोचले होते. पार्ले टिळक विद्यालयाचे माजी विद्यार्थी कॅप्टन आनंद जयराम बोडस यांनी हा विषय संशोधकांच्या समोर मांडला होता आणि आपल्या भाषणात महर्षि भारद्वाज यांच्या 'बृहत् विमानशास्त्र' याचा अभ्यास करून तरुणांनी आधुनिक साधनांचा वापर करून संशोधन करावे असे सर्वांना आवाहन केले होते. कॅप्टन आनंद जयराम बोडस यांचे 'प्राचीन भारतीय विमानशास्त्र' हे पुस्तक २० वर्षांपूर्वी प्रकाशित होऊन त्यावर त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात शेकडो व्याख्याने दिली आहेत. आज पार्ल्याच्या वेशीवर चकाला सिगारेट फॅक्टरीच्या चौकाला काही वर्षांपूर्वी काही जणांच्या पुढाकाराने नाव देण्यात आले आहे. विमानतळावर जाण्याचा आपल्या सर्वांचा खरतर हा नेहमीचा रस्ता पण पटकन आपले कुणाचेच लक्ष कधी गेले नसेल. पाठारे प्रभू समाजातील मूळचे गिरगावकर पंडित तळपदे यांचे वंशज आज पार्लेकर आहेत हे आपल्या पार्ल्याचे भूषणच म्हणता येईल. थोडक्यात म्हटले तर पंडित शिवकर बापूजी तळपदे म्हणजे काळाच्या ओघात हरवलेले एक अभूतपूर्व व्यक्तिमत्त्व..!


मूळ लेखक- बिजय प्रसाद उपाध्याय, वैदिक विमानविद्या शोधकर्ता, पंडित शिवकर बापूजी



तळपदे कृत 'प्राचीन विमानकलेचा शोध' ह्या पुस्तकाचे संपादन, भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञान (शिल्पवेद) अंतर्गत १० शिल्पशास्त्र, ३२ शिल्पविद्या आणि ६४ शिल्पकला याविषयी संशोधन, पंडित तळपदे यांच्या वेदविद्या साहित्याचे संकलन, संपादन

bijayprasadupadhyay@gmail.com

सहयोगी-



प्राध्यापिका (डॉ.) लीना हुन्नरगीकर, संस्कृत विभाग, H. P. T. Arts and R. Y. K. Science College, Nashik. वैदिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यावर संशोधन, पंडित तळपदे यांच्या वेदविद्या साहित्याचे संकलन, संपादन.



**प्रा. अमेया जाधव**

एम ए संस्कृत, एम इ इलेक्ट्रोनिक्स टेलीकम्युनिकेशन, अभियांत्रिकी महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापिका आणि मुंबई विद्यापीठ, संस्कृत विभागात अभ्यागत प्राध्यापिका, मुंबई विद्यापीठात २०१५ साली झालेल्या १०२ व्या भारतीय विज्ञान कॉंग्रेसमध्ये स्व. कॅप्टन आनंद जयराम बोडस यांनी सादर केलेल्या 'प्राचीन भारतीय विमानशास्त्र' पेपरसाठी साहाय्यक म्हणून काम


संपर्क : ९८६७४ ५८५३५



# जैव-विज्ञानाचे अर्धशतक



सद्‌गुरू कुळकर्णी



1850-1900 1900-1950 1950-2000 2000-2050

विज्ञानविश्वातील गेल्या दोन शतकांमधील प्रगती पाहिली, तर असं दिसतं, की प्रत्येक अर्धशतक एका वेगळ्या मूलभूत विषयाने गाजवलं आहे. एकोणिसाव्या शतकाचा दुसरा भाग, म्हणजे १८५० ते १९०० हा रसायनशास्त्र आणि रसायन तंत्रज्ञान ह्यांनी गाजवला; आजच्या रासायनिक कारखान्यांची कितीतरी उत्पादने त्या अर्धशतकात शोधली गेली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धाची सुरुवात, रॉंटजेनच्या 'एक्स रे'च्या शोधापासून आणि आईन्स्टाईनच्या 'फोटो-इलेक्ट्रिक इफेक्ट' पासून सुरु झाली ती पुंज-सिद्धांत, लेसर आणि अणू- ऊर्जा ह्यांसारखी उच्च शिखरं गाठून संपली. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेर शिकागोच्या ॲलन टुरिंग आणि आय बी एम ह्यांनी छोट्या प्रमाणात सुरु केलेलं संगणक तंत्रज्ञान विसाव्या शतकाचा उत्तरार्ध गाजवून गेलं, आणि त्याची बरी-वाईट फळं आपण आजतागायत चाखतो आहोत. एकविसावं शतक मात्र 'जीव-शास्त्रा'चं आहे, असं म्हटलं जातं. तसं म्हटलं तर जीव-शास्त्र हे मानवजाती इतकंच जुनं आहे! पण आपल्या दैनंदिन जीवनात त्याचा परिणाम होण्याएवढी गती मात्र गेल्या वीस वर्षांत पाहायला मिळते आहे; आणि म्हणूनच ह्या लेखमालिकेचा रोख जीवशास्त्रातील शोध आणि त्यांचा आपल्यावर होणारा परिणाम ह्या विषयावर ठेवला आहे.

जैव-विज्ञानाचा आवाका अवाढव्य आहे!- त्यात शेती आणि अन्नपदार्थ निर्माण येतं; वैद्यकशास्त्र, औषधीनिर्माण आणि औषधोपचाराचं विज्ञान येतं; जीव-जंतूचा वापर करून वेगवेगळे रासायनिक पदार्थ बनवणं येतं; जैव-दहशतवाद (Bio-terrorism), जनुकतंत्रज्ञान येतं, ह्या सर्व विषयांमध्ये गेल्या पाव शतकात महत्वाचे शोध लागले गेले. जैव-वैज्ञानिक शास्त्रातल्या प्रगतीचा असा मागोवा घेण्याचा प्रयत्न अनेक वेळा झाला आहेच. त्यातील महत्वाचे मैलाचे दगड पुढीलप्रमाणे:



नव्वदीच्या शतकात सुरू झालेला मानवी जनुकीय नकाशा बनवण्याचा प्रकल्प २००० साली पूर्णत्वास गेला. आपल्या शरीरात कोणते जनुक, कुठे आहेत, त्यातील कोणते सक्रिय आहेत आणि कोणते नाहीत ह्याचा शोध


घेण्याचं आव्हान जीनोम-२०००ने उभं केलं. वीस ते पंचवीस हजार जनुकांपैकी फक्त दहा टक्क्यांपेक्षा कमी जनुकांचं कार्य आपल्याला ठाऊक झालं असण्याची शक्यता आहे! उरलेल्या नव्वद टक्क्यांवर जनुकांना काम नसावं किंवा ते इतर प्रमुख जनुकासमवेत कार्यात मदत करत असावेत; किंवा त्यांचं कार्य शोधण्यात आपण कमी पडत असावेत! ह्या हजारो जनुकांचं कार्य शोधणं आणि त्या कार्याचं नियंत्रण करण्याची क्षमता कमावणं, हे जैवशास्त्रज्ञांच्या पुढचं भव्य काम आहे. कमीत कमी दोन पिढ्यातरी हे काम सुरु राहील असा आजचा अंदाज आहे. जसं अणूच्या विघटनातून शक्ती निर्माण होते हा शोध. शिकागोच्या फर्मी लॅब मध्ये' लागून त्याचा वैधानिक किंवा विघातक वापर करण्यासाठी तीन चार दशकं लागली आणि अजून कित्येक प्रश्न अनुत्तरित आहेत, तसं हे काम आहे!

सजीवाला जगण्यासाठी असलेली एक महत्वाची गरज म्हणजे अन्न. मनुष्याचं अन्न दोन



प्रकारचं असतं- शाकाहारी, म्हणजे वनस्पतीजन्य आणि मांसाहारी- म्हणजे प्राणिजन्य. वनस्पतीजन्य पदार्थ बनवायला, पुरेशी जमीन, पाणी आणि हवामान पाहिजे- तिन्ही बाजूंनी पुरवठा हा गरजेपेक्षा कमी होतोय. प्राणिजन्य आहाराच्या बाबतीतही तीच समस्या, शिवाय प्राण्यांसाठी लागणारा आहार हा वनस्पतीजन्यच; आणि प्राण्यांमुळे निर्माण होणाऱ्या अमाप $CO_2$ चा धोका. आहे त्या जमिनीची सदोदित खाली घसरणारी गुणवत्ता; ऱ्हास आणि क्षारीभवन! ह्या सर्वांमुळे आहाराची उत्पादकता वाढवणं हे जैव-वैज्ञानिकांचं प्राधान्य होऊन बसलं आहे. ह्या बाबतीत मात्र विज्ञान पुढे आहे- कमी पाण्यात वाढणाऱ्या वनस्पती, खाऱ्या जमिनीत वाढणारी भातशेती, किड्यांपासून, फंगस पासून, टोळधाडीपासून वाचणारी धान्य, वाढीचा वेग आणि अन्नाची गुणवत्ता ह्या दोन्ही बाबतीत श्रेष्ठ असणारी तृणधान्य आणि भाज्या, कृत्रिम मत्स्यशेती, ह्या सर्वांसाठी लागणारं तंत्रज्ञान जवळ-जवळ तयार आहे. पण तिथे समस्या आहे ती अशा बायो-इंजिनीअरिंग केलेल्या वनस्पतीजन्य अन्नाच्या दीर्घकालीन दुष्परिणामांची आणि त्यामुळे अशा अन्नाबद्दल लोकांच्या मनात असणाऱ्या दुजाभावाची- भीतीची! त्यातल्या त्यात सांगायचं तर कृत्रिम मांसाहारासाठी फॅक्टरीमधली उत्पादनं मात्र जोरात सुरू आहेत. ह्या उत्पादनात इस्त्राएल पुढे असून त्यांच्या बायोरिएक्टरमध्ये बनवलेल्या कृत्रिम उत्पादनांनी गुणवत्ता, शुद्धता, विविधता, किंमत आणि ग्राहकाची आवड ह्या सर्वच बाबतीत खऱ्या मांसाला मागे टाकलं आहे.

एवढं करूनही रोग आणि व्याधी होतातच




आणि रोगांवरती औषधं हा जगभर पसरलेला मोठ्ठा व्यवसाय झाला आहे. 'कोरोना' काळात तर, इतर अनेक उत्पादनांत हे कारखाने बंद असताना औषध व्यवसायाने मात्र आता पर्यंतचे विक्रम ओलांडलेत! अमेरिकेतील, कोरोनावर लस बनवणाऱ्या, एका मोठ्या औषध उद्योगाचा एका सेकंदाचा फायदा हजार डॉलर, म्हणजे सत्तर हजार रुपयांवर गेला आहे म्हणतात! औषधं महाग असतात कारण त्यांचा शोध लावण्यामागे ह्या कंपन्या आठ ते दहा वर्षं आणि दहा ते पंधरा अब्ज रुपयांपर्यंत खर्च करतात. ह्या बाबतीतही आधुनिक जैवतंत्रज्ञान कामी येत आहे. फक्त ट्रायल-एरर पद्धतीने औषधांचा शोध न घेता, रोगांचे मूलभूत कारण शोधून, त्या मागचे जनुकं शोधून, सुयोग्य प्रथिनं निर्माण करण्याची क्षमता आता औषधं शोधणाऱ्या शास्त्रज्ञांच्या दृष्टीपथात आली आहे; आणि असा शोध घेण्याची किंमतही दिवसागणिक कमी होते आहे. लवकरच औषधी शोधण्यात यश मिळण्याचा निर्देशांक दसपटीने वाढून, लागणारा वेळ पाच पटीने कमी होऊन त्यामानाने स्वस्त आणि हमखास औषधं लवकर बनवण्याची शक्यता ह्या क्षेत्रात निर्माण होणार आहे. कोरोना काळात लस बनवण्याचा कालावधी वर्षांपासून महिन्यांपर्यंत आलेला आपण पाहिल आहेच. परंतु नव्या जगाचे, नव्या जीवनशैलीचे नवे रोग जुन्यांचा ताबा घेताहेत. कोरोनाकाळात ज्या वेगाने व्हायरस बदलतो आहे, त्या वेगाला आपल्या संशोधनाचा वेग कमी पडतो आहे! ह्याशिवाय, प्रयोगशाळेतून चुकून-चकवून बाहेर पडून शहरंच्या शहरं उजाड होण्याचा धोका आहेच!



उत्तम अन्न, रोग किंवा व्याधींचं वेळेआधी निदान, खात्रीलायक सर्जरी, ह्या सर्वांमुळे मनुष्याचं सरासरी आयुष्यमानही वाढत आहे. पण वाढत्या आयुर्मानाबरोबर वाढत्या वयाच्या व्याधीचं प्रमाण वाढत आहे. चीन, जपान, युरोप सारख्या प्रदेशांत, डिमेन्शिया, अल्झायमर्स, होणाऱ्या लोकांची संख्या दिवसागणिक वाढत आहे. ह्या व्याधींना अजून उपाय नाहीत. त्यांचं मूळ कारण, त्यांच्या प्रक्रियेत भाग घेणारी प्रथिनं, त्यांवरच्या औषधी... ह्या सर्वांवर प्रगत देश अब्जावधी डॉलर्स खर्च करत आहेत. काही माणसं शतायुषी असण्यामागचं कारण शोधून ती क्षमता उत्तरांमध्ये घालून आयुर्मान वाढवण्यासाठी प्रयोग सुरू आहेत. ह्या संशोधनाचा रोख सध्या तरी गोऱ्या लोकासाठीच आहे. त्यामुळे उपाय मिळाला तरी त्यांचा इतर वंशाच्या लोकांसाठी वापर आणि परिणामकारकता ह्याचा शोध घेण्यात कित्येक वर्षं जातील. संशोधनाची अनेक क्षेत्र अजून अस्पर्शित आहेत.

वॉटसन आणि क्रिक ह्यांनी सत्तर वर्षांपूर्वी

'डीएनए'च्या रेणूची संरचना शोधून काढली, तेव्हा त्याच्या यशात, दोघांची वेगवेगळी शास्त्रीय पार्श्वभूमी हा महत्वांचा मुद्दा होता. आता मात्र आपल्या मूळच्या क्षेत्राबाहेर काम करणं, हीच यशाची गुरुकिल्ली झाली आहे! गेल्या काही दशकांत शास्त्रीय संशोधनातील भिंती कोसळून पडताना दिसत आहेत. वैद्यक शास्त्रज्ञ कृत्रिम बुध्दिमत्तेच्या क्षेत्रात, रसायन-अभियांत्रिकी तज्ञ रक्तवाहिन्यांच्या शस्त्रक्रियांत, गणितज्ञ जीवशास्त्राच्या क्षेत्रात काम करताना दिसत आहेत. गेल्या दहा वर्षातील नोबेल पारितोषिक विजेत्यांची पार्श्वभूमी पाहिली तर हा मुद्दा अधिकच प्रमाणात स्पष्ट होतो आहे. आपल्या शिक्षण पद्धतीने ह्या आव्हानाचा गंभीरपणे विचार केलेला दिसत नाही.



ह्यावर्षीच जीवशास्त्राचं नोबेल पारितोषिक मिळालेल्या 'क्रिस्पर' ह्या मूलभूत संशोधनाने जीवशास्त्रात मोठी उत्क्रांती करण्याची सुसंधी शास्त्रज्ञांसमोर उभी केली आहे. डॉक्टर जेनिफर डॉदना आणि सहकारी यांनी निर्माण केलेल्या ह्या संशोधनाची तुलना न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाचे नियम शोधण्याशी, मायकेल फॅरडेने विद्युतप्रवाह शोधण्याशी, आइन्स्टियनने सापेक्षतावादाची थेअरी मांडण्याशी केली जाते. कोणत्याही जनुकात हवे तसे बदल सहज आणि सुरक्षितपणे करू देणारे हे तंत्रज्ञान पुढच्या दोन दशकांमध्ये जीव-विज्ञानात क्रांती घडवून आणणार आहे.

'डीएनए'च्या संरचनेच्या शोधापासून सत्तर वर्षांपूर्वी सुरु झालेला हा प्रवास आता जीवनाच्या प्रत्येक अंगाला भिडतो आहे. गेलं अर्धशतक गाजवणाऱ्या आय टी क्षेत्रातही आता जैव-संगणक, 'डीएनए'च्या कॉम्प्लेक्स संरचनेचा



वापर करून बनलेले जैव-स्टोरेज, जैव-कोडींग, इत्यादी विषयांवरती संशोधनाचे पेपर्स प्रकाशित होत आहेत. संगणकाची क्षमता कित्येक पटींनी वाढवण्याची शक्यता आता ह्या जैव संगणकांमुळे आपल्या कवेत येते आहे. सर्व मोठ्या संगणक कंपन्यांमध्ये जैव-संगणकावर आणि बायो-कॉम्पुटिंगवर काम सुरु आहे. एक-दोन वर्षांत जैव-कॉम्पुटिंग विषय नोबेल पारितोषिकापर्यंत हा विषय पोहोचण्याची शक्यता फार दूर नाही!

'आम्ही पार्लेकर'ने दिलेल्या संधीचा वापर करून, आधुनिक जैव-विज्ञानातले आणि जैव-तंत्रज्ञानातले अकरा महत्वाचे प्रवाह वाचकांपुढे मांडणारी ही लेखमाला ह्या 'जैव-विज्ञानाचे अर्धशतक' ह्या बाराव्या लेखाबरोबर संपुष्टात येत आहे. ह्या बारा लेखात ह्युमन जीनोम प्रकल्पाचा रौप्य महोत्सव आला; कृत्रिम मांसाहाराच तंत्रज्ञान आलं, चिरतारुण्याच्या शोधाचा आढावा आला, औषधांचं पेर्सोनालायझेशन आलं, दुखी, निद्रा, ह्यांचा अत्याधुनिक शोध आला, पूरकान्नाची माहिती आली, पारंपरिक औषधांचा अभ्यास आला, बायोमेडिकल गॅजेट्स आली आणि डॉक्टर डॉदनाच्या क्रिस्पर संशोधनातून निर्माण होणारी क्रांतीची संधी आली. पूर्वी म्हटल्याप्रमाणे एकविसाव्या शतकाचा पूर्वार्ध जैव-विज्ञानाचा आणि जैव-तंत्रज्ञानाचा आहे. रसायन तंत्रज्ञान, आधुनिक भौतिकशास्त्र, संगणक तंत्रज्ञान ह्या तिघांच्या भरभक्कम पायावर उभे राहिलेले हे जैव-तंत्रज्ञान विज्ञानात रस असणाऱ्यांसाठी उपयुक्त आहेच; पण मनुष्यजातीला वरदान ठरणार आहे की नाही, हे पुढच्या पाच वर्षात आपल्याला समजेलच.


**सद्‌गुरु कुळकर्णी**
व्यवसायाने केमिकल इंजिनिअर आणि अग्रगण्य औद्योगिक संशोधन संस्थेतून निवृत्त. रसायने, धातू ह्या बरोबर आधुनिक जैव तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधन. संशोधनं व्यवस्थापनाचा अनुभव.
संपर्क : ९७०२०१०४७१




Atharv

# NAVASAMAJ

INTRODUCING VILE PARLE'S
MOST EXQUISITE RESIDENCY

3 Wing Interconnected Terrace
Podium Garden
Lap Pool
Badminton Court
Gym

Contact: +91 77388 66111 | www.atharvrealty.com | Sales email id- sales@atharvrealty.com
Follow us on: